मूल्य ३० रु./पृष्ठे १०४ । ऑक्टोबर २०१९ । वर्ष १२ वे/अंक १०

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


**4**

**सुरुवातीचे–** हीच वेळ आहे सरकारला सत्तेवरून खाली घेण्याची...

– जयंत पाटील

**5**

**प्रबंध संपादकीय–**

भ्रष्ट युती सरकार खाली खेचा

– दिलीप वळसे पाटील

**6**



**संपादकीय–**

पापाचा भरला घडा

निवडणुकीत आता

शिकवा धडा...

– डॉ. सुधीर भोंगळे

**12**



**डॉ. सुधीर भोंगळे यांनी घेतलेली शरद पवार यांची विशेष मुलाखत**

नापास सरकार!

मते कसली मागता?


– शरद पवार

**22**

सिंचन व शिखर बँक घोटाळा हा भाजपने उभा केलेला बागुलबुवा

– डॉ. सुधीर भोंगळे

**38**




अतिमंदीच्या भयावह संकटात अर्थव्यवस्था

– आनंदी गोपाळ

**48**

**राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा, भाषणे..**



१) अजित पवार – ४८

२) जयंत पाटील – ५४

३) डॉ. अमोल कोल्हे – ५८

४) सुनील तटकरे – ६२

५) धनंजय मुंडे – ६४

६) अमोल मिटकरी – ६६

**69**

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांची भाषणे...**

१) शेतकऱ्यांच्या विरोधी असणाऱ्या युती सरकारला सत्तेतून हटवा – ६९

२) अपयशी लोकांना सत्तेत आणू नका– ७१

३) घामाची किंमत न कळणाऱ्या सरकारला घरी पाठविण्यास सज्ज व्हा! – ७२

**78**




असली–नकली सच्चा–झूठा?

(दिल्ली वार्तापत्र)

– आकाश

**80**



**चव्हाटा** (राजकीय विनोदी किस्से)

– घंटाकर्ण


**90**



**सावध रहा राष्ट्रभक्तीच्या गुंगी इंजेक्शनपासून**

– गहिनीनाथ

**102**



**शेवटचे पान...**

गांधी आता फक्त मतांपुरता!

– हेमन्त टकले



**संचालक**
हेमन्त टकले

**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील

**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर

**सजावट व मांडणी**
दिलीप रोडे

**छायाचित्रे**
प्रशांत चव्हाण

**वर्गणीचे दर–**
वार्षिक रु. ५००/–

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

**संपादक–**
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# हीच वेळ आहे सरकारला सत्तेवरुन खाली घेण्याची...

फडणवीस सरकारचा मागील पाच वर्षातला कारभार हा महाराष्ट्राला विकासात खूप मागे नेणारा तर आहेच पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे आपल्या सर्वांना व जनतेला दु:खाच्या आणि संकटांच्या खाईत लोटणारा आहे. वास्तविक राज्यकर्त्यांनी आपल्या हातातील सत्तेचा वापर सर्वसामान्य जनतेची दुखणी व गाऱ्हाणी दूर करुन त्यांना सुखासमाधानाचे दिवस कसे येतील यासाठी करणे अभिप्रेत असते. कागदातला वा अर्जातला माणूस वाचणे हे त्यादृष्टीने खूप महत्त्वाचे असते. याकरिता गोरगरीब जनता व सामान्य माणसे यांच्याबद्दल अंत:करणात प्रेम व वात्सल्याची आणि मन मोठे करुन उदार भावनेने मदत करण्यासाठी कर्णाचे बाहू असावे लागतात. परंतु दुर्दैव महाराष्ट्रातल्या जनतेचे. त्यांना देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा मनाने अत्यंत क्षुद्र व लहान असलेला आणि कोणालाही कसलीही मदत न करता फक्त चोवीस तास स्वत:च्या स्वार्थी राजकारणाचा आणि प्रत्येक कृती करताना मला यातून काय व किती राजकीय फायदा होणार आहे असा क्षुल्लक विचार करणारा, संकुचित मनाचा मुख्यमंत्री लाभला म्हणून जनता आज अत्यंत उद्विग्न आणि संतप्त आहे.

पाच वर्षांपूर्वी म्हणजे सत्तेवर येण्याअगोदर आणि सत्तेवर आल्यानंतर फडणवीस व भाजपच्या नेत्यांनी जी असंख्य व प्रचंड आश्वासने दिलेली होती त्यातले एक तरी आश्वासन पुरे झाले आहे का? सत्तेवर आल्याबरोबर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देतो, त्यांच्या कर्जाचा सातबारा पूर्ण कोरा करतो, धनगरांना पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण देतो, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाला रास्त भाव देऊन स्वामिनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करतो, बेरोजगारी संपुष्टात आणतो, नवीन उद्योगधंदे निर्माण करुन रोजगार निर्मिती करतो अशी किती म्हणून आश्वासने सांगावीत. बरं, जनतेला फसविलं तर नवल नाही, कारण खोटं बोलणं आणि तेही रेटून बोलणं हा देवेंद्र फडणवीसांचा जन्मजात गुण आहे. त्यामुळे राजकारणात त्यांचे नवीन नामकरण 'फसवणीस' असे झालेले आहे.

सर्वसामान्य जनतेला तर मुख्यमंत्र्यांनी टांग मारलीच पण महाराष्ट्राला आणि संपूर्ण देशाला ज्या युगकर्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल जाज्वल्य अभिमान आहे त्या थोर पुरुषांनाही मुख्यमंत्र्यांनी टांग मारली आहे. छत्रपती शिवरायांचे नाव घेऊन सत्तेवर आलेल्या या जातीयवादी व धर्मांध सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रात उभारल्या जाणाऱ्या स्मारकाचे पंतप्रधानांच्या हस्ते भूमीपूजन करण्याचे नाटक केले पण पाच वर्षात एक वीटही जागेवर चढविली नाही. छत्रपती शिवरायांचे नाव कर्जमाफी योजनेला दिले. पण शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दिली नाही. शक्यतो कुणाही शेतकऱ्याला कर्जमाफी मिळू नये म्हणून अनेक जाचक अटी व नियम लावले. ऑनलाईन अर्ज भरण्याची सक्ती केली. बायकोला घेऊन बँकेच्या दारात उभे राहायला लावले. रांगेत उभे राहून लोकांचा जीव गेला. पण नाही कर्जमाफी मिळाली. आधी कर्जाची उर्वरीत रक्कम भरा मग दीड लाख देतो असे सांगितले. शेतकऱ्यांना मदतीने भाजपला केल्याचा पश्चात्ताप झाला. 38 हजार कोटी रुपये कर्जमाफीसाठी देणार होते. दात कोरुन कोरुन कसेबसे 13 हजार कोटी दिले. बाकी सर्व शेतकरी वाऱ्यावर सोडून दिला. इंदूमिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारणार होते. काम सुरु करण्याचे नाटक केलं. आता कुठल्याच स्मारकाचे काम चालू नाही. रामदास आठवलेंना सत्तेचा तुकडा टाकला आहे ते चघळण्यातच ते मस्त व मग्न आहेत. शेतकऱ्यांप्रमाणेच दलित, मागासवर्गीय जनता यांच्याबद्दल सरकारला तसूभरही प्रेम नाही.

आता विधानसभेच्या निवडणुकांना आपण सारेजण सामोरे जात आहोत. याच वेळी आता सत्ताधारी भाजप-सेनेला जाब विचारला पाहिजे. खोटे बोलून मते घेतलीत. काय झाले आश्वासनांचे! नोटबंदी, जीएसटी किती म्हणून चुकीचे निर्णय करुन आमचं वाटोळं करणार आहात? महाराष्ट्रातली जनता दुष्काळ व पूरासारख्या संकटांनी हैराण आहे. लाखो लोकांचे जनजीवन व संसार उध्वस्त झाले आहेत. उद्योगधंदे बंद पडल्यामुळे व आर्थिक मंदीने लाखो लोकांचे रोजगार गेले आहेत. त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. नवीन रोजगार निर्मिती ठप्प आहे. सरकार मधल्या रिकाम्या असलेल्या जागा भरण्याचे आश्वासन फडणवीसांनी दिले होतं. नाही पूर्ण केलं. मराठा समाजाला आरक्षणाचे गाजर दाखवून फसविलं हे मराठा, धनगर, लिंगायत, आदिवासी या सर्वांच्याच लक्षांत आले आहे. या विधानसभा निवडणुकीत भाजप-सेनेच्या विरोधात मतदान करुन मतदार आपला संताप, नाराजी व क्रोध व्यक्त करणारच आहेत. या कामात आता कोणीही मागे राहू नये आणि सर्वसामान्य गोरगरीब जनतेबद्दल तसूभरही कणव व प्रेम नसलेल्या या भाजप-सेना सरकारला सत्तेवरुन खाली खेचावे ही कळकळीची विनंती करुन थांबतो.



## सुरुवातीचे



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार: राष्ट्रवादी विचार !!

# भ्रष्ट युती सरकार खाली खेचा

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने आता सारा महाराष्ट्र ढवळून निघणार आहे. ही निवडणुक महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात महत्त्वाची ठरणार आहे. नेमकी कोणती तत्वे, अग्रक्रम आणि कार्यक्रम स्वीकारुन महाराष्ट्राचा विकास साधावा लागणार आहे, याविषयी या निवडणुकीत सोक्षमोक्ष लागणार आहे. राज्यापुढे पाणीटंचाई, दुष्काळ व अवर्षण, पूर व अतिवृष्टी, वाढती बेरोजगारी, दिवसेंदिवस वृद्धींगत होत असलेली धर्मांधता व जातीयवाद, आरक्षण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या व वाढते कर्जबाजारीपण, वाढता भ्रष्टाचार व महागाई, बंद पडत चाललेले उद्योगधंदे व कामगारांवर कोसळणारी बेकारीची कुऱ्हाड, आर्थिक मंदी, सरकारने चालविलेली संविधानाची पायमल्ली, संविधान बदलण्याचा घातलेला घाट, लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांबरोबरच म. फुले, शाहू, आंबेडकर आणि छत्रपती शिवरायांच्या विचारांना फासला जाणारा हरताळ, वाढते शहरीकरण व नागरीकरण, उध्वस्त होत असलेली खेडी, राजकारणाने गावागावात व घराघरात माजविलेली दुही, वाढता संघर्ष व नष्ट झालेला एकोपा, अखंडपणे जोपासले जाणारे राजकीय हाडवैर व त्यामुळे ठप्प झालेला विकास, सातत्याने वाढणारी लोकसंख्या व घटती उत्पादकता आणि त्यामुळे वाढणारा उत्पादन खर्च, घटत चाललेला विकासदर अशा एक ना हजारो समस्या आ वासून उभ्या आहेत.

या सर्व समस्यांची यशस्वीपणे सोडवणूक करावयाची असेल तर सध्या राज्यात सत्तेवर असलेले भाजप-सेना युतीचे सरकार तातडीने बदलणे गरजेचे आहे. मागील पाच वर्षात फडणवीसांच्या नेतृत्त्वाखाली युती सरकारने दैदीप्यमान व राज्य प्रगतीपथावर जाईल असे एकही काम केले नाही. उलट इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी या नावाखाली अहमदाबाद मुंबई बुलेट ट्रेन, नागपूर-मुंबई बुलेट ट्रेन, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग, नागपूर, मुंबई, पुणे, नाशिक या शहरात मेट्रोची उभारणी असली कामे काढली आहेत. रस्त्यांचे डांबरीकरण व सिमेंटीकरणाची कामे हाती घेऊन सगळे रस्ते खोदून ठेवले आहेत. कामे अर्धवट पडली आहेत. ठेकेदार काम अर्धवट सोडून पळून गेले आहेत. सर्वत्र रस्त्यांना प्रचंड खड्डे पडले आहेत. स्वच्छता अभियानाचा नुसता डांगोरा पिटला जात आहे. प्रत्यक्ष घाणीचे व त्यामुळे रोगराईचे साम्राज्य सर्वत्र पसरलेले आहे. सर्व नद्या प्रदूषित झालेल्या आहेत. शहरांचे सांडपाणी व मैलापाणी नदी, नाले, ओढे यात सोडल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे सर्व साठे व मोठमोठी धरणे पूर्णपणे प्रदूषित होऊन गेली आहेत. अशा किती म्हणून गोष्टी सांगाव्यात.

या समस्यांची सोडवणूक करायला सरकारकडे वेळ व पैसा नाही. पेट्रोल व डिझेलच्या करातून दरवर्षी लाखो कोटी रुपये सरकारने किंमती कमी न करता जनतेच्या खिशातून काढून घेतले त्याचा हिशेब नाही. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली नाही. दीड लाखाची कर्जमाफी देतानाही मुख्यमंत्र्यांचा हात थरथरला. शक्यतो शेतकऱ्याला कर्जमाफी मिळूच नये असे संकुचित धोरण स्वीकारुन नियमांची उतरंड रचण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण वाढत गेले. सर्वाधिक म्हणजे 16 हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या फडणवीस सरकारच्या काळात झाल्या. संपूर्ण शेतकरी समाज सरकारने उध्वस्त करुन वाऱ्यावर सोडून दिला. त्यामुळे कधी नव्हे तो राज्यात दोन वेळा शेतकरी पहिल्यांदा संपावर गेला. त्याने उत्पादित केलेला सगळा शेतीमाल रस्त्यावर फेकून दिला. रास्ता रोको करुन आंदोलन केले. शेतकऱ्यांची समजूत काढणारी आश्वासने सरकारने दिली पण कुणाचेच आश्वासन पूर्ण केले नाही. अत्यंत थापेबाज आणि खोटारडे असे हे सरकार असून शिवसेना-भाजपचा रोज चालणारा खोटानाटा कलगीतुरा व नुरा कुस्तीही आपण पाहिली आहे. दोघांनी मिळून सत्तेचा मलिदा जेवढा म्हणून शक्य होता तेवढा लुटून हाणला आहे. त्यामुळे राज्यावर पाच लाख कोटींचे कर्ज झाले आहे. महाराष्ट्र राज्यावर 1960 पासून 2014 पर्यंत अडीच लाख कोटी कर्ज झाले होते. युती सरकारने पाच वर्षातच हे कर्ज पाच लाख कोटी रुपयांवर नेले. अडीच लाख कोटींचे कर्ज फक्त पाच वर्षात वाढवून सरकारने या रकमेचे काय केले? याचा हिशेब आज कुणी देत नाही. अत्यंत भ्रष्ट असे हे युती सरकार असल्यामुळे या विधानसभा निवडणुकीत जनतेने ते सत्तेवरुन खाली खेचावे आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची विकासाभिमुख आघाडी सत्तेवर पुन्हा आणावी अशी कळकळीची विनंती करतो.

## प्रबंध संपादकीय



# पापाचा भरला घडा निवडणुकीत आता शिकवा धडा

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखालील युती सरकारचा अनुभव महाराष्ट्राच्या जनतेने मागील पाच वर्षात घेतला आहे. हा अनुभव अत्यंत वाईट व कटू आठवणींनी भरलेला आहे. 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्‍वास' हे सारे काही झूठ आहे, खोटं आहे एवढेच नव्हे तर ही निव्वळ फोकनाड, वांझोटी व लोकांना मूर्ख बनविणारी घोषणा आहे हे जनतेच्या पूर्णपणे लक्षात आले आहे. त्यामुळे ही घोषणा पुढे करुन व तिचे तुणतुणे वाजवून युती सरकारला आता या विधानसभा निवडणुकीत मते मागता येणार नाहीत. कारण मागील पाच वर्षात यातले काहीच प्रत्यक्षात साकार झालेले नाही.

विकास ही ठळकपणाने नजरेत भरणारी गोष्ट आहे. विकास हा धडाडीने होतो. ती सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. विकासात प्रगती आणि त्यापाठोपाठ येणारे समाधान व आनंदाचे वातावरण अभिप्रेत असते. मानवी मन विकासाने सुखावते व नाविन्यपूर्ण आणखीन काही गोष्टी कराव्यात असा ध्यास बाळगते. सरकारने विकासाला अनुकूल असे वातावरण निर्माण करावे, त्या दिशेने धोरणांची रचना करावी आणि आवश्यक असे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करावे अशी अपेक्षा असते. युती सरकारने मागच्या पाच वर्षात यातले काहीच केले नाही. उलट चुकीची धोरणे व एकांगी निर्णय करुन महाराष्ट्राच्या जनतेला दुःखाच्या व संकटांच्या खाईत लोटले आहे. संपूर्ण जनसमुदाय नैराश्येचे जीवन जगतो आहे. अशा वेळी भाजप-शिवसेनेचे नेते कोणत्या तोंडाने लोकांसमोर जाऊन मते मागणार आहेत हा जनतेलाच पडलेला प्रश्‍न आहे. मोठ मोठ्या खोट्यानाट्या घोषणा करुन व भूलथापा मारुन जनतेला एकदा फसवून झाले आहे. आता ती फसण्याची शक्यता कमी आहे. कारण तिच्या अन्नातच सरकारने माती कालवली आहे. सरकारने वेगवेगळ्या करांच्या रुपाने आणि महागाईचे चटके देऊन जनतेला प्रचंड लुटले आहे. आर्थिकदृष्ट्या खिळखिळे, कंगाल करुन टाकले आहे. त्यामुळे जनतेच्या पोटात भुकेचा आगडोंब आहे आणि नेत्रांमध्ये युती सरकारला पेटविण्याच्या ज्वाळा आहेत. चालू विधानसभा निवडणुकीत या सरकारची होळीच केली पाहिजे या इराद्याने जनता पेटून उठली आहे. तिच्या सुखी संसाराला सरकारने आग लावल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

## नोटबंदीपासूनच अधोगती

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी 8 नोव्हेंबर 2016 ला अचानक जनतेवर बॉम्ब टाकणारी नोटबंदीची घोषणा केली तेव्हापासून जी अधोगती सुरु झाली आहे आणि जो संकटांचा ससेमिरा जनतेच्या मागे लागलेला आहे तो अजूनपर्यंत चालू आहे. एवढेच नव्हे तर भविष्यातही तो चालूच राहणार आहे असे अर्थतज्ज्ञ सांगत आहेत. यावरचा एक नामी उपाय म्हणून विधानसभा निवडणुकीत युती सरकारला पराभूत करुन गाडले पाहिजे व नवीन विचारधारा पुर्नस्थापित करण्यासाठी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस व समविचारी आघाडीचे धर्मनिरपेक्ष लोकशाही मानणारे सरकार निवडून दिले पाहिजे अशा प्रकारची भूमिका व विचार घेऊन लोक जागोजागी उभे राहताहेत. नोटबंदीची घोषणा करताना पंतप्रधान म्हणाले होते, 'मला फक्त 50 दिवस द्या. तेवढ्यात परिस्थिती सुधारवून दाखवितो. सगळा काळा पैसा बाहेर काढतो. समांतर चालणारी पर्यायी अर्थव्यवस्था उध्वस्त करतो. देशाचा कारभार पूर्णपणे पारदर्शी करुन भ्रष्टाचारमुक्त करतो." प्रत्यक्षात काय घडले ते आपण सारेजण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. माजी पंतप्रधान आणि थोर अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यावेळेला केलेले भाकीत मात्र आज खरे होताना दिसत आहे. डॉ. सिंग त्यावेळी म्हणाले होते की, "नोटबंदीने देशाचा विकासदर किमान 2 टक्क्यांनी घसरेल आणि देशाची घडी मूळ पदावर यायला किमान 2 ते 3 वर्षे लागतील." आजचे वास्तव चित्र या भाष्यापेक्षा अधिक भयानक व भयावह आहे. त्यामुळे संपूर्ण जनमानसात चिंतेचे वातावरण आहे.

## लोकांचे संसार रस्त्यावर

नोटबंदीने संपूर्ण शेतकरी समाज तर उध्वस्त केलाच पण छोटे-मोठे कामगार, मजूर, महिला, युवक, कंत्राटी लेबर, शिक्षण घेणारी मुले-मुली या सर्वांना संकटात लोटून त्यांना जीवन जगणे मुश्किल केले आहे. आज तुम्ही कोणत्याही गावातल्या मजूर अड्ड्यावर जा किंवा सार्वजनिक चौकाच्या ठिकाणी जा हजारोंच्या संख्येने लोक काम कुठे मिळेल या आशेने उभे असतात. घरातून सकाळी सकाळी डबा घेऊन निघालेले हे लोक दिवसभर कामाच्या आशेने चौकात तिष्ठत उभे राहतात. 20-25 टक्के लोकांना

**संपादकीय**



कसेबसे अर्ध्या मजुरीवर काम मिळते. बाकी लोक संध्याकाळी निराशेने व रिकाम्या हाताने जेव्हा घरी जातात तेव्हा संध्याकाळची चूल कशी पेटवायची, कच्च्याबच्च्या पोरांच्या पोटात अन्नाचा घास कुठून व कसा घालायचा हा प्रश्न आई-वडिलांपुढे आ वासून उभा असतो. आता लोकांना प्रश्न पडतो, हेच का ते अच्छे दिन आहेत? आपल्या राज्यापुरते बोलायचे झाले तर फडणवीस सरकारच्या काळात जवळपास 16 हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या केल्या आहेत. सुमारे दीड लाख लघु उद्योग बंद झाले आहेत. साडेतीनशे गाड्यांच्या शोरुमला टाळे लागले आहे. टेल्को, बजाज, पियाजो, मारुती, फोक्सवॅगन यांसारख्या वाहनांच्या मोठमोठ्या कंपन्यांबरोबरच या कंपन्यांवर अवलंबून असणाऱ्या व छोट्या-मोठ्या भागांची निर्मिती करणाऱ्या कंपन्या व वर्कशॉप मालकांनी कामगारांना कामावरुन कमी केले आहे. ले ऑफ दिला आहे. काही कंपन्या आठवड्यातून फक्त दोन दिवस चालताहेत. ट्रान्सपोर्ट धंद्यातील हजारो ड्रायव्हरांना कामावरुन कमी करण्यात आले आहे. वाहतुकीचे काम नाही पगार कुठून द्यायचा हा वाहन मालकांपुढे प्रश्न आहे. साधी हॉटेल, उपहारगृहे व पंचतारांकित हॉटेलांमधील ग्राहक संख्या रोडावलेली असल्यामुळे त्यांनीही कामगार कमी केले आहेत. चोहीकडे बेरोजगारीचे व उपासमारीचे वातावरण आहे. ''भुकेलेल्या पोटी मनुष्य तत्त्वज्ञान ऐकत नाही, न्याय-अन्यायाचा विचार करीत नाही आणि प्रार्थनेसाठीही कुणापुढे वाकत नाही.'' असे सेन्सा या तत्त्वज्ञाचे प्रसिद्ध वाक्य आहे. त्याची प्रचीती आज सर्वत्र येते आहे.

## महाराष्ट्राचे धंदे गुजरातला

सरकारच्या प्रतिकूल व प्रतिगामी आणि लुटारु धोरणांमुळे अगोदरच


मुंबई पोर्ट ट्रस्ट

राज्यातील उद्योगधंद्यांचे कंबरडे मोडलेले असताना जाणीवपूर्वक महाराष्ट्रातील कारखानदारी व व्यवसाय उध्वस्त करुन आणि संकटात आणून त्यांना गुजरातमध्ये नेण्याच्या दृष्टीने मोदी-शहा जोडीकडून प्रयत्न केले जाताहेत. आपले अनेक कारखाने गुजरातमध्ये हलविण्यात आले आहेत. इतकेच काय पण मुंबई पोर्ट ट्रस्ट (बीपीटी) मधली सगळी जलवाहतुक आणि आयात-निर्यात गुजरातमधील कांडला व मुंद्रा या बंदरातून कशी होईल व खासगी अदानींसारख्या उद्योजकांचे ऊखळ कसे पांढरे होईल असा प्रयत्न सरकारकडून हेतूपूर्वक चालू आहे. आज बीपीटीचा कारभार जवळपास बंद झाल्यात जमा आहे. काय करणार त्या गोदी कामगारांचे, हमाल-मापाडी आणि तोलणारांचे ! बीपीटीच्या जागा मोठमोठ्या बिल्डर्सच्या घशात घालून मुंबई भिकेला लावण्याचा व वेळ येताच ती केंद्रशासित प्रदेश करुन टाकून देशाची आर्थिक राजधानी असलेले मुंबई शहर महाराष्ट्रापासून तोडण्याचा केंद्र सरकारचा मनसुबा आहे. त्यादृष्टीने छुपी पाऊले ते टाकीत आहेत. स्वतःचे मुख्यमंत्रीपद टिकविण्यासाठी देवेंद्र फडणवीस मात्र केंद्रीय नेतृत्वापुढे लाचार होऊन लोटांगण घालताहेत आणि महाराष्ट्राचे व येथल्या जनतेचे कायमचे वाटोळे करताहेत. पूर्वीपासून वेगळ्या विदर्भाची सातत्याने मागणी करीत आलेल्या मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र भिकेला लावायचा आहे काय? हा प्रश्न विचारण्याची हिंमत आता शिवसेनेच्या वाघात राहिलेली नाही. या वाघाची शेळीच काय पण सशासारखी भित्री अवस्था झालेली आहे. महाराष्ट्राचे उध्वस्तीकरण चालू आहे हे स्वाभिमानाच्या खोट्या पण मोठमोठ्या डरकाळ्या फोडणाऱ्या उद्धवजींना काही दिसत नाही का? का पुत्रप्रेमाने आणि त्याला राजकारणात पुढे नेऊन निवडून आणण्यासाठी ते इतके आंधळे झाले आहेत? का मुंबई महापालिकेतील गैरव्यवहार व प्रचंड भ्रष्टाचार प्रकरणी भाजप नेत्यांनी उद्धवजींनाही पवार साहेबांसारखी 'ईडी'च्या नोटीशीची भिती दाखवून ठेवली आहे? पवार साहेब नाही घाबरले नोटीशीला! त्यांनी निधड्या छातीने 'ईडी'चा सामना करायचे ठरविले. तेव्हा शेवटी 'ईडी'च घाबरुन येडी झाली आणि लेखी ई-मेल पाठवून भेटायला येऊ नका म्हणाली. अशी हिंमत उद्धवजींनी दाखवायला पाहिजे होती. पण ते सत्तेसाठी इतके लाचार व लोचट झाले आहेत की त्यांना शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे आणि आपले आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांच्या जाज्वल्य विचारांचा पूर्ण विसर पडला आहे. स्वतःचे आणि पक्षाचे स्वत्व व स्वाभिमान गहाण ठेवून महाराष्ट्राचे कायमचे वाटोळे करण्याच्या

भाजप नेत्यांच्या षडयंत्राला शिवसेना निव्वळ हातभार लावित नाही तर त्या झाडाला खतपाणी घालून वाढविते आहे. म्हणून सेना-भाजपची युती या विधानसभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत पराभूत करणे हे महाराष्ट्रात जन्मलेल्या, वाढलेल्या, राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. 'पिराचे पिराला पडले. फकिराचे बघतो कोण?' अशी युती सरकारची अवस्था आहे. त्यांना केवळ सत्ता मिळवून आपली घरेदारे भरण्याचा हव्यास आहे. यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगवेगळे आहेत. मागील पाच वर्षात दोघांनी एकमेकांवर प्रचंड टीका करण्याचे नाटक उत्तमपणे वठवून "दोन बोक्यांनी हाणला हो हाणला, चोरुन लोण्याचा गोळा" या गाण्याची सर्वांना आठवण व्हावी असे चित्र निर्माण केले आहे. राज्य सर्व क्षेत्रात आज विकासात मागे गेले आहे. शेजारचे कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात, राजस्थान, तेलंगणा, मध्यप्रदेश, केरळ, तामिळनाडू ही राज्ये शेती, सिंचन, शिक्षण, आरोग्य, पाणलोट विकास, फळबागा उभारणी व प्रक्रिया कारखानदारी, आय.टी., वाहन विक्री व गाड्यांची जुळणी, शेतीमाल व औद्योगिक मालाची आयात-निर्यात, सूतगिरण्या व कापड धंदा किती म्हणून क्षेत्रांचा उल्लेख करु यात पुढे गेले आहेत. एकेकाळी पाणलोट क्षेत्रविकास व जलसंधारणाच्या कामात आपण संपूर्ण देशात आघाडीवर होतो आणि अनेक राज्यांना कामाचे मार्गदर्शन करीत होतो. आज या कामात आपण सर्वात मागे पडलो आहोत. आदर्श गाव योजना कुठे चालू आहे असे दिसत नाही आणि बंद पडली असे कुणी म्हणत नाही ही वस्तुस्थिती आहे.

## जलयुक्त शिवार-अशास्त्रीय योजना

महाराष्ट्राचा पाणीप्रश्न कायमचा सोडविण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांनी अत्यंत महत्वाकांक्षी अशी 'जलयुक्त


जलयुक्त शिवारचे खड्डे

शिवार' नावाची योजना पुढे आणली. मुळात ही योजना 82 टक्के बेसॉल्ट रॉक (अग्नीजन्य खडक/कठीण काळा पाषाण) असणाऱ्या महाराष्ट्रात राबविणे अत्यंत चुकीचे व अशास्त्रीय होते आणि आहे देखील. याबाबत वारंवार अनेक तज्ज्ञांनी जाहीरपणाने मुख्यमंत्र्यांना समजावून सांगितले की या योजनेने महाराष्ट्राच्या पाणी टंचाईचा प्रश्न कधीच सुटणार नाही. जमिनीवर नुसते उभे-आडवे 20-20 फुट रुंदी व खोलीचे खड्डे खोदू नका. त्यात पावसाचे पाणी साठले तरी खडकाला छिद्रे, रंध्रे, भेगा, पोरस भाग नसेल तर ते पाणी जमिनीत मुरणार नाही. ते तसेच साठून राहून सूर्याला बाष्पीभवनासाठी आंदण दिल्यासारखे होईल. परंतु मुख्यमंत्र्यांची मानसिकता कोणाचेच ऐकण्याची नसल्यामुळे हेकेखोरपणाने ते ही योजना सातत्याने पुढे रेटत राहिले. परिणाम आपण सर्वांनी पाहिले. या योजनेतील 1800 प्रकरणांमध्ये पहिल्या टप्प्याच्या चौकशीत भ्रष्टाचार झाल्याचे जलसंधारण मंत्री श्री. तान्हाजी सावंत यांनी विधानसभेच्या सभागृहात कबूल केले. आणखीन हजारो प्रकरणांची चौकशी बाकी आहे. युती सरकारने भाजप-सेनेच्या कार्यकर्त्यांना ठेकेदार बनवून त्यांना हे सगळे काम दिले होते. म्हणजे एका अर्थी पक्षाचे राजकीय कार्यकर्ते पोसण्यासाठी व त्यांना सरकारमधून आर्थिक मदत पुरविण्यासाठी या जलयुक्त शिवार योजनेचा वापर करण्यात आला. ज्या सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, तेलगिरण्या यांना शिखर बँकेने कर्जपुरवठा केला आणि शेतकऱ्यांना मदत व्हावी या भावनेने जगविण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल बोंबाबोंब करुन त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारणाऱ्या सरकारने या जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून सरकारच्या तिजोरीवर भरदिवसा दरोडा घातला आहे हे न करण्याइतकी जनताही मूर्ख आणि अडाणी राहिलेली नाही. ती खूप शिक्षित व सूज्ञ बनली आहे. म्हणूनच जलयुक्त योजनेच्या विरुद्ध असंख्य याचिका उच्च न्यायालयात गेल्या आणि न्यायालयाच्या आदेशाने चौकशी होऊन सरकारचे पितळ उघडे पडले.

## सिंचन घोटाळ्याचे भूत

कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस सरकारच्या काळात सिंचनाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होऊन 70 हजार कोटींचा घोटाळा झाला असे भूत भाजप नेत्यांनी जाणीवपूर्वक उभे केले. 30 हजार कोटी खर्च झालेले असताना 70 हजार कोटींचा भ्रष्टाचार होईलच कसा? असा जेव्हा युक्तिवाद शासनाच्या अर्थसंकल्प व आर्थिक पाहणी अहवालाच्याच आधारे करण्यात आला तेव्हा कुठे युतीच्या नेत्यांचे दात घशात गेले. तरीपण मधून मधून आरोपांचे

सुळे ते बाहेर काढतातच! या सिंचन घोटाळ्याच्या नावाखाली गेल्या 8-9 वर्षांपासून भाजप-सेनेने महाराष्ट्रातला सिंचन निर्मिती व वाढीचा कार्यक्रम बंद करुन ठेवला होता. सर्व निविदा रद्द केल्या होत्या. परत सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) सर्व प्रकल्पांना देण्यात आली. या सुप्रमा देताना जवळपास दीड लाख कोटींनी खर्च वाढला. आता या वाढीव खर्चाची जबाबदारी कुणी स्वीकारायची? या सुप्रमा कशा दिल्यात आणि त्यासाठी मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी ठेकेदारांना कसे कामाला लावले? त्यांच्या हितसंबंधाना कसे जोपासले? याची सगळी माहिती योग्य वेळी बाहेर येईलच मग जनतेला मंत्र्यांचे व सरकारचे उद्योग कळतील. ही माहिती जेवढी महत्त्वाची आहे त्यापेक्षा जास्त महत्व प्रकल्प लवकर पूर्ण होऊन लोकांना पाणी मिळणे या गोष्टीला आहे. पण सिंचनाचा कार्यक्रम बंद असल्यामुळे व मॅचिंग ग्रँन्टसाठी राज्य सरकार पैसे देत नसल्यामुळे नाबार्डही कर्जपुरवठा करीत नाही. त्यामुळे पंतप्रधान सिंचाई योजनेतून निवडलेले 26 प्रकल्पही अजून निधीच्याच प्रतिक्षेत आहेत. मुख्यमंत्र्यांना त्यांच्या स्वतःच्या भागातील गोसीखुर्द सारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्पही पुढे रेटून पूर्ण करता आला नाही. सिंचनाच्या अनुशेष पूर्तीसाठीही पैसे देता आले नाहीत. एवढेच काय पण मागील 5 वर्षांत किती प्रकल्प पूर्ण होऊन सिंचन नेमके किती वाढले याचे खरे आकडे व माहिती जाहिर करण्याचे धाडस युती सरकारमध्ये नाही हे अर्थसंकल्पीय अहवालावरुन सिद्ध झाले आहे. 33 कोटी वृक्ष लागवड योजनेतही प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. त्याची झलक म्हणून अनेक लोक रोपांच्या निवडीपासून खड्डे खोदण्यापर्यंतच्या सुरम्य कथा सांगताहेत. कधी तरी याची देखील न्यायालय चौकशी करण्याचा आदेश येईल याविषयी माझ्या मनात शंका नाही.


गोसीखुर्द धरण

## मंत्र्यांचा भ्रष्टाचार घातला पाठिशी

युती सरकारच्या काळात महसूल मंत्री चंद्रकांत पाटील, सहकार मंत्री सुभाष देशमुख, ग्रामीण विकासमंत्री पंकजा मुंडे, आदिवासी मंत्री विष्णू सावरा, पर्यटन मंत्री जयकुमार रावळे, शिक्षणमंत्री विनोद तावडे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, आरोग्यमंत्री दीपक सावंत, कामगार मंत्री संभाजी निलंगेकर, गृहनिर्माण मंत्री प्रकाश मेहता यांच्यासह जवळपास 17 मंत्र्यांवर विरोधकांनी भ्रष्टाचाराचे आरोप करुन ते कागदपत्रासह सिद्ध करुन दाखविले. त्याचे पुरावे सभागृहात मांडले. ही सर्व भ्रष्टाचाराची रक्कम 90 हजार कोटींहून अधिक आहे. राज्य सरकारची केवढ्या मोठ्या प्रमाणात लूट या मंत्र्यांनी केली आहे. हे डोळे उघडे ठेवून पाहिले तर आपल्या लक्षात येईल. पण या सर्वांचा भ्रष्टाचार मुख्यमंत्र्यांनी पाठिशी तर घातलाच पण कोणतीही चौकशी न करता हेतूतः व जाणिवपूर्वक त्या सर्व मंत्र्यांना 'क्लीन चीट' दिली. 'मै देश का चौकीदार, न खाऊंगा न खाने दूँगा' अशी घोषणा देणाऱ्या आणि मोदींच्या पावलांवर पाऊल टाकून चालणाऱ्या मुख्यमंत्री फडणवीसांना आता मोदींचे सच्चे अनुयायी व शिष्य कसे म्हणायचे? मुख्यमंत्री कितीही आव आणित असेल आणि स्वच्छतेचा दावा करीत असले तरी ते खरे नाही. त्यांना स्वच्छतेचा दावा पुढे रेटायचा असेल तर विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी मतदारांना वाटण्यासाठी त्यांनी भाजपच्या उमेदवारांना कोट्यावधी रुपये कोठून उपलब्ध करुन दिले याचे उत्तर द्यावे लागेल. हे उत्तर देणे तितके सोपे व सरळ नाही. कारण त्यांनी काही मंत्रालयात पैशाचे झाड लावलेले नाही. हल्ली फायलीतूनच फळं मिळतात हे सगळ्यांना माहिती आहे आणि ते 'ओपन सिक्रेट' आहे. त्यामुळे याबद्दल अधिक भाष्य न केलेलेच बरे!

## घोषणा हवेत विरल्या

2014 च्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री होण्यापूर्वी आणि मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी जो घोषणांचा सपाटा लावून पाऊस पाडला होता त्यावरुन फडणवीसी कामांचा पूर येतो की काय असे वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. प्रत्यक्षात कार्याचा पूर आलाच नाही. कारण घोषणांचे ढग हवेतच विरुन गेले. मुख्यमंत्र्यांनी गेल्या 5 वर्षांत दिलेल्या आश्वासनांची संख्या चारशेहून अधिक आहे आणि प्रत्यक्षात पूर्ण झालेल्या आश्वासनांची संख्या दहा सुद्धा नाही ही अत्यंत वेदनादायी गोष्ट आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांनी सांगितले होते तुम्हांला पूर्ण कर्जमाफी देतो. सातबारा पूर्ण कोरा करतो. नवनवीन उद्योगधंदे आणून रोजगार निर्मिती वाढवितो. महागाई

कमी करतो. सरकामधल्या सगळ्या रिक्त जागा भरतो. धनगर, लिंगायत यांना पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण देतो. भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शी कारभार करतो. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची रास्त किंमत देतो. त्यासाठी स्वामिनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करुन मूळ उत्पादन खर्च व त्यावर 50 टक्के नफा गृहित धरुन शेतकऱ्याला 150 टक्के दर देतो. महाराष्ट्र पूर्ण टँकरमुक्त करतो. मागेल त्याला शेततळे देतो. राज्यातील ऊसाचे पाच लाख एकर क्षेत्र पूर्णपणे ठिबक सिंचनाखाली नेतो. त्यासाठी योजनेत 25 टक्के सबसिडी देतो व 4 टक्के व्याजाची रक्कम राज्य सरकारमार्फत भरण्याची व्यवस्था करतो. दूधाचे भाव लिटरला पाच रुपयांनी वाढवून देतो. दुष्काळग्रस्त व पूरग्रस्त जनतेला देखील मदतीची प्रचंड आश्वासने दिली. काय त्यांच्या पदरात पडले आणि किती आश्वासनांची पूर्तता झाली? याचे मोजमाप कसे, केव्हा व कोण करणार? का सगळं बोलाचीच कढी अन् बोलाचाच भात, खाऊनिया कोण तृप्त झाला? खाण्यावरुन आठवलं गॅस सिलेंडरच्या किंमती दुपटीने वाढल्या. पेट्रोल-डिझेलवर प्रचंड कर बसवून दरवर्षी तीन लाख कोटी रुपये जास्तीचे कराच्या रुपाने जनतेच्या खिशातून सरकारने काढले. हा जास्तीचा पैसा कुठे गेला? त्याचा काय हिशेब आहे? आज केंद्र आणि राज्य सरकार तिजोरीत खडखडाट आहे म्हणून कोणाचेच पैसे देत नाही मग जास्तीच्या गोळा झालेल्या रकमेचे झाले काय? मागासवर्गीय, भटक्या विमुक्त, ओबीसी मुलांची फीची रक्कम सरकार समाजकल्याण खात्यामार्फत महाविद्यालयांना देणार होते. गेल्या 3-4 वर्षांपासून मुलांना शिष्यवृत्तीही दिली नाही आणि त्यांच्या फीची रक्कमही महाविद्यालयांना दिली नाही. काहींनी कोर्टात जाऊन या रकमा वसूल केल्या. देवेंद्र आणि उद्धव जोडीचा हा कारभार अजबच म्हटला पाहिजे.

शेतकऱ्यांनी संपात रस्त्यावर दूध ओतले



## ढोंगी व दुटप्पी शिवसेना

सुरुवातीला शिवसेना सरकारात सामील झाली नव्हती. परंतु नंतर घाबरुन व सत्तेच्या लालसेने लाचारी स्वीकारुन सत्तेत टिकून राहिली. त्यांच्या या वागणुक व कर्तृत्वासंबंधी थोडक्यात काही मुद्दे येथे नमूद करतो. सविस्तर आढावा घ्यायचे ठरविले तर एक वेगळा ग्रंथच लिहावा लागेल.

1) भाजपने शिवसेनेला अत्यंत खालच्या पातळीची वागणूक दिली. निम्म्या जागा मागत होते. 124 दिल्या. 20 कमी दिल्या. उपमुख्यमंत्रीपद देणार नाही म्हणून सांगितले. अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद पाहिजे होते ती ही मागणी फेटाळून लावली. तरीही लाचार होऊन शिवसेनेने युती केली. कारण युती नाही केली तर मागच्या एवढ्याही जागा येणार नाहीत अशी भिती होती आणि शिवसेनेचे काही आमदार फुटून भाजपत जाण्याच्या तयारीत होते.

2) पुणे शहरात शिवसेनेला 4 जागा पाहिजे होत्या. एकही मिळाली नाही. महत्त्वाच्या शहरांमध्ये म्हणजे पुणे, नाशिक, नागपूर, नवी मुंबई, औरंगाबाद या महत्त्वाच्या शहरांमध्ये एकही जागा शिवसेनेला दिली नाही. त्यामुळे असंख्य शिवसैनिक संतप्त झाले आणि त्यांनी बंडखोरी केली. म्हणजे मनोमिलन पक्के झाले नाही.

3) मागील 5 वर्षे सत्तेत राहूनही शिवसेना सरकारच्याच विरुद्ध असल्याचे नाटक करीत होती. 'सौ चुँहे खाँके बिल्ली हज को निकली' अशी शिवसेनेची अवस्था होती. सरकारात व सत्तेत राहून सत्तेचे सगळे फायदे उठवायचे आणि पुन्हा वरुन 'मी नाही बाई त्यातली आणि कडी लावा आतली' ही सेनेची भूमिका जनतेला कळत नाही अशातला काही भाग नाही.

4) गेली 25 वर्षे मुंबई महापालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे. शहराची पार वाट लावून ठेवली आहे. मुंबई महापालिकेत प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. त्याची चौकशी होऊन फायली सरकारमध्ये तयार आहेत. स्वतंत्र लढलो तर जेलमध्येच जाण्याची पाळी आहे हे शिवसेना नेत्यांना ठाऊक आहे. त्यामुळे अपमान, मानहानी सोसून व पडती बाजू घेऊन युती केली आहे. आतून प्रचंड रागद्वेष व संताप आहे. तो उद्धवजींच्या बोलण्यातून मधूनमधून व्यक्त होतो.

5) शिवसेना आणि भाजपच्या मंत्र्यांनी मागील 5 वर्षात प्रचंड भ्रष्टाचार केला आणि मुख्यमंत्र्यांनी त्या सर्वांना पाठीशी घालून क्लीन चिट दिली. उद्योगमंत्री

सुभाष देसाई यांनी एमआयडीसीसाठी सरकारने संपादित केलेली 50 हजार एकरजमीन सोडून दिली. ती काय फुकट सोडली का? राज्य सरकारचे यात केवढे मोठे नुकसान झाले.

डॉ. दीपक सावंत यांनी आरोग्यमंत्री असताना औषध खरेदीत केवढा मोठा घोटाळा केला. शेवटी त्यांना मंत्रीपदावरुन काढावे लागले.

6) खेडला होणारे आंतरराष्ट्रीय विमानतळ शिवसेनेचे खासदार श्री. शिवाजीराव आढळरावांच्या दुटप्पी भूमिकेमुळे होऊ शकले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विमानतळ झाला असता तर पुणे व आसपासच्या जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांच्या शेतातला सगळा भाजीपाला देश-परदेशात मोठ्या प्रमाणावर जाऊन शेतकऱ्याला चांगले पैसे मिळाले असते. वाहतुक व इतर प्रक्रिया धंदे वाढले असते आणि मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होऊन तरुणांना, बेरोजगारांना काम मिळाले असते.

7) पीक विमा योजनेचे पैसे म्हणजे नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळावी म्हणून शिवसेनेने मोर्चा काढण्याचे नाटक केले. ज्या भारती विमा कंपनीने खरीप पिकांचा विमाच उतरविला नव्हता त्याच्यावर उद्धवजी मुंबईत मोर्चा घेऊन गेले. कंपनीच्या लोकांनी सांगितले आम्ही रब्बीच्या पिकांचा विमा उतरवतो, खरीपाचा नाही. तुम्ही चुकीच्या कंपनीवर मोर्चा आणला आहे. पीक विमा योजनेतला घोटाळा राफेल घोटाळ्यापेक्षा मोठा आहे असे उद्धवजी सारखे म्हणायचे. मग काय झाले या घोटाळ्यांचे? दोघांनी मिळून सगळे घोटाळे पचविले.

8) मागे एकदा विधानसभेत शेकापचे ज्येष्ठ आमदार केशवराव धोंडगे यांनी "गावावरुन ओवाळून टाकलेली पोरं म्हणजे शिवसेना" असे विधान केले होते. त्यावेळी शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे जिवंत होते. या विधानावरुन सभागृहात प्रचंड गोंधळ झाला पण अखेरपर्यंत केशवराव धोंडगे आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. त्यांनी शब्द मागे घेतले नाहीत आणि माफीही मागितली नाही. त्यांच्या त्यावेळची विधानाची सत्यासत्यता तुम्ही आता तपासून पाहा. त्याबद्दल आज मी फार काही बोलत नाही.

9) ठाणे, कल्याण, मुंबई येथल्या महापालिकेत सेनेची अनेक वर्षांपासून सत्ता आहे. आज या शहरांची किती वाईट अवस्था आहे. रस्त्यात किती प्रचंड खड्डे आहेत. केवढा भ्रष्टाचार आहे. कामाची गुणवत्ता नाही. नगरसेवकांचा आणि नेत्यांचा सगळा जीव कमिशनमध्ये अडकला आहे. त्यामुळे शहरे खड्ड्यात गेली आहेत. ड्रेनेज लाईन चोकअप आहेत. जुन्या झाल्या आहेत. पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. सगळी शहरे पुरात बुडतात. पण राज्य सरकार या स्थानिक स्वराज्य संस्थांना जाब विचारायला तयार नाही.

10) बाबरी मशिदीच्या जागी अयोध्येत राममंदीराची उभारणी करण्यासंबंधी स्वतः उद्धवजींनी प्रचंड मोठमोठ्या डरकाळ्या फोडल्या होत्या. भावनिक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करुन लोकांना मूर्ख बनविण्याचा डाव टाकला होता. पण भाजपच्या नेत्यांनी आणि विशेषतः पंतप्रधानांनीच हा डाव उधळून लावला. राम मंदिराने लोकांची पोटं भरणार नाहीत हे उद्धवजींना कसे व केव्हा कळेल? आज देशातली रामाची अनेक मंदीरे ज्या अवस्थेत आहेत ती एकदा डोळे उघडून पाहा. त्यांच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम हाती घ्या. कदाचित त्यातून राम पावला तर तुमचा चिरंजीव एखाद्या दिवशी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होऊन तुमचे स्वप्न पूर्ण होऊ शकेल?

## भावनेवर राज्य चालत नाही

2019 च्या लोकसभा निवडणुकीच्यावेळी पुलवामा-बालाकोट सारखा पाकिस्तानवरील हल्ल्याचा भावनिक प्रश्न निर्माण करुन भाजपने निवडणुक जिंकली. 2014 च्या आश्वासनांचा व अच्छे दिनाचा आणि केलेल्या कामाचा लेखाजोखा जनतेपुढे मांडण्याचे धाडस मोदी सरकारला झाले नाही. आता तीच अवस्था देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांच्या वेळी झालेली आहे. पूर्ण केलेले एकही भरीव काम नाही. त्यामुळे कलम 370, 35 अे, काश्मिर असले भावनिक प्रश्न निर्माण करुन व जाती-धर्मातली तेढ वाढवून मते मागण्याचा डाव घाटत आहे. पण भावनेने पोट भरत नाही आणि भावनेच्या आधारावर जनतेला फार काळ भुलविताही येत नाही. पोट भरण्यासाठी अन्नाचे दोन घास सुखासमाधानाने पोटात जावे लागतात. ते जाण्याची व्यवस्था करण्यात युती सरकारला मागील पाच वर्षात पूर्ण अपयश आले आहे. सरकार कामात नापास झाले आहे. आता कदाचित राममंदीराचा विषय उभा करतील. काश्मीरचा प्रश्न सोडविला म्हणतील. पण जनतेनेही सावध राहिले पाहिजे. असल्या भावनिक मुद्द्यांना व विषयांना भीक न घालता रोजच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न जास्त महत्त्वाचे आहेत हे या निवडणुकीत विरोधी मतदान करुन त्यांनी दाखवून दिले पाहिजे. शेवटी सैन्यही पोटावर चालते आणि जनताही पोटासाठीच राबराब राबते. हे राबणे ज्या युती सरकारला कधी कळले नाही त्यांना त्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा विजयासाठी मते मागण्याचा नैतिक अधिकार निश्चित नाही! जनताही तो मान्य करणार नाही. सरकारच्या पापाचा घडा भरला आहे.





**विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी राज्यात सर्वत्र जोमाने चालू आहे. प्रचाराला रंग भरला आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडताहेत. जो तो आपापल्या कामाचा लेखाजोखा मांडून मतांचे दान व आशीर्वाद मागतो आहे. पाच वर्षातला युती सरकारचा कारभार जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहून प्रचंड यातना सोसल्या आहेत. समाजातल्या प्रत्येक घटकाला संकटाच्या खाईत लोटून त्याच्यापुढे अडचणी व समस्यांचा डोंगर उभा करण्याचे काम युती सरकारने केले आहे. त्यामुळे सरकारबद्दल जनतेच्या मनात मोठी संतप्त भावना व नाराजी आहे.. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व देशातील ज्येष्ठ राजकीय नेते श्री. शरद पवार यांची राष्ट्रवादी मासिकाचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे यांनी घेतलेली ही विशेष मुलाखत.**



# नापास सरकार! मते कसली मागता?

## शरद पवार यांचा सवाल

**प्रश्न – फडणवीस सरकारच्या पाच वर्षाच्या कामगिरीचे आपण कसे मूल्यमापन करता?**

**पवार –** महाराष्ट्राला विकासात अग्रेसर ठेवण्यात युती सरकारला पूर्ण अपयश आले आहे. सर्व पातळ्यांवर आणि सर्व योजनांच्या अंमलबजावणीत हे सरकार नापास झाले आहे. त्यामुळे या निवडणुकीत विकासाच्या नावावर मते मागण्याचा त्यांना अधिकारच राहिलेला नाही. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी राज्य मागे नेऊन ठेवलंय. त्यामुळे सारेच जण त्यांना प्रश्न विचारताहेत, "अहो, फडणवीस, कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा!"

सत्तेवर येण्यापूर्वी व आल्यानंतर त्यांनी प्रचंड घोषणा केल्या. लोक त्या घोषणांना सुरुवातीला भुलले. नंतर जनतेच्या लक्षांत आले की महाराष्ट्र सरकार हे केंद्र सरकारच्या पाऊलांवर पाऊल टाकून चालणारे आहे. खोटं बोल आणि रेटून बोल हाच यांचा सिद्धांन्त आहे. यांनी स्वतः नव्याने एकही योजना सुरु केली नाही. आमच्याच सर्व योजनांची नावे बदलून त्यांच्या नेत्यांची नावे दिली. आम्ही जे प्रकल्प मंजूर केले होते उदा. चांद्रयान मोहीम, बुलेट ट्रेन, शिवस्मारक, आंबेडकर स्मारक, जलसंधारण व मेगापाणलोट विकास, शेततळी वगैरे. तेच त्यांनी पुढे चालवून फक्त उद्‌घाटने केली व जणू काही स्वतः प्रकल्प केले असा आभास निर्माण केला.

रोजगार हमीशी निगडीत असणारी शंभर टक्के अनुदानावरची फळबाग योजना यांनी बंद केली. गोरगरीबांना अत्यंत नाममात्र किमतीत दिले जाणारे अन्नधान्याचे वाटप बंद केले. मुख्य म्हणजे सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सरकारच्या काळात झाल्या. केंद्र सरकारनेच प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तकामध्ये 16 हजार शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविल्याची नोंद आहे. शेती आवाक्याच्या बाहेर गेल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो आहे. आज शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. तो प्रचंड कर्जबाजारी झाला आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, रोग व किडींच्या साथी या व यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे तो उध्वस्त झाला आहे. त्यात बाजारात आर्थिक मंदी. कुठल्याच शेतमालाला भाव नाही व उठावही नाही. भरीला निर्णय नोटबंदीसारखे. जीएसटी आणि नोटबंदी यांनी सगळा व्यापारी, कामगार, शेतकरी, मजूर, उद्योजक मारुन टाकला आहे. लाखो लोकांच्या नोकऱ्या व रोजगार गेले आहेत. त्यांचे संसार रस्त्यावर आले आहेत. नवीन रोजगार तर निर्माणच होत नाहीत. सरकार मात्र रिझर्व्ह बँकेवर डल्ला

मारते आहे. मूठभर उद्योगपतींची घरे भरते आहे. उद्योगपतींचे कर्ज भरायला सरकारजवळ पैसे आहेत पण शेतकऱ्याला संपूर्ण कर्जमाफी द्यायला सरकारचा हात थरथरतो आहे. दीड लाखाची कर्जमाफी देतो असे सांगून दात कोरुन पोट भरायचं काम चालू आहे.

शाळा, महाविद्यालयातून शेकडो मुले शिकून बाहेर पडताहेत. त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. अभियांत्रिकीच्या निम्म्याहून अधिक जागा रिकाम्या पडल्या आहेत. मुले इंजिनियर व्हायला सुद्धा तयार नाहीत. कारण शिकून नोकऱ्या लागत नाहीत. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे कुणी उद्योजक गुंतवणूक करायलाच पुढे येत नाही. अनेक ठिकाणचे कारखाने बंद होत आहेत. तरुणांच्या हाताला काम नाही. ते रिकामे हात शांत कसे राहतील? ते प्रसंगी कायदा हातात घेतल्याशिवाय राहणार नाहीत. एकंदरीत मोदी व फडणवीस सरकार हे निव्वळ भावनेच्या आधारावर जनतेचा मूर्ख बनवित आहे. पण भावनेवर पोट भरत



नाही. त्यासाठी अन्नाचे दोन घास प्रत्यक्ष पोटातच जावे लागतात. भुकेचा आगडोंब सत्ताधाऱ्यांना कसा व केव्हा कळेल ! त्यामुळे या निवडणुकीत जनता युती सरकारला खाली खेचल्याशिवाय राहणार नाही. कारण जनतेत फार अशांतता व सरकारबद्दल नाराजी आहे. लोक जाहीरपणाने ती बोलून दाखविताहेत.

**प्रश्न – पण त्यांनी निवडणुकीपूर्वीच पुलवामासारखा एखादा भावनिक प्रश्न निर्माण केला किंवा राम मंदीराचा निर्णय आणला तर त्याचा काय परिणाम होईल?**

**पवार –** खरं तर जनतेने आता सावध होऊन भावनिक प्रश्नांनी भुलून जाता कामा नये. भावनेवर पोट भरत नाही. काश्मीरचे 370 कलम रद्द केलं म्हणून आपल्याला घरात दोन वेळची भाजी भाकरी कोणी आणून देणार नाही. त्यासाठी आपल्याला काम करावेच लागेल. धंदे बंद पडले तर काम कोण देईल? समजा उद्या न्यायालयाने बाबरी मशिदीच्या जागी राममंदीर बांधण्याचा जरी निर्णय दिला तरी त्या निर्णयाने आपले पोट भरणार नाही. मंदीर बांधले काय किंवा न बांधले काय याने लोकांच्या जीवनात काहीही फरक पडत नाही. शेवटी भुकेलेल्या













पोटी मनुष्य तत्त्वज्ञान ऐकत नाही, न्याय-अन्यायाचा विचार करीत नाही आणि प्रार्थनेसाठीही कुणापुढे वाकत नाही, असे सेन्साचे प्रसिद्ध वाक्य आहे. त्यामुळे भावनिक प्रश्न प्रबळ करुन सरकारने मतांचा कितीही जोगवा मागितला तरी जनतेने त्याला बळी पडता कामा नये. पाच वर्षे हे सरकार आपल्या भावनांशी व संसाराशी खेळून त्याने आपल्याला उध्वस्त केले आहे. तेव्हा मतपेटीतून हे सरकार आपल्याला खाली खेचायचे आहे एवढाच निर्धार मतदारांनी बाळगला पाहिजे.

**प्रश्न – सरकारने गडगिल्ले हॉटेलांसाठी भाड्याने देऊन तिथे पर्यटन केंद्र विकसीत करण्याचे ठरविले आहे. हे छत्रपती शिवाजी महाराजांचे 'प्रमोशन' आहे का?**

**पवार –** छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले व विकसीत केलेले किल्ले, गड ही आपल्या प्रत्येकाच्या स्वाभिमानाची प्रतीके ाहेत किल्ले, गड हा नुसता शब्द जरी उच्चारला तर आपली मान नम्रपणे महाराजांच्या मनोमन समोर येणाऱ्या प्रतिमेपुढे झुकते.



किल्ले, गड हाच छत्रपतींचा इतिहास आहे. हिंदवी स्वराज्य उभे करण्यासाठी त्यांनी रक्ताचे पाणी केले. नल-युधिष्ठिरापासून भोज-विक्रमादित्यापर्यंत अनेक राजे पुण्यश्लोक म्हणून गणले गेले. पण समकालीनांनी आणि उत्तरकालीनांनी मोठ्या श्रद्धेने जो राजा ईश्वरी अवतार मानला, असे एकटे च6पती शिवरायच आहेत. त्यांच्या गडांवर, किल्ल्यांवर महाराजांच्या तलवारीची, त्यांनी केलेल्या गनिमी युद्धांची चमक बघायला मिळते. पण आजच्या राज्याकर्त्यांना हा इतिहास नकोसा आहे. त्यांना मुस्लिमांच्या विरोधी शिवाजी हेच चित्र समाजात उभे करुन त्यावर आपली राजकीय पोळी भाजायची आहे. या गड, किल्ल्यांच्या दुरुस्ती, देखभालीकडे लक्ष द्यायला, त्यासाठी पुरेसा निधी द्यायला सरकारला वेळ नाही. पण जिथे शौर्याचा इतिहास घडला तिथे आता हॉटेल व मनोरंजनाची केंद्रे काढून संगीतबारी चालवायची आणि लोकांना छमचम दाखवायचा उद्योग सरकार सुरु करणार आहे. इतिहासाचे असे वाटोळे करुन महाराष्ट्राची केवढी मोठी बदनामी करण्याचे काम सरकार करीत आहे.

खोटा इतिहास लिहून इतिहासाला विकृत वळण देण्याचे

काम सध्याच्या राज्यकर्त्यांनी चालविले आहे. अनेकांच्या मनात वर्तमानात हिंदू विरुद्ध मुसलमान अशा प्रकारचा झगडा असतो. स्वतःच्या मनातील हा असत्य आणि अनुचित संघर्ष मागच्या इतिहासामध्ये पाहण्याची काहींची धडपड असते. या दृष्टीने शिवाजी महाराजांकेड हिंदूंचा राजा म्हणून आणि त्यांच्या कार्याकडे मुसलमानांच्या विरुद्ध हिंदूंचा उठाव म्हणून पाहणे काही जणांना आवडते. प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या चरित्रात अशा धार्मिक संघर्षाला फारसा वाव नाही. ते स्वतः हिंदू धर्मीयांच्या धार्मिक राजवटीच्या निर्मितीसाठी झगडत नव्हते. त्यांच्या स्वतःच्या आरमारात दर्यासारंग, दौलतखान, इब्राहीमखान असे अनेक मुस्लिम अधिकारी होते. त्यांच्या फौजेत विजापूरहून आलेले सातशे पठाणही होते. त्यांनी स्वतः सर्व मुस्लिम धर्मस्थानांना संरक्षण देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. आजचे राज्यकर्ते मुस्लिमांना आम्ही दिलेले पाच टक्के आरक्षण सुद्धा देऊ इच्छित नाहीत. शिक्षण, नोकऱ्या यात मुस्लिम समाज खूप मागासलेला आहे. त्याला आपल्या बरोबरीने पुढे आणल्याशिवाय संपूर्ण देशाचा विकास होणार नाही. म्हणून आम्ही त्यांना आरक्षण दिले. फडणवीस सरकारने ते रद्द केले.

**प्रश्न – राष्ट्रवादीचे खूप नेते पक्ष सोडून गेले त्याकडे आपण कसे पाहता?**

**पवार –** खूप नेते हा शब्द बरोबर नाही. तसे म्हणता येणार नाही. हाताच्या बोटावर मोजता येतील इतके स्वार्थी लोक गेले आहेत. जाणाऱ्यांची पर्वा व चर्चा करण्याचे कारण नाही. मी तर त्यांचे नाव देखील घेत नाही आणि पक्षातल्या लोकांनीही त्यांची नावे घेऊ नयेत. सत्तेसाठी लाचार होऊन पक्ष सोडणारे उद्या इतिहासजमा होतील. 1980 साली माझ्या पक्षाचे 56 आमदार निवडून आले होते. त्यावेळी मी काही कामानिमित्त परदेशात गेलो. येऊन पाहतो तो 50 आमदार मला सोडून गेले होते. फक्त सहा उरले होते. आम्ही परत राज्यभर हिंडून पक्ष बांधणी केली आणि पुढच्या वेळेला 60 आमदार निवडून आले. जे सोडून गेले होते त्या सगळ्यांना मतदारांनी त्यांची जागा दाखविली आणि घरी बसविले. यावेळीही पुन्हा तसेच घडेल.

बारकाईने पाहिले तर तुमच्या लक्षात येईल नेते पक्ष सोडून गेले असले तरी कार्यकर्ते जागेवर आहेत. ते नेत्यांबरोबर गेलेले नाहीत. शेवटी तळातला सक्रीय, क्रियाशील कार्यकर्ता हाच पक्षाचा मुख्य आधार असतो. कार्यकर्ता घराघरात जातो आणि पक्षाचा विचार व काम लोकांपर्यंत पोहोचवितो. अजूनही राष्ट्रवादीचा कार्यकर्ता पक्षाशी एकनिष्ठ आहे. नेते पक्ष सोडून गेल्यामुळे संतप्त झालेला कार्यकर्ता अधिक जोमाने कामाला लागला आहे. हा कार्यकर्ताच आता गद्दार नेत्याला त्याची जागा दाखवेल असा मला विश्वास आहे.

आता खूप मोठ्या संख्येने तरुण कार्यकर्ते पक्षात येऊ लागले असून त्यांनाही कामाची संधी, पदे व उमेदवारी देण्याचे धोरण आम्ही स्वीकारलेले आहे. त्यामुळे पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांच्या जागा दुसऱ्या फळीतल्या कार्यकर्त्या व नेत्यांनी हस्तगत केल्या आहेत. नेतृत्त्वाची पोकळी भरुन निघाली आहे. म्हणून जाणाऱ्यांची मी फारशी चिंता करीत नाही.

सध्या धाकामुळे पक्षांतर होते आहे. राज्यात पूर्वीही



मेगाभरती झाली होती. परंतु ती या पद्धतीने नव्हती. 1957 च्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष पराभूत झाला आणि 1962 मध्ये पुन्हा सत्तेत आला. त्यावेळी अनेक नेते काँग्रेसमध्ये दाखल झाले. आता मात्र अर्थ व गृह विभागाकडून नोटीसांचा धाक दाखवित पक्षांतर घडवून आणले जात आहे.

**प्रश्न – सरकार जबरदस्ती करुन व धमक्या देऊन पक्षांतर करायला लावते आहे असा आरोप होतो. यात काही तथ्य आहे का?**

**पवार –** धमक्या, धाकदपटशा व भिती दाखविण्याचे काम मुख्यत्वे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून होते आहे. यापूर्वीही विरोधक अनेकदा सत्तेवर आले. पण अशा प्रकारे पक्षात भिती दाखवून भरती करुन घेण्याचा प्रकार कधीच घडला नव्हता. भाजप-सेनेने ज्या जागी त्यांच्याकडे मजूबत व विजयी होऊ शकतील असे उमेदवार नाहीत अशा ठिकाणी आमचे लोक ओढून घेतले आहेत. निरनिराळ्या कारणांनी व विविध हेतू समोर ठेवून हे पक्षांतर झालेले आहे. काही नेत्यांनी त्यांच्या संस्थांमध्ये गैरव्यवहार व भ्रष्टाचार केला आहे. त्यांना त्यावर सरकारकडून पांघरुन घालून हवे आहे. काहींना सत्ता, पैसा याची लालसा आहे. काहींना मंत्रीपदाची स्वप्ने दाखविली आहेत. काहींना जेलमध्ये घालण्यापासून अभय दिले आहे. काहींना पक्षात आला नाही तर संस्था बरखास्त करुन प्रशासक नेमू व तुम्हांला जेलची हवा खायला पाठवू अशी भिती दाखवून सक्तीने पक्षात प्रवेश करणे भाग पाडले आहे. निवडणुकीसाठी भल्या मोठ्या रकमा देण्याचे लालूच काहींना दाखविले आहे. थोडक्यात, सक्तीने मेगाभरती चालू आहे. पण अशा लोकांचा जनता पराभव करते हा इतिहास आहे.

**प्रश्न – सत्तेत राहिल्याशिवाय विकास होत नाही आणि विकास व्हावा म्हणून पक्षांतर करतोय असे काही नेते म्हणाले. हे कितपत खरे आहे?**

**पवार –** आमचा पक्ष 15 वर्षे सत्तेत होता. तेव्हा हेच लोक मंत्रीमंडळात होते, आमदार होते तेव्हा ते काय करत होते? आज त्यांना मतदारसंघाचा विकास आठवतो. 15 वर्षे ते काय गुरे वळत होते काय? विकासाच्या नावाखाली पक्षांतर करणाऱ्यांनी 15 वर्षे मंत्री असताना कोणाचा विकास केला स्वतःची की मतदारसंघाचा. हातात सत्ता असताना यांना मतदार संघाचा विकास आठवत नाही, दिसत नाही. त्यासाठी धडपडावं असं वाटत नाही आणि विरोधी पक्षात राहिल्यावरच विकास आठवतो कसा? असल्या नाठाळ बैलांना येत्या निवडणुकीत जनतेने बाजार दाखविला पाहिजे. मी गेली 55 वर्षे राजकारणात आहे. त्यातला जवळपास निम्मा काळ माझा विरोधी पक्षातच गेला आहे. पण माझा अनुभव असा आहे की विरोधी पक्षात असतानाच मतदारसंघाच्या विकासाची अधिक कामे होऊ शकतात. मतदारसंघाकडे लक्ष द्यायला खूप वेळ मिळतो. मतदारांशी सतत संपर्क राहिल्यामुळे त्यांचे प्रश्न, अडीअडचणी लगेच समजतात आणि सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करण्यास अधिकारीही तत्पर असतात. अर्थात तुमचे अधिकाऱ्यांशी कसे संबंध आहेत यावर बरेच अवलंबून असते. आम्ही जेव्हा सत्तेत होतो, तेव्हा त्या त्या जिल्ह्यांची जबाबदारी पालकमंत्री या नात्याने संबंधित मंत्र्यांवरच असायची. शासनही पूर्णपणाने त्यांच्या पाठिशी असायचे. डीपीडीसीचा पैसा कसा खर्च करावा हे तेच ठरवित होते. तेव्हा विकास करण्यासाठी त्यांना कुणीही रोखले नव्हते.

विकासाच्या नावाखाली पक्ष सोडून पळून जाणाऱ्यांना लाज कशी वाटत नाही. 15 वर्षे मंत्री होते तेव्हा यांनी काय केले? इतकी वर्षे हे काय शेतातले तण उपटत होते? आता विकास करण्यासाठी तिकडे जातो असे सांगताना यांना शरम, लाज कशी वाटत नाही. राजकारणात अशा खोड्या करणाऱ्यांना जनताही वेळ येताच त्यांची योग्य जागा दाखविल्याशिवाय राहात नाही.



जम्मू काश्मीरच्या ३७० कलमावर संसदेत बोलताना सुप्रिया सुळे

लोकांना असले स्वार्थी, दलबदलू व भ्रष्ट नेते नाही आवडत. ज्या पक्षाने मोठे केले, पक्ष नेतृत्वाची संधी देऊन नेते बनविले ते पक्षांतर करताना लोक विचारतातच, "का हो काय कमी पडले? कुणाच्या जीवावर हे सगळं झालंय. कुठे कष्ट करायला गेला होता का? सत्तेचे सगळे फायदे उपटले. आधी स्वतःचा सगळा विकास करुन घेतला. आणि आता मतदारसंघाचा विकास आठवला काय?" लोकांच्या या प्रश्नांना हे नेते कोणत्या तोंडाने व काय उत्तर देणार आहेत! त्यामुळे मला चिंता वाटत नाही. एकदा बटन दाबायची संधी आली, की यांचा विकास कुठे पाठवायचा त्याचा निकाल लोक स्वतः होऊन घेतील. जनता आता खूप शहाणी व हुशार झाली आहे. ती योग्य वेळी बरोबर निर्णय घेईल.

**प्रश्न – राज्यात शरद पवारांनी काय केले असा प्रश्न अमित शहा विचारत आहेत.**

**पवार –** पवार कधीही तुरुंगात गेलेले नाहीत. निरनिराळ्या गुन्ह्यांच्या आरोपांखाली ज्यांनी तुरुंगवास भोगलेला आहे त्यांना आम्हाला काहीही सांगायचे नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी कोण काय म्हणतंय, याची चिंता करु नये. त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेलेच बरे. काश्मीरला विशेष दर्जा देणारे 370 कलम रद्द केल्यानंतरही अमित शहांनी पवारांनी या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करावी असे विधान एका सभेत केले होते. एवढेच नव्हे तर त्यांनी या विषयावर सभागृहात सुप्रिया सुळे यांनी विरोधी मतदान केले असा आरोपही केला होता. परंतु सुप्रियाने तातडीने खुलासा करुन तो खोडून टाकला. सुप्रियाने मतदानच केले नाही. तिचे एकच म्हणणे होते की निर्णय करण्यापूर्वी स्थानिक जनतेला व नेत्यांना विश्वासात घ्यायला हवे होते. माझीही भूमिका व विचार त्याच प्रकारचे आहेत. पण ते आम्ही अमित शहांना सांगण्याचे काही कारण नाही.

**प्रश्न – महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कर्ज वितरणात 25 हजार कोटांचा घोटाळा झाल्याचा आरोप करुन 'ईडी' ने तुमच्यावर ठपका ठेवला आहे. त्याबद्दल काय सांगाल?**

**पवार –** 25 हजार कोटींचा घोटाळा हाच आरोप मुळात चुकीचा व लोकांची दिशाभूल करणारा आहे. बँकेकडे आज एकूण 15 हजार कोटींच्या ठेवी असून त्यांनी केलेले सगळे कर्जवाटप नऊ हजार कोटींचे आहे. त्यावेळी तर बँकेत ठेवी ११ हजार कोटीच होत्या. मग 25 हजार कोटींचा घोटाळा होईलच कसा? आकडे मोठेमोठे फुगवून सांगितले की जनतेचा विश्वास बसेल असा सत्ताधाऱ्यांचा समज असावा म्हणून ते गोबेल्स तंत्र वापरुन आकडे फुगवताहेत. सिंचन घोटाळ्यातही त्यांनी आकडे असेच फुगविले होते. सिंचनावर सुमारे 30 हजार कोटी रुपये खर्च झालेले असताना 70 हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला. लोकांनाही मोठे आकडे खरे वाटतात. कोणी फारसे खोलात जात नाही. पण यावेळी आम्ही सावध राहून लगेच खुलासा केला व 'ईडी'च्या कार्यालयात जाण्याचीही तयारी दर्शविली.

वास्तविक या शिखर बँकेचा मी कधीही साधा सभासद सुद्धा नव्हतो. संचालक नव्हतो आणि पदाधिकारीही नव्हतो. बँकेचे संचालक मंडळ नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेच्या अहवालावरुन बरखास्त झाले. या अहवालात माझ्या नावाचा कुठेही उल्लेख नाही. त्यानंतर सहकार कायद्याच्या कलम 83 आणि कलम 88 अन्वये बँकेची चौकशी झाली या चौकशी अहवालातही माझ्या नावाचा उल्लेख नाही. मी कुणाला कर्ज द्या अगर देवू नका असो बँकेला कधीही लेखी किंवा तोंडी सांगितलेले नाही. माझी तशी चिठ्ठी किंवा लेखी पत्र असेल तर बँकेने जरुर दाखवावे. या प्रकरणी 'ईडी'ने मला अद्याप नोटीस काढलेली नाही किंवा लेखी



पत्र देऊन माहिती घेण्यासाठीही बोलाविलेले नाही. मात्र प्रसार माध्यमांकडे एक प्रेसनोट पाठविण्यात आली. त्यात न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रात माझे नाव आहे अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या.

नेमका आपल्या विरुद्ध काय आरोप आहे? कोणता गुन्हा आपण केला आहे? याची माहिती घेण्यासाठी 27 सप्टेंबरला दुपारी दोन वाजता 'ईडी'च्या कार्यालयात मी जाण्याचे ठरविले. तसे दोन दिवस आधी जाहीर केले. कदाचित आम्हांला सोलापूर, नगर, साताऱ्च्या दौऱ्यात जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे सरकारकडून हे पाऊल टाकले गेले असेल. आता मग मला प्रश्न पडला. बँकेचे हे सगळे प्रकरण मागील 10-12 वर्षांपासून चालू आहे. मग आत्ताच विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर गुन्हा कसा दाखल होतो असा प्रश्न मला पडला. देशातल्या आणि राज्यातल्या सूज्ञ जनतेलाही हे कळून चुकले की सूड भावनेतून माझे नाव या गुन्ह्यात गोवले आहे. संपूर्ण देशभर आणि राज्यात त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली.

27 सप्टेंबरला लोक मोठ्या संख्येने मला पाठिंबा देण्यासाठी मुंबईला गोळा व्हायला सुरुवात झाली. लोक स्वेच्छेने, स्वतःच्या वाहनाने, स्वतःचे पैसे खर्च करुन येत होते. जागोजागी पोलिस गाड्यांना अडवित होते. त्यांची ओळखपत्रे पाहून तपासणी करीत होते. शक्यतो लोक 'ईडी'च्या कार्यालयाजवळ पोहचू नयेत याची पुरेपूर काळजी घेऊन मुंबई पोलिसांनी संपूर्ण शहरभर कडक बंदोबस्त लावला होता. तरीदेखील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल तेव्हा तुम्ही 'ईडी' च्या कार्यालयात जाऊ नका असे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी मला घरी येऊन सांगितले आणि तशी विनंती केली. 'ईडी' कार्यालयानेही मला इमेलवर पत्र पाठवून आज येऊ नका अशी विनंती केली. माझ्या जाण्याने

सामान्य जनतेला कोणताही त्रास होवू नये व कायदा आणि सुरक्षा बिघडू नये म्हणून 27 सप्टेंबरला 'ईडी' च्या कार्यालयात जाण्याचा निर्णय मी तहकूब केला. निवडणुकीनंतर पुन्हा काय बोलावणे आले तर मी जरुर चौकशीसाठी जाईन. मी लोकशाही मानणारा आणि राज्यघटनेवर श्रद्धा व विश्वास ठेवणारा आहे. त्यामुळे कर नाही त्याला डर कशाला? पण सरकार सूड भावनेने व राजकीय द्वेषाने पछाडलेले आहे हे या प्रकरणावरुन जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे ती सरकारवर संतप्त झाली आहे.

**प्रश्न – जम्मू काश्मिरमधून 370 कलम हटविण्याच्या भावनिक प्रश्नावर भाजप विधानसभा निवडणुकांसाठी मतदान मागणार आहे. त्यांचा हा प्रचाराचा प्रमुख मुद्दा असणार आहे. तो कितपत प्रभावी ठरेल?**

**पवार –** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत खरे तर जम्मू काश्मिरच्या 370 कलमावरुन मते मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मागील पाच वर्षांपासून भाजप-सेनेचे युती सरकार सत्तेवर आहे. या पाच वर्षांच्या काळात राज्याचा कोणता विकास केला. किती नवीन उद्योगधंदे व गुंतवणूक आणली. किती लोकांना नोकऱ्या दिल्या. नवीन रोजगार निर्मिती किती केली. सिंचनाचे किती प्रकल्प पूर्ण केले. शेतकऱ्यांचा व लोकांचा पाण्याचा प्रश्न सोडविला का? शहरांच्या समस्यांची सोडवणूक जाली का? भ्रष्टाचार मुक्त कारभार करणार होते, त्याचे काय झाले? मंत्र्यांनी जे घोटाळे व भ्रष्टाचार केला त्याची प्रकरणे आमच्या लोकांनी पुराव्यानिशी सभागृहासमोर मांडली. त्यांना मुख्यमंत्र्यांनी क्लीन चिट का दिली? शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी का दिली नाही? धनगर, मुस्लिम, लिंगायत यांच्या आरक्षणाचे काय झाले? मराठा समाजाला 10 टक्के आरक्षण दिले असे सांगितले. मग 72 हजार रिक्त जागा भरणार होते त्याचे काय झाले? मराठा समाजाच्या तोंडालाही पाने पुसली का? सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या भाजप सरकारच्या काळात झाल्या. हे व यासारखे अनेक प्रश्न आहेत ज्याचा येथल्या जनतेशी रोजचा जीवन मरणाचा संबंध आहे. या प्रश्नांची उत्तरे भाजपचे नेते कधी देणार आहेत? जनताही या निवडणुकीत या प्रश्नांचा जाब विचारल्याशिवाय राहणार नाही.

पुरामुळे सांगली, कोल्हापूर, पुणे, गडचिरोली, नाशिक व अनेक जिल्ह्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. लोकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. घरेदारे, गोठे, सामान, जनावरे, शेती वाहून गेली आहे. त्यांचे जगणे-मरणे संकटात सापडले आहे. त्यांच्या दृष्टीने काश्मीरचे 370 कलम ठेवले काय किंवा न ठेवले काय? त्यांना काय फरक पडतो. त्यांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. मराठवाडा दुष्काळाच्या छायेत होरपळतो आहे. लोकांना प्यायला पाणी नाही. मुख्यमंत्री मात्र लोक संकटात असताना महाजनादेश यात्रा काढून मते मागण्यात व्यस्त होते. हे जनतेला समजत नाही अशातला भाग नाही.

काश्मिरमधून 370 कलम काढले तर त्याचा महाराष्ट्रातील





सामान्य माणसांच्या जीवनावर काय व किती परिणाम होणार आहे? येथले किती लोक तिथे नोकरीधंद्यासाठी जाणार आहेत किंवा तिथे जाऊन मालमत्ता खरेदी करणार आहेत. महाराष्ट्रीयन जनतेला त्याचा फारसा फायदा नाही. फक्त प्रश्न भावनिक करायचा. लोकांच्या भावनेला हात घालायचा आणि भावनेच्या आधारे मते मागायची हा धर्मांध व जातीयवादी असणाऱ्या भाजपचा सुरुवातीपासूनचा अजेंडा आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीतही त्यांनी हेच केले. पुलवामा आणि बालाकोटचे

भूत उभे करुन भावनेवर मते मागितली. लोकांना खरे वाटले. आता लोकांच्या मनात शंका आहे खरंच बालाकोट झाले होते का? त्याचे खरे उत्तर कोणी देत नाही. त्यामुळे अजूनही संभ्रमावस्था आहे.  जनतेला आता भावनिक प्रश्न आणि त्यावरचे भाजपचे नाटक पूर्णपणे कळून चुकलेले आहे. त्यामुळे काश्मीर प्रश्नाचा आपल्याला काहीच फायदा नाही हे महाराष्ट्रातल्या तरुण, युवकांनाही व्यवस्थितपणे लक्षात आले आहे. त्यामुळे ते आता आमच्या येथल्या रोजगाराचे, नोकरीचे, व्यवसायधंद्याचे आधी बोला असे स्पष्टपणे सांगू लागले आहेत ते सरकारला जाब विचारण्यासाठी जागोजागी उभे राहताहेत ही चांगली गोष्ट आहे.

**प्रश्न – पाकिस्तानबद्दल तुम्हाला फार प्रेम आहे असे पंतप्रधान मोदी म्हणतात. खरे काय?**

**पवार –** पाकिस्तानातील सत्ताधारी आणि लष्करी अधिकारी स्वपक्षाकडे सत्ता राहावी म्हणून वारंवार भारताविरुद्ध

**प्रश्न – काश्मीरची परिस्थिती आता सुधारली असून शांतता प्रस्थापित झाली आहे असे सरकारकडून सांगितले जाते. वस्तुस्थिती काय आहे?**

**पवार –** कलम 370 हटवून आता जवळपास दोन महिने होऊन गेले आहेत. अजूनही तिथली जनता खुलेआमपणे रस्त्यावर फिरु शकत नाही. आपले सर्व व्यवहार करु शकत नाही. एक प्रकारची आणिबाणीसारखी परिस्थिती तिथे आहे. लोकांची मोबाईलची, इंटरनेटची आणि कम्युनिकेशनची जेवढी म्हणून अत्याधुनिक माध्यमे आहेत त्या सर्वांच्या सेवा बंद केलेल्या आहेत. म्हणजे स्थानिक जनतेला बाहेरच्या राज्यातल्या किंवा देशातल्या लोकांशी तर सोडाच पण जवळपासच्या लोकांशीही संपर्क साधता येऊ नये अशी व्यवस्था करुन केंद्र सरकारने तिथे दडपशाही चालविलेली आहे. तुम्ही वर्तमानपत्रात मलाला युसुफझाई यांनी लंडनमधून केलेले विधान वाचले असेल. तिचे





बोलत असतात हे माझे विधान पाकिस्तानची स्तुती करणारे आहे काय? हा माझा पंतप्रधानांना सवाल आहे. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी भाषण करण्यापूर्वी मी नेमके काय म्हणालो हे समजून घेतले असते व त्यासंबंधी अधिक माहिती घेतली असती तर बरे झाले असते. 52 वर्षे संसदीय राजकारणात असणाऱ्या व्यक्तीबद्दल बोलताना पंतप्रधानांनी माहिती न घेता बोलणे हे बरे नव्हे. मी देशाचा संरक्षणमंत्री होतो. चीन आणि पाकिस्तान काय व कसे आहेत हे मला चांगले माहिती आहे. मलाही बऱ्याच गोष्टी बोलता येतील. पण पंतप्रधानपदाची मला अप्रतिष्ठा करायची नाही. म्हणून मी सभ्यता पाळतो. क्रिकेट सामन्यांच्या, निमित्ताने मी पाकिस्तानला गेलो आणि तिथले मला आलेले एक-दोन अनुभव सांगितले तर त्यावरुन मला पाकिस्तानचे फार प्रेम आहे असा पंतप्रधानांनी निष्कर्ष काढणे पूर्णपणे चुकीचे आहे.





विधान काश्मीरमधल्या सद्यस्थितीवर प्रकाश टाकण्यास पुरेसे आहे. मलाला म्हणाली, “काश्मिरमध्ये 70 दिवसांपासून शाळा बंद आहेत. त्या तरी आधी सुरु करा.” मुले जर 70 दिवसांपासून शाळेत जात नसतील तर त्यांच्या शिक्षणाची किती हेळसांड होते आहे याकडे तिने जगाचे लक्ष वेधले. जर परिस्थिती सुधारली आहे तर जनजीवन सुरळीत होऊन पूर्वपदावर का येत नाही. मेहबुबा मुफ्ती असेल, फारुक अब्दुल्ला किंवा उमर अब्दुल्ला असतील त्यांना किती दिवस स्थानबद्ध करणार आहात? ते काय पाकिस्तानच्या बाजूने आहेत ? त्यांनी कायम भारताची बाजू घेऊन समर्थपणे देशाच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. वास्तविक ही कारवाई करण्यापूर्वी तिथल्या जनतेला आणि नेत्यांना विश्वासात घेऊन त्यांचे प्रबोधन केले असते तर एवढी दडपशाही व दहशत निर्माण करण्याची सरकारला गरज पडली नसती. राहूल गांधी, गुलाम नबी आझाद व अन्य नेत्यांनाही सुरुवातीला काश्मीरमध्ये जाण्यास मज्जाव केला. त्यांना विमानतळावर रोखण्यात आले. तिथून परत पाठविले. दुसऱ्यांदा गेल्यानंतर काही भागात जाऊ दिले नाही. हे रोखण्याचे वातावरण व चित्र कशाचे निदर्शक आहे. जर खुली हवा आहे व देशात कुठेही जाण्याचा आपल्या नागरिकांना अधिकार आहे तर मग ही बंदी किती दिवस चालू ठेवायची आणि ती घालणे तरी बरोबर आहे का? यावरुन आपल्या लक्षात येईल काश्मीरातली हवा व तिथल्या जनतेचा श्वास अजून मोकळा झालेला नाही. तो गुदमरलेला आहे.

काश्मीरमध्ये आज निव्वळ शांतता नसून स्मशान शांतता आहे.काश्मीरसारखे भावनिक मुद्दे मांडून सामान्य माणसांच्या मूळ जगण्याशी संबंधित असलेल्या प्रश्नांना सरकार बगल देत आहे.


# सिंचन व शिखर बँक घोटाळा हा भाजपने उभा केलेला बागुलबुवा

- डॉ. सुधीर भोंगळे








MSC BANK
छत्रपतींचे घेतलात आशिर्वाद
आणि करताय अफझल खानासारखे वार
हा महाराष्ट्र छत्रपतींचा,
हा महाराष्ट्र शाहु-फुले-आंबेडकरांचा,
हा महाराष्ट्र यशवंतरावांचा,
हा महाराष्ट्र शरद पवार साहेबांचा
आज महाराष्ट्राचा
काळा दिवस

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत (शिखर बँक) 25 हजार कोटींचा घोटाळा झाला असा धादांत खोटा प्रचार राज्य सरकारने व विशेषतः भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी जाणीवपूर्वक व हेतुतः चालविलेला आहे. राज्य बँकेच्या सर्व प्रकारच्या ठेवींची रक्कम आज 15 हजार कोटींच्या आसपास आहे आणि कर्जवाटपाची एकूण रक्कम नऊ हजार कोटींच्या आसपास आहे. मग पहिला प्रश्न निर्माण होतो 25 हजार कोटींचा घोटाळा होईलच कसा? वाट्टेल ते मोठमोठे खोटेनाटे आकडे जनतेच्या तोंडावर फेकून विरोधी पक्षांबद्दल व त्यांच्या नेत्यांबद्दल जनतेत गैरसमज पसरवून त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न भाजपने सातत्याने चालविलेला आहे. असाच प्रकार त्यांनी “70 हजार कोटींचा सिंचन घोटाळा” या नावाखालीही केला होता. खोटेनाटे आरोप करुन जनहित याचिकांच्या नावाखाली ही प्रकरणे न्यायालयात न्यायची आणि त्यांच्यामार्फत व त्यांच्या नावाखाली आपली राजकीय दुकानदारी चालविण्याचा धंदा सत्ताधारी भाजपाने चालविलेला आहे. गोबेल्स तंत्राचा वापर करुन आणि ‘खोटं बोल पण रेटून बोल’ या न्यायाने रडीचा डाव खेळत असलेल्या फडणवीस सरकारच्या असत्याचा पर्दाफाश करुन सत्य जनतेच्या निदर्शनास आणावे इतक्या मर्यादित हेतूने लेखाची मांडणी केलेली आहे. सगळं सविस्तर लिहायचं ठरविलं तर एक मोठा ग्रंथ होईल. पण तेवढी जागा व वेळ नसल्याने थोडक्यात पण महत्त्वाच्या मुद्दांना या लेखात स्पर्श करणार आहे.





## सिंचन घोटाळ्याचे भूत

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त झालेल्या चर्चासत्रात जलसंपदा विभागाने निर्माण केलेली सिंचनक्षमता आणि केलेला खर्च यासंबंधी जाणीवपूर्वक व हेतूतः खोटी माहिती देऊन एक मोठे खोटे वादळ उभे करण्यात आले. 2001 ते 2010 या दहा वर्षांच्या काळात 71 हजार कोटी रु. खर्च करुन 0.1 टक्के सिंचन निर्मितीत वाढ झाली व 70 हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला असा खोटा प्रचार करण्यात आला. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला बदनाम करण्यासाठी हे सिंचन घोटाळ्याचे भूत उभे करण्यात आले. जनतेला असे मोठमोठे आकडे ऐकले की ते खरे वाटण्याचीच शक्यता जास्त असते. शिवाय मोदी-फडणवीस सरकारकडून खोटा प्रचार करण्यासाठी मोठी पगारी व प्रचारी यंत्रणा उभी करण्यात आलेली असल्यामुळे सोशल मिडीया, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे व इतर सर्व माध्यमांचा वापर करुन काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला बदनाम करण्याची मोठी मोहिम राबविली गेली. खोट्या आरोपांच्या प्रचाराला जनताही बळी पडली. सत्याचा शोध घेण्याच्या भानगडीत जनता पडली नाही. आघाडी सरकारनेही सत्य जनतेच्या गळी उतरविण्याचा आटोकाट प्रयत्न केला नाही. त्यामुळे जनतेच्या सारा प्रकार आता लक्षात आला आहे व भाजपाने आपली कशी फसवणूक केली हे जनता समजून चुकली आहे.

## म्हशीपेक्षा रेडकू मोठे !

2000 ते 2001 पासून 2010-2011 पर्यंत म्हणजे 10 वर्षांत सिंचन क्षेत्रात झालेला एकूण खर्च 42 हजार 435 कोटी रुपये इतका होता. या खर्चाची फोड करुन सांगायची झाल्यास 6300 कोटी रुपये भूमी संपादन व पुनर्वसनावर खर्च झाले आहेत. 5600 कोटी रुपये कर्मचाऱ्यांच्या आस्थापनेवर (म्हणजे पगार, भत्ता, गाडी वगैरे) खर्च झाले होते. प्रकल्पांच्या बांधकामावर झालेला खर्च 30 हजार, 500 कोटी रुपये इतका होता. त्यातला 9500 कोटी खर्च ज्या बांधकामाधीन प्रकल्पांमध्ये पाणीसाठा/सिंचन क्षमता निर्माण झाला नाही अशा प्रकल्पांवरचा आहे. आता साधी गोष्ट लक्षात घ्या 2001 ते 2010 या दहा वर्षात प्रकल्पाच्या बांधकामावर 30 हजार, 500 कोटी रुपये खर्च झालेला असताना 70 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होईलच कसा? त्यावेळी गृहमंत्री असलेले श्री. आर.आर.पाटील यांनी 'म्हशीपेक्षा रेडकू कसे मोठे होईल' असे वाक्य उच्चारले होते आणि सभागृहाने त्याला खळखळून हसून दाद दिली होती.

## सिंचनात वाढ पाच टक्के

2001 ते 2010 या दहा वर्षात फक्त 0.1 टक्के वाढ सिंचनात झाली असा जो धादांत आरोप भाजपने केला त्याला योग्य, खरे व समर्पक उत्तर देण्यास सिंचन खात्याच्या सचिवांनी विलंब केला. त्यांनी जर त्याच वेळी सत्य वस्तुस्थिती जनता व सभागृहासमोर ठेवली असती तर भाजपच्या खोट्या प्रचाराला आळा घालता आला असता. आजही भाजपवाले खोटा प्रचार करीतच आहेत. आपण जनतेला सत्य समजावून सांगितले पाहिजे की, 2001 ते 2010 या काळात सिंचीत क्षेत्र 17.64 लाख हेक्टरवरुन 29.55 लाख हेक्टरवर गेले. म्हणजे प्रत्यक्ष सिंचीत झालेले क्षेत्र सुमारे 12 लाख हेक्टरने वाढलेले आहे.

जून 2011 अखेर जलसंपदा विभागाची निर्मित सिंचन क्षमता ही 48.25 लाख हेक्टर होती. जून 2001 मध्ये हाच आकडा 37.06 लाख हेक्टर होता. म्हणजे दहा वर्षात निर्मित सिंचन क्षमतेत 10.19 लाख हेक्टरची (48.25 वजा 37.06 =




गोसीखुर्दचा कालवा

10.19) भर पडली होती. 2011-12 या वर्षात पिकाखालील स्थूल क्षेत्र २१६.१९ लाख हेक्टरवरुन २२६.१२ लाख हेक्टर असे वाढले असल्याचे महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात नमूद केले आहे. हे स्थूल क्षेत्र विचारात घेऊनही राज्यस्तर प्रकल्पातून प्रत्यक्ष सिंचीत क्षेत्राची पिकाखालील स्थूल क्षेत्राशी दहा वर्षात टक्केवारीत झालेली वाढ 5 टक्के येते. म्हणजे आघाडी सरकारच्या 2001 ते 2010 या दहा वर्षांच्या काळात सिंचनात झालेली वाढ 0.1 टक्के नसून ती 5 टक्के एवढी मोठी आहे. पण भाजपने खोटा प्रचार केला आणि जनतेच्या डोळ्यात धूळ फेकली. आजही भाजपचे सत्ताधारी हेच काम करीत आहेत.

## सिंचनाचे आकडे कुठे गेले?

गेल्या पाच वर्षांत म्हणजे फडणवीस सरकारच्या काळात प्रत्यक्ष सिंचन किती झाले व सिंचन क्षमता निर्मितीत नेमकी किती वाढ झाली याची खरी तर सोडाच पण खोटीसुद्धा आकडेवाडी सरकारकडून आर्थिक पाहणी अहवालात नमूद केली जात नाही. 60 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असे सांगतात. आघाडी सरकारच्या काळात ही सिंचन क्षमता 48 लाख हेक्टर होती. त्यात युती सरकारने 12 लाख हेक्टरची भर घातली असा जर फडणवीस सरकारचा दावा असेल तर तो त्यांनी सिद्ध करुन दाखवावा. पंतप्रधान सिचाई योजनेतून महाराष्ट्राचे पूर्ण होत आलेले 26 प्रकल्प निवडले. त्यांना तुटपुंजी रक्कम दिली आणि ते पूर्ण झाले असे दाखविले. इतकेच नव्हे तर मोठा खोटारडेपणा असा केला आहे की एखादे धरण पूर्णपणाने भरले असेल तर त्याची कागदावरची सिंचन क्षमता (प्रोजक्ट रिपोर्ट) लक्षांत घेऊन तेवढे क्षेत्र भिजले असे सांगून टाकले. प्रत्यक्षात भिजलेले क्षेत्र आणि प्रकल्पाची सिंचन क्षमता क्षेत्र यातले जे अंतर (गॅप) ते कमी करुन टाकले. म्हणजे सिंचन नेमके किती झाले याची आणि खर्च किती झाला याची माहितीच कोणालाही देत नाहीत. कोणत्याच प्रदेशात काम झाले नाही. मुख्यमंत्र्याच्या विदर्भातील गोसीखुर्दचे कामही तसेच रखडलेले आहे. जलसंपदा मंत्री गिरीष महाजन हे ज्या





बाळगंगा प्रकल्प

जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथून निवडून येतात तिथेही पाच वर्षात एकाही प्रकल्पाचे वा योजनेचे काम झालेले नाही. नवीन कोणत्याही धरणाची घळभरणी झालेली नाही. सिंचनाचा अनुशेष तर गुंडाळून ठेवला. तोंडाला पाने पुसण्यासाठी दरवर्षी 200 ते 250 कोटी रु. अनुशेषाला देतात. राज्यपालांचा आदेश धाब्यावर बसविला आहे. कृष्णा-मराठवाडा योजनेसाठी 50 कोटी दिले तर पाणी लगेच येईल. पण पैसे टनेलला देताहेत.

पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, खानदेश, पश्चिम विदर्भ सगळे प्रादेशिक विभाग रोज सरकारच्या नावाने बोंबा मारताहेत. पण कुणालाच सिंचनाच्या कामासाठी पैसे मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. फडणवीस सरकारने सिंचनाच्या


टेंभू उपसा सिंचन योजना




ताकारीचा कालवा

कार्यक्रमाला कुलूप लावून राज्य 10 वर्षे विकासात मागे नेले आहे. महाराष्ट्राच्या सिंचन कार्यक्रमाचे ज्यांनी पूर्ण वाटोळे केले आणि दुष्काळी व पूरग्रस्त शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देऊन त्यांच्या जीवनाची माती केली त्या भाजप-सेना युती सरकारने तरी आता सिंचन घोटाळा हा शब्द पुन्हा उच्चारु नये. तसे करण्याचा जो जाणीवपूर्वक प्रयत्न करेल त्याला जनतेने वेळीच रोखून खोटं बोलण्यापासून रोखलं पाहिजे आणि त्यानेही आवरत नसेल तर खोटं बोलणाऱ्याला जनतेने जोड्याने मारले पाहिजे. आता आपण एकदा खोटं बोलण्याला फसलो आहोत. रोज रोज फसण्यात शहाणपण नाही.




## राज्य सहकारी बँकेची स्थापना

सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या, नागरी सहकारी बँका, सहकारी मजूर सोसायट्या या सर्वांचा राज्य सहकारी बँकेशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असतो. शेती व ग्रामीण विकासासाठी मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा व्हावा या उद्देशाने जिल्हा मध्यवर्ती, भूविकास व राज्य सहकारी बँकेची स्थापना झालेली आहे. महाबळेश्वर येथे झालेल्या काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात जेव्हा कृषि-औद्योगिक क्रांती करुन शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करण्याचा निर्णय झाला तेव्हा सहकारी साखर कारखाने व सहकारी सूतगिरण्या यांना प्रोत्साहन देण्याचे ठरले. त्यातून या संस्थांची उभारणी सुरु झाली. 1962 ते 1966 या काळात थोर अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ हे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. त्या काळात अध्यक्षपदावरुन त्यांनी बँकेसंबंधी जी भाषणे केली ती गोखले अर्थशास्त्र संस्थेने 1974 मध्ये 'ध.रा.गाडगीळ लेखसंग्रह, खंड 2' मध्ये 206 ते 220 या पानांवर प्रसिद्ध केली आहेत. ती जर आपण बारकाईने वाचली तर आपल्याला आज जो दुष्काळ, थकबाकी, कर्जाची वसुली न होणे, जप्ती व लिलाव करावा लागणे या ज्या समस्या जाणवताहेत त्या त्या काळी म्हणजे 60 वर्षांपूर्वीही जाणवत होत्या हे लक्षांत येईल. त्याकाळी सहकार चळवळीकडे बघण्याचा सरकारचा दृष्टीकोन सहानुभूतीचा, मदतीचा आणि प्रोत्साहन देण्याचा होता. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला ऊस गाळला जावा, त्याला त्याच्या उसाची रास्त किंमत मिळावी व शेतकऱ्यांच्या मालकीचे सहकारी साखर कारखाने व्यवस्थित चालावेत या हेतूने सरकार स्वतः जबाबदारी घेऊन या कारखान्यांच्या व सुतगिरण्यांच्या कर्जाला हमी देत असते. प्रसंगी गॅरंटीची रक्कमही सरकारी तिजोरीतून बँकेला भरत असे. म्हणजे सरकार आणि सहकार या दोघांनी मिळून हातात हात घालून काम करावे अशी अपेक्षा होती आणि आहे देखील.

## शिखर बँकेचा कर्जपुरवठा

महाराष्ट्राला दर तीन-चार वर्षांनी दुष्काळाचा सामना करावा लागतो. मराठवाड्यासारखा भाग तर गेली 3-4 वर्षे सलग व नियमितपणे दुष्काळ अनुभवतो आहे. दुष्काळामुळे गळीतासाठी आवश्यक असणारा ऊस पुरेसा उपलब्ध होत नाही. (2500 टनाचा कारखाना 160 दिवस पूर्ण क्षमतेने चालवायचा असेल तर चार लाख टन ऊस लागतो.) कारखाने चालवायलाही बऱ्याचदा पाणी नसते. त्यामुळे गळीत हंगाम सुरु करुन तो व्यवस्थितपणे पूर्ण पार पाडण्यासाठी साखर कारखान्यांनी राज्य व जिल्हा सहकारी बँकांकडून जे कर्ज उचललेले असते त्याची परतफेड त्यांना करता येत नाही. शेतकरीही ऊस न पिकल्यामुळे




बँकेचे कर्ज भरु शकत नाही. म्हणजे शेतकरी आणि कारखाना दोघेही थकबाकीदार होतात. तसा खोलात जाऊन विचार केला व बारकाईने पाहिले तर 1970 नंतर शेतकरी व सहकारी संस्था यांना सर्वाधिक म्हणजे जवळपास 80 टक्के कर्जपुरवठा हा राज्य व जिल्हा मध्यवर्ती बँकांनी केलेला आहे. राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांनी गेल्या 50-60 वर्षात शेती, शेतकरी आणि सहकारी संस्था यांना पुरविलेल्या कर्जाचे प्रमाण जेमतेम 20 टक्क्यांच्या आसपास आहे. ज्यांना याबाबत अधिक अभ्यास करावयाचा आहे व वस्तुस्थिती पडताळून पाहायची आहे त्यांना 'बँक ऑफ महाराष्ट्र' मधून या कर्जपुरवठ्यासंबंधीची सगळी आकडेवारी मिळू शकेल. आज देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात शेती व सहकार क्षेत्रात जी दैदीप्यमान प्रगती झालेली दिसते ती सहकारी बँकांमार्फत झाली आहे या सत्याकडे कोणालाही कानाडोळा करता येणार नाही.


सुतगिरणी

## राज्य बँकेवरील कारवाई

2010-11 च्या सुमारास नाबार्ड व रिझर्व्ह बँक यांच्या अहवालाच्या आधारे राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन तिथे प्रशासकीय मंडळ नेमण्यात आले. ही कारवाई करताना कर्जाचे अनियमीत वाटप झालेले आहे. सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्यांकडे कर्जाची मोठी थकबाकी जमा झाली आहे, व्याजाचा बोजा दिवसेंदिवस वाढतो आहे; बऱ्याच संस्था एन.पी.ए. मध्ये गेल्या आहेत त्यामुळे कर्जवसुलीची शक्यता राहिलेली नाही, कर्ज देताना संस्थांकडून पुरेसे व काहीही तारण घेतलेले नाही, अनेकांना नियम शिथिल करुन कर्ज दिलेले आहे अशी व यांसारखी अनेक कारणे दिली गेली. 1088 कोटी रुपयांची कर्जवाटपात अनियमितता झाली होती असे सरकारच्या वतीने सभागृहात सांगण्यात आले होते.




बँकेच्या तत्कालिन संचालक मंडळाने त्यावेळी सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या संस्थांना नियम शिथिल करुन कर्ज दिले हे जरी खरे असले तरी त्यामागचा उद्देश एकदा पूर्वग्रहदूषितपणा टाळून डोळे उघडून तपासला पाहिजे. शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या मालावर प्रक्रिया व्हावी, त्याला माल फेकून देण्याची वेळ येऊ नये किंवा विल्हेवाट कशी लावावी असा प्रश्न निर्माण होऊ नये आणि त्याला मालाची काही का होईना किंमत मिळावी या भावनेने नियम शिथिल करुन कर्ज दिले होते. यामागे कारखाना चालावा, कामगारांना काम मिळावे आणि या गिरण्या व कारखान्यांवर अवलंबून असणाऱ्यांचेही व्यवसाय, धंदे चालावेत हा उदात्त हेतू होता. या अनियमितता झालेल्या बहुतांश रकमेची मागील 8-9 वर्षांत बऱ्यापैकी वसुली झालेली आहे. त्यामुळेच गेल्या तीन वर्षांपासून बँक पुन्हा नफ्यात आलेली आहे.

## सहकारावर सरकारची वक्रदृष्टी

महाराष्ट्रातील बहुतांश सहकारी संस्था या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या व नेत्यांच्या ताब्यात आहेत. भाजप आणि सेनेच्या नेत्यांनी सहकारी संस्थांची स्वतःला तोशीष लावून कुठेही फारशी उभारणी केलेली नाही. जर यदाकदाचित सेना-भाजप लोकांच्या हातात सहकारी संस्था असतील तर त्यांनी त्या ऐनकेन प्रकाराने निवडणुकीतून जिंकल्या तर दर तीन-चार वर्षांनी अडचणीत येतो. कर्ज थकते. त्यातून संस्थांना, उद्योगांना बाहेर काढण्यासाठी निरनिराळ्या प्रकारची मदत करावी लागते. तशी धोरणे सरकारला स्वीकारावी लागतात. आज जसे आपण पाहतो की आर्थिक मंदीतून देशातील उद्योगांना बाहेर काढण्यासाठी अर्थमंत्री मा. निर्मला सीतारामन यांनी अनेक निर्णय घेऊन योजना जाहीर केल्या आहेत. यामागचा मुख्य उद्देश धंदे व्यवस्थित चालावेत व कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळू नये हाच असतो. असेच सारे हेतू डोळ्यांसमोर ठेवून केंद्रीय



असतील पण स्वतः नक्कीच उभारलेल्या नसतील. कारण विधायक भरीव काम करण्याची व तेही शेतकऱ्यांच्या उपयोगी पडणारे काम करण्याची भाजप-सेनेला सवयच नाही. विधायक कामाऐवजी विध्वंसक काम मात्र ते जरुर करु शकतात हे 1994 च्या वेळेलाही आपण पाहिले आहे. आज तर फडणवीस सरकार सातत्याने राज्यातला सहकार कसा मोडता येईल याचाच प्रयत्न करते आहे हे आपण सारेजण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत.

वास्तविक एखाद्या संस्थेला कर्ज देताना तिच्याकडून मालमत्ता तारण घेणे, पुरेशी कागदपत्रे तयार करणे, ती व्यवस्थित तपासून पाहणे, त्याची अधिकृत नोंदणी करणे ही सर्व कामे करण्याची जबाबदारी बँकेच्या प्रशासनाची, अधिकारी व कर्मचाऱ्यांची असते. ती जबाबदारी संचालक मंडळाची नसते. कुठल्याही धंद्याचे, व्यवसायाचे एक चक्र असते. साखरधंदा

कृषिमंत्री असताना मा. शरदराव पवार यांनी केंद्र सरकारमधून राज्य बँकेला व काही साखर कारखान्यांना निधी उपलब्ध करुन दिला. त्यांनी काही कुणाला किती पैसे द्यावेत हे राज्य बँकेला सांगितले नाही.

## पवारांनी मदत केली हे चुकले का?

महाराष्ट्रातला शेतकरी आणि त्यांच्या संस्था यांना मदत व्हावी व ते अडचणीतून बाहेर पडावेत म्हणून पवार साहेबांनी केंद्रीय कृषिमंत्री या नात्याने आपुलकी व प्रेमापोटी जी मदत केली, ते त्यांचे धोरण चुकले का? असा प्रश्न आज पडतो. त्यांनी कुणाला किती मदत द्यावी असे बँकेला कधीही फोन करुन सांगितले नाही किंवा चिठ्ठी वा लेटरहेडवर पत्रही दिलेले नाही. दिले असेल तर बँकेने दाखववावे मग असे असतानाही राज्य बँक

घोटाळ्याचे जे तथाकथित प्रकरण व बुजगावणे उभे करण्यात आले आहे त्यात शरद पवारांचे नाव का घालण्यात आले हे सगळ्यांना पडलेले कोडे आहे. शरद पवार हे कधीही राज्य सहकारी बँकेचे साधे सभासदही नव्हते, संचालक नव्हते किंवा अध्यक्ष-उपाध्यक्ष असे पदाधिकारीही नव्हते. फक्त ते ज्येष्ठ नेते असल्यामुळे कदाचित त्यांच्या उपस्थितीत वा दालनात बँकेचे अध्यक्ष-उपाध्यक्ष कोणाला करावे हे ठरले असेल. पण याचा अर्थ बँकेच्या दैनंदिन कारभारात त्यांचा हस्तक्षेप होतो असा



होत नाही. आज मुख्यमंत्री फडणवीस त्यांच्या दालनात अनेक बैठका होऊन कितीतरी संस्थांचे पदाधिकारी निवडले जातात. त्या संस्थांत भ्रष्टाचार, गैरव्यवहार होतो. यावरुन मुख्यमंत्री फडणवीस या गैरव्यवहारात, भ्रष्टाचारात सहभागी आहेत असे आपण म्हणतो का? तसे म्हणत नाही. अर्थात त्यांच्या मंत्रीमंडळातील अनेक मंत्र्यांनी प्रचंड भ्रष्टाचार करुन राज्य लुटले आहे. पण त्यांना पाठिशी घालून इमाने इतबारे 'क्लीन चीट' देण्याचे काम मुख्यमंत्री अगदी नियमित व प्रामाणिकपणे करीत आहेत ही महाराष्ट्राची केवढी मोठी सेवा आहे! याबद्दल त्यांना 'चोर मंत्र्यांचा तळमळीचा पाठीराखा' म्हणून महाराष्ट्र भूषण हा किताब द्यायला हवा.

## राज्य बँकेची चौकशी

नाबार्ड व रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले त्यावेळी पृथ्वीराज चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. बँकेची कलम 83 अन्वये चौकशी झाली. या चौकशीत 1600 कोटींचे नुकसान झाले असे अनुमान काढण्यात आले. नाबार्डच्या आणि 83 च्या चौकशीला कुणीही आव्हान दिले नाही. त्यानंतर कलम 88 अन्वये चौकशी झाली. पण ती पुरेशी मुदतीत न झाल्यामुळे व अन्य काही कारणांनी लॅप्स झाली. परंतु फडणवीस सरकारने कायद्यात दुरुस्ती करुन कलम 88 ची चौकशी पुन्हा सुरु केली. त्याला काही संचालकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. गेल्या दीड-दोन वर्षांपासून कलम 88 च्या चौकशीचे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या चौकशीला न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे.

दरम्यान कुणीतरी अरोरा नावाचा अनोळखी इसम उच्च न्यायालयात गेला आणि 5-7 वर्षांपासून त्याने एक रिपिटीशन दाखल केले. कुठलाही कॉग्नीजन्स ऑफेन्स झाला असेल तर त्यासंबंधीचा एफ.आय.आर. नोंदविण्याची जबाबदारी कायद्याने पोलिसांवर येते. अरोराच्या तक्रारीनंतर 7-8 महिन्यांनी ए.सी.पी.श्री.परोपकारी यांनी सरकारी वकिलांच्या मदतीने न्यायालयाला असे सांगितले की अशाच पद्धतीची एक तक्रार पूर्वी देखील आली होती. त्या आणि अरोरांच्या तक्रारीमध्ये एफ.आय.आर. रजिस्ट्रर करुन घेण्यासारखा पुरावाच नाही. पण मा. न्यायमूर्तींनी एफ.आय.आर. रजिस्ट्रर करुन घ्या आणि



# दिल्लीच्या तख्तापुढे 'मराठा' कधी झुकत नाही

## इतिहासाची झाली पुनरावृत्ती

या विश्वात प्रत्येकाला सृष्टीने स्वभाव बहाल केला आहे. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा. स्वभाव म्हणजे वागण्याची एकूण रीतभात. हा झाला वरवरचा अर्थ. स्वभाव या शब्दाला आणखीन वेगळाही अर्थ आहे. स्वभाव म्हणजे 'स्व' चा भाव ओळखणे. मुळात 'स्व' ओळखणे अत्यंत अवघड. बऱ्याचदा 'स्व'लाच 'स्व' समजत नाही म्हणून कधी कधी आपल्या मनाशी आपण म्हणतो ना, 'अरे, हे मी काय केले?' 'स्व' ओळखायला जो विशुद्ध भाव लागतो, त्यातून स्वभाव घडतो. स्वतःतल्या भावाची विचारपूर्वक जाणीव म्हणजे स्वभाव. ज्या संबंधितांतून अस्तित्त्वाला अर्थ देण्यासाठी मी धडपडतोय, त्याला स्वभाव म्हणतात. म्हणजे स्वभावातला 'स्व' जेव्हा व्यापक होतो, तेव्हा स्वभावाला व्यक्तिमत्व प्राप्त होते. 'स्व' ची यथार्थ जाणीव आयुष्याच्या मुशीतून परिपक्व असा सुगंध होऊन येते, त्याला 'स्वभाव' म्हणतात. याचा अनुभव पवार साहेबांच्या 'ईडी'ला भेटण्याच्या घोषणेने आला. मराठा दिल्लीच्या तख्तापुढे कधीही झुकत नाही या इतिहासाची पुन्हा पुनरावृत्ती झाली.



पवार साहेबांचा स्वभाव नीट वाचला तर त्यांच्या मनाला असणारी अभ्यास, अनुभव, चिंतन व मननाची जोड लक्षात आल्याशिवाय राहात नाही. स्वभावाचा आणि वयाचा फारसा संबंध नाही. मनाची समज जशी वाढेल तसा स्वभाव बनतो. न डगमगता येणाऱ्या प्रत्येक संकटाचा प्रभावीपणे व खंबीर मनाने सामना करणे हा पवार साहेबांचा स्वभाव आहे. म्हणूनच इतिहास बदलून नवा इतिहास घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. अशा व्यक्ती फार कमी व दुर्मिळ असतात. शतकातून असा एखादाच जन्माला येतो. म्हणून त्याला जीवापाड जपणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य ठरते.

तपास चालू करा. कुणालाही आरोपी न करता पाच दिवसाच्या आत एफ.आय.आर. रजिस्ट्रार करा असा आदेश दिला. राज्य शासनाने मध्ये जे 5 दिवस मिळाले त्यात 70-75लोकांची नावे घातली आणि मुख्यत्वे विधानसभेच्या निवडणुका जाहीर झालेल्या असल्यामुळे शरद पवार, अजित पवार यांची नावे घालण्यात आली.

शरद पवारांचे नाव या यादीत का व कसे घातले असा प्रश्न सर्वांना पडला. कारण कलम 83 ची चौकशी झाली त्यात त्यांचा सहभाग नव्हता, नावही नव्हते. कलम 83 अन्वये झालेल्या चौकशीतही त्यांना पार्टी करण्यात आलेले नाही किंवा त्यांना नोटीसही दिलेली नाही. कायद्याच्या भाषेत बोलायचे झाले तर 10-12 वर्षांपूर्वी राज्य सहकारी बँकेला जे तथाकथित नुकसान झाले त्याच्याशी शरद पवार यांचा काहीही संबंध नाही. त्यांचा संबंध असता तर 83 आणि 88 च्या चौकशीत त्यांचे नाव पुढे आले असते. पण 10-12 वर्षांत त्यांचे कधीही नाव आले नाही आणि सप्टेंबर 2019 मध्ये म्हणजे विधानसभेच्या निवडणुका जाहिर झाल्यानंतर त्यांचे नाव पुढे येऊन 'ईडी' ची चौकशी जाहिर झाली.

वास्तविक बँकेचा पैसा घेऊन कोणी परदेशात पळून गेलेला नाही. बँकेचा पैसा थेट संस्थेच्या बँक खात्यात जमा झाला आहे म्हणजे कुठल्याही संचालकाच्या हातात वा खात्यात पैसे गेलेले नाहीत. बहुतांशी कर्जाची वसुलीही झालेली आहे. मग 100 कोटीपेक्षा अधिक रकमेचे सायफनिंग झालेले असेल तर ईडीची चौकशी लागते. येथे ईडीची चौकशी लागण्याचे कारणच नव्हते. कारण रकमेचे सायफनिंग झालेले नाही. कर्जवाटपात अनियमितता झालेली आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपत प्रवेश केलेल्या धनंजय महाडीक, कल्याणराव काळे यांच्या आणि सौ. पंकजा मुंडे यांच्यासह एकूण चार जणांच्या कारखान्यांना एन.पी.ए. झालेला असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी शासनाची हमी देऊन कर्जपुरवठा केला. मग हे कोणत्या न्यायात बसते? ही अनियमितता नाही का?

## पवार आणि ईडीची चौकशी

ईडीची चौकशी झाल्याशिवाय गुन्हा नोंदविला जात नाही. अजूनपर्यंत ईडीची शरद पवार यांना नोटीस आलेली नाही. त्यांना चौकशीसाठी बोलाविण्यात आले नाही. तसे पत्रही आले नाही. ईडी प्राथमिक चौकशी करते. प्रश्न विचारते. पी. चिदंबरम यांना अटक करण्यापूर्वी दीड वर्षात 11 वेळा ईडीने चौकशीसाठी बोलाविले होते. रॉबर्ट वद्रा यांची तर 2-3 वर्षांत ईडीकडून खूप वेळा चौकशी झाली आहे. शरद पवार यांना तर अजून एकदाही ईडीने बोलाविले नाही. मग प्रसार माध्यमांना जी प्रेसनोट गेली त्यात शरद पवारांचे नाव कसे आले? हा प्रश्न जसा अनेकांना पडला तसा शरद पवारांनाही पडला. त्यामुळे त्यांनी स्वतःच ईडीच्या कार्यालयात जाऊन याबाबतची माहिती घेण्याचे ठरविले.





या प्रकरणात माझे नाव कसे गोवण्यात आले? त्यासंबंधीचा काही पुरावा तुमच्याकडे आहे का? माझे नाव या प्रकरणात कुणी घालायला सांगितले ? हे प्रश्न तर पवार साहेब ईडीच्या कार्यालयात 27 सप्टेंबरला जाऊन त्यांना विचारणारच होते. पण त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे पवार साहेब हे लोकशाही व भारताची राज्यघटना मानणारे असल्यामुळे या प्रकरणात ईडीला पूर्ण सहकार्य करण्याची त्यांनी तयारी दर्शविली होती. त्यामुळे ईडीला काही प्रश्न वा माहिती मला विचारायची असल्यास मी

द्यायला तयार आहे. पण निष्कारण संशयाचे भूत माझ्याविरुद्ध उभे करु नका अशी त्यांची भूमिका होती. 55 वर्षांच्या सार्वजनिक व राजकीय जीवनामध्ये माझ्यावर कधीही गैरव्यवहार वा भ्रष्टाचाराचा आरोप होऊन जेलमध्ये जाण्याची पाळी आलेली नाही. एकदाच फक्त तेही शेतकऱ्यांसाठी जळगाव ते नागपूर असा लाँगमार्च काढला तेव्हा अटक झाली होती. त्यानंतर पुन्हा कधीही जेलमध्ये जाण्याची माझ्यावर वेळ आली नाही, असे विधान खुद्द पवार साहेबांनी पत्रकार परिषदेत केले आणि तेच बहुधा भाजपच्या नेत्यांना व अध्यक्षांना टोचले असावे.

## पार्लमेंटचा कायदा मॅलिस नसतो

भाजपचे काही नेते मुलाखती देताना म्हणाले की, पवार साहेब हे केंद्रात कृषी व सहकार मंत्री असताना त्यांनी सहकार कायद्यात जो बदल घडवून आणला त्यातून राज्य बँकेच्या संचालक मंडळाला गैरव्यवहार वा अनियमितता करण्याची संधी मिळाली. म्हणून या प्रकरणी पवार दोषी आहेत. आता हा युक्तिवाद वा बोलणे किती अर्थहीन, बिनबुडाचे व मूर्खपणाचे आहे हे कायदा नीट तपासला तर आपल्यादेखील लक्षात येईल. त्यासाठी संसदेत एखादा कायदा कसा तयार होतो हे आधी समजून घेतले पाहिजे. कायदा बदलण्याकरिता आधी संबंधित विभागाकडून बील तयार होते. त्या बिलावर लोकसभेत चर्चा होऊन ते मंजूर केले जाते. नंतर ते राज्यसभेत (अप्पर हाऊस) चर्चेला जाते. तिथे मंजूर झाल्यानंतर ते राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी सहीला जाते. त्यांची सही झाल्यानंतर कायदा संमत होऊन अस्तित्त्वात येतो. सहकार कायदा हा फंडामेंटल राईटमध्ये टाकलेला आहे. त्याला घटनेचा स्टेटस दिलेला आहे. त्यामुळे राज्य सरकारे त्यात काही बदल करु शकतात अशी व्यवस्था आहे. महाराष्ट्राने त्यात काही बदल केलेला नाही. पार्लमेंटने केलेला कायदा हा मॅलिस किंवा मॅलाफाईड (दुष्टबुद्धी किंवा द्वेषमूलक) आहे असे होत नाही आणि तसे म्हणताही येत नाही. आता मोदी सरकारने 370 कलम काश्मीरचे रद्द केले त्याला मॅलिस म्हणायचे काय ? तसे म्हटले तर ते बरोबर होईल का? होणार नाही. तसे म्हणणेही चूक ठरेल. मग शरद पवारांनी केंद्रातून शेतकऱ्यांसाठी व कारखान्यांना मदत पाठविली तर त्यात त्यांचे काही चुकले का? पवारांनी पाठविलेली मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलीच नाही असा गैरसमज कोण पसरवतंय? असा खोटा विषारी प्रचार भाजपचे नेते का करताहेत? राज्य सहकारी बँकेच्या सध्याच्या बोर्डानेदेखील 1200 पानांचे आपले म्हणणे अॅफिडेव्हीट करुन उच्च न्यायालयात दाखल केले आहे. त्यांनी देखील बँकेच्या संचालक मंडळावर किंवा मा. शरद पवार यांच्यावर ठपका ठेवलेला नाही. बँकेने जे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केले आहे त्यात कुठल्याही संचालकाला जबाबदार धरलेले नाही ही वस्तुस्थिती असताना भाजप सरकारातले मंत्री व त्यांचे नेते प्रामुख्याने पवार कुटुंबियांविरुद्ध व त्यातही शरद पवार आणि अजित पवार यांच्या बद्दल सातत्याने खोटा प्रचार गोबेल्स तंत्राप्रमाणे का करीत आहेत हे न कळण्याइतकी जनता अडाणी व वेडी राहिलेली नाही.

सातारा येथील शरद पवार यांच्या सभेला जमलेला प्रचंड जनसमुदाय पाहून भाजप नेत्यांच्या पायाखालची वाळू सरकली.





शरद पवार यांच्या स्वागतासाठी सातारा शहरातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी काढलेली प्रचंड रॅली


## पवारांच्या दौऱ्यांना प्रचंड प्रतिसाद

राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही स्वार्थी, सत्तालोलूप, भ्रष्टाचारी, सत्तांध, भित्रे व गैरव्यवहार केलेले नेते आपली पापं झाकण्यासाठी भाजप–सेनेत गेले. या गयारामांची व दलबदलू नेत्यांची पवार साहेबांनी कधीच फिकीर बाळगली नाही आणि त्यांच्या जाण्याला काडीचीही किंमत दिली नाही. या गयारामांचा अनुभव पवार साहेबांना फार पूर्वीपासून आहे. त्यामुळे भाजप–सेनेतल्या 'मेगाभरती' चे कधीही त्यांना कौतुक वाटले नाही आणि दुःखही झाले नाही. उलट त्यातून ते निर्धाराने उभे राहून वयाच्या 80 व्या वर्षातही त्यांनी महाराष्ट्र पिंजून काढायला सुरुवात केली. वय आणि शारिरीक व्याधी यांच्यावर मनोबल व आत्मनिर्धार प्रबल असेल व स्वत्व जागृत आणि जिवंत असेल तर कशी मात करता येते याचे दर्शन जनतेला यातून घडले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे तरुण मुलांचा, युवकांचा प्रचंड ओढा निर्माण झाला. सोलापूर, सातारा, उस्मानाबाद, परभणी, नांदेड, अहमदनगर येथे पवार साहेबांच्या रोड शो व जाहीर सभांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. हजारो युवक स्वतःच्या मोटर सायकलींवरुन रॅली काढू लागले. सगळे वातावरण ढवळून निघाले. भाजपने ज्या

# न झालेली अविस्मरणीय भेट

## पाहुणचाराची इच्छा अपुरीच!

भेटण्यात अनेक हेतू असतात. भेट म्हणजे विशिष्ट हेतूंनी केलेले अनुभवांचे प्रकटीकरण. भेट म्हणजे मनापासूनच्या कृतज्ञतेची वाक् पूजा. भेट म्हणजे चिरंजीव अनुभव. भेटीने लाभते नवे चैतन्य. यासाठी भेटीत आधी आपण आपल्याला भेटावे लागते. मन, विचार आणि कृती यांची जिथे अखंड व स्वच्छ भेट असते तिथे भीती, संदेह यांचा मागमूसही नसतो. शरद पवार यांनी 27 सप्टेंबरला मुंबईतील 'ईडी'च्या कार्यालयात जाण्याचे जेव्हा जाहीर केले तेव्हा या भेटीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले. ही भेट व्हावीच अशी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची प्रचंड आंतरिक इच्छा होती. पण कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन सर्वसामान्य माणसांना त्याचा त्रास भोगावा लागेल ही भीती पवार साहेबांच्या मनात होती. सरकारच्या विनंतीने त्यावर शिंपण घालण्यात आले. त्यामुळे साहेबांनी भेटीला जायचा निर्णय त्या दिवशी तहकूब केला. 'ईडी'ची भेट व त्यांचा पाहुणचार घेण्याची त्यांची इच्छा अपुरीच राहिली. ही भेट न होताही केंद्र व राज्य सरकारला चांगली खणखणीत चपराक श्रीमुखात बसली. न झालेल्या या भेटीने राजकीय वातावरण पूर्ण बदलून टाकले आणि 80 वर्षांचा 'युवा तरुण' आपल्या निव्वळ भेट देण्याच्या घोषणेनेही जगण्याचा हिमालय निर्माण करुन दिवसाला गंगेचे शुचित्व कसे प्राप्त करुन देतो याचे दर्शन घडले. ही न झालेली भेट महाराष्ट्राची जनता कधीही विसरणार नाही. ती चिरंतन लक्षात राहील.



पद्धतीने राष्ट्रवादीतले नेते खरेदी केले व ब्लॅकमेल करुन विकत घेतले त्याचाही संताप जनतेने रॅली व सभांमध्ये सहभागी होऊन व्यक्त केला. नेते विकावू असले तरी कार्यकर्ते आपल्या कार्याशी प्रामाणिकपणे इमान राखून आहेत, त्यांच्या निष्ठा विकावू व बाजारी नाहीत अशी सणसणीत चपराक त्यांनी सेना-भाजपच्या नेत्यांना लगावली. त्यामुळे चिडून जाऊन म्हणा किंवा भीतीमुळे म्हणा पवार साहेबांना बदनाम करण्याचे षडयंत्र भाजपच्या नेत्यांनी आणि दस्तुरखुद्द फडणवीस-शहा जोडीने रचून 'ईडी'ची चौकशी त्यांच्या मागे लावली. बँक घोटाळ्यात त्यांचे नाव घातले.

पण जनतेतून याचा प्रचंड विरोध झाला. आपल्या 55



वर्षांच्या सार्वजनिक व राजकीय जीवनात ज्या पवार साहेबांनी आपल्या आयुष्याचा क्षण नि क्षण आणि कण नि कण समाजाच्या उन्नतीसाठी, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, दैन्य-दुःख दूर करण्यासाठी व संकटप्रसंगी मदतीला सर्वप्रथम धावून जाण्यासाठी खर्च केला त्याची जाणीव जनतेला असल्यामुळे सर्व थरातून सरकारच्या पवारांना गोवण्याच्या कृतीचा निषेध झाला. पवार साहेब 'ईडी' च्या कार्यालयात ज्या दिवशी जायला निघाले त्या 27 सप्टेंबरला महाराष्ट्रातल्या जनतेने पवार साहेबांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेऊन लाखो लोक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मुंबईच्या दिशेने निघाले. सगळ्या टोलनाक्यांवर कितीतरी किलोमीटरच्या लांबलचक रांगा लागल्या. मिळेल त्या वाहनांनी कार्यकर्ते, युवक, पवारप्रेमी, जुने सहकारी सारे काही विसरुन मुंबईच्या दिशेने निघाले. पोलिस यंत्रणा गर्भगळित झाली. तिला भितीने पछाडले. इतका प्रचंड व अभूतपूर्व प्रतिसाद पवार साहेबांना व राष्ट्रवादी काँग्रेसला मिळेल याची स्वप्नातही सरकारने कल्पना केली नव्हती. लाखोंचा जमाव जमला तर त्याचे नियंत्रण करणे कठीण होईल, पोलिस यंत्रणेला हा जमाव



आवरता येणार नाही आणि जमाव जर संतप्त झाला तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यातून काही प्रसंग उद्भवलाच तर सरकारची उरली सुरलेली अब्रू खलास झाल्याशिवाय राहणार नाही हे चाणाक्ष मुख्यमंत्र्यांनी ओळखले आणि त्यांनी मुंबईचे पोलिस आयुक्त श्री. संजय बर्वे व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना पवार साहेबांच्या घरी विनंती करण्यासाठी पाठविले. 'ईडी'नेही पवार साहेबांना ईमेल पाठवून "आम्ही चौकशीसाठी बोलवू तेव्हाच या. गरज पडली तरच बोलवू" अशा प्रकारचा लेखी निरोप पाठविला. सर्वसामान्य माणसाच्या जीवनात माझ्या जाण्याने काही संकट उद्भवणार असेल व त्याला त्रास होण्याची शक्यता असेल तर मी तसे कधीच वागणार नाही, अशी भूमिका घेऊन पवार साहेबांनी शासनाची व पोलिस यंत्रणेची विनंती मान्य करुन 'ईडी' च्या कार्यालयात जाण्याचा निर्णय तहकूब केला.

## अजित पवारांचा आमदारकीचा राजीनामा

केवळ आपल्यामुळे पवार साहेबांना सरकार छळते आहे, जाणून बुजून त्रास देते आहे अशी मनोमन भावना बनल्यामुळे भावूक झालेल्या अजित पवार यांनी कोणालाही न सांगता तडकाफडकी आमदारकीचा राजीनामा दिला. "राज्य सहकारी बँकेमध्ये मी संचालक नसतो तर यातले काहीच घडले नसते आणि पवार साहेब तर सोडाच पण कुणावरही गुन्हा दाखल झाला नसता, इतकंच काय बँकेचे संचालक मंडळ देखील बरखास्त झाले नसते," ही जी विधाने पत्रकार परिषदेत अजित पवार यांनी उच्चारली ती फार अर्थपूर्ण, महत्त्वाची आणि सरकार किती खालच्या पातळीला जाऊन राजकारण करते आहे याचे दर्शन घडविणारी आहेत. शरद पवार, अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेसशी खुलेपणाने लढण्याची हिंमत नसल्यामुळे वेगवेगळे नीच मार्ग योजून भाजप सरकारमधील नेते छुप्या रितीने त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करताहेत.

पण त्यांनी ध्यानात ठेवले पाहिजे सत्याच्या मार्गाने जाणाऱ्यांचाच विजय अंतिम असतो. फडणवीस सरकारचे वागणे हे अनृत आहे. अनृत आपल्या नागड्या स्वरुपात मनुष्याला सहसा आकर्षू शकत नाही. म्हणून ते अनेक 'रमणीय' भोगांचे आणि प्रसंगी 'हित' रुप वाटणाऱ्या कर्तव्यांचेही रुप धारण करीत असले तरी त्याबद्दल यत्किंचितही प्रेम लोकांना नसते. मोदी-फडणवीस सरकारचे धोरण तसंच फसवं, लबाड, खोटारडे आणि स्वार्थाने बरबटलेलं, नीच पातळीचे आहे. त्याचा अनुभव व दर्शन जनतेला रोज घडत आहे. पण त्यांनी लक्षात ठेवावे सत्य हाच नीतिधर्माचा आधार आहे. शिवाय तो स्वतंत्र धर्मही आहे. तो प्रथम आहे, अंतिम आहे, परम आहे, पूर्ण आहे. सत्याविरुद्ध जे जे उभे होईल ते सहजच लटके पडेल. जनतेची निःस्वार्थ, निरपेक्ष, निरलस, व अंतःकरणात ओथंबलेल्या तमळमळीतून केलेली सेवा हेच शरद पवार यांच्या जीवनकार्याचे अंतिम सत्य आहे. दर्शनासाठी सत्य आत्मा बनते. प्रार्थनेसाठी सत्य ईश्वर बनते आणि आचरणासाठी सत्य धर्म बनते. धर्माचे पालन झाले नाही की विनाश होतो हे मोदी-शहा-फडणवीसांना सांगून कसे कळणार? त्यांचे रोजचे जगणे, मरणे, उठणे हे असत्यातच चालू आहे. पण सत्याची ताकद सरकार उलथून टाकण्याची आहे हे लहानांनाही कळते. सत्ताधाऱ्यांना लवकरच नक्की कळेल!





# अतिमंदीच्या भयावह संकटात अर्थव्यवस्था!


**आनंदी गोपाळ**










ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर तीव्र मंदीचं वादळ घोंघावतंय, शेअरबाजार पडलाय, उत्पादन ठप्प होऊ पाहतंय. बाजारपेठांमध्ये मालाचा उठाव नाही तर जनतेच्या हातात पैसा नाही. एकीकडे भरमसाठ भाववाढ, मागणीचा प्रचंड अभाव तर दुसरीकडे सामान्य माणसाच्या आवाक्यात कोणतीही बाब न राहिल्याने देशात सर्वत्र नैराश्याचं साम्राज्य अशीच भयावह अवस्था भारतीय अर्थव्यवस्थेची होऊन राहिली आहे. कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांना हजारोंच्या संख्येने आत्महत्या करायला लागताहेत, रोज नवे घोटाळे उघडकीला येताहेत आणि प्राचीन काळी रोम जळत असताना बादशहा नीरो ज्याप्रमाणे फिडलं वाजवत बसत असे, त्याप्रमाणे सारा देशच आर्थिक वणव्यात सापडला असताना सरकार मात्र आत्मभान सोडून आत्मस्तुतीमध्येच दंग होऊन बसलं आहे!

आज किंबहुना गेले कित्येक दिवस, महिने, कोणतेही वृत्तपत्र, मासिक उघडून चाळले, दूरचित्रवाणीचे कुठलेही चॅनल पाहिले अथवा आकाशवाणीवरच्या बातम्या ऐकल्या, तर एक प्रकारचा भीती वाटवणारा तोचतोचपणा आढळून येतो. जीवनावश्यक वस्तू कडाडल्या, पेट्रोलचे भाव वाढले, सोन्याचांदीचे भाव गगनाला भिडले, "वगैरे वगैरे" पण त्याचवेळी हे नैराश्य आणखीनच वाढवणाऱ्या, देशाच्या अर्थव्यवस्थेबद्दल







उरात धडकी भरवण्यासाठी अनेक इतर वार्ता आपल्या कानीकपाळी दररोज येऊन आदळताहेत. "सरकारचे करसंकलन घटले. औद्योगिक उत्पादनात मोठी घट झाली. शेअरबाजार सातत्याने घसरला. सुगीच्या हंगामातही बाजारातली मागणी मंदावली, आपल्या देशाच्या अंतर्गत आणि परदेशी कर्जामध्ये प्रचंड वाढ झाली. पण कर्जाच्या विळख्यामध्ये स्वतःला आणि कुटुंबाला जगणे असह्य होऊन हजारो शेतकऱ्यांनी आपले जीव देण्याचा टोकाचा मार्ग पत्करला. एवढंच नव्हे तर बायकापोरांसह आत्महत्या करण्याचं हे अतीव दुःखद लोण आता पांढरपेशे आणि चाकरमानी यांच्यातही झपाट्याने पसरते आहे!

काय नक्की चाललं आहे हे? आणि कुठं नेऊन ठेवली आहे देशाची अर्थव्यवस्था, या सरकारने? काही महिन्यांपूर्वी लोकसभेत आपला पहिलावहिला अर्थसंकल्प मांडताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भले जोरात देशाला तोंड भरुन आश्वासन दिले होते, "येत्या तीन वर्षांमध्ये भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सवर नेण्यासाठी मोदी सरकार कटिबद्ध आहे. पाच ट्रिलियन डॉलर्स म्हणजे का थोडी थोडकी रक्कम आहे? पाच ट्रिलियन म्हणजे पाच हजार अब्ज डॉलर्स म्हणजेच रुपयांच्या हिशोबामध्ये तब्बल तीन कोटी, पन्नास लाख कोटी रुपये (3 लाख 50 हजार अब्ज रुपये)! कुठून आणणार ही अवाढव्य रक्कम ? सरकारकडे कुठली जादूची कांडी आहे की अल्लादिनचा जादूचा दिवा?

## प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेची घसरण

डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असतानाच्या काळात भारताची अर्थव्यवथा चांगली स्थिरावली होती आणि एका ठाम





गतीने जागितक अर्थमंचावर तिची प्रगती चालू होती. अगदी नियमितपणे ! प्रथम सकळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या मोजमापाने जगात पहिल्या दहातही नसणारी आपली अर्थव्यवस्था हळूहळू पहिल्या दहात आणि क्रमशः विस्तारत एकेक वरचा नंबर पटकावत ती पुढारलेल्या युरोपियन देशांच्या रांगेमध्ये येऊन बसली, सकळ राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा जवळजवळ सात टक्के दर सतत राखत भारतीय अर्थव्यवस्थेने फ्रान्सलाही मागे टाकले. रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इटलीसारखे देश केव्हाच मागे पडून पुढे राहिले होते ते केवळ अमेरिका, चीन, जपान, जर्मनी आणि इंग्लंड (यू.के.) हेच पाच देश. यापैकी चीन वगळता इतर चार देशांच्या अर्थव्यवस्थेची वाढ वर्षाला दीड ते अडीच टक्क्यांपेक्षा जास्त वेगाने होत नसल्याने त्यांनाही किमान आपल्यापुढच्या दोन-तीन देशांना तरी आपण झपाट्याने गाठू अशी चिन्हे दिसत







होती. त्याप्रमाणे आपण इंग्लंडला गाठलंही. जगातली पाचव्या क्रमांकावरची अर्थसत्ता म्हणून शेखी मिरवली. जनताही मग वाट पाहात बसली आता आपण जर्मनीला कधी गाठतो या घटकेची!

पण प्रत्यक्षात काय घडलं ? वस्तुस्थिती भलतीकडेच बोट दाखवत होती. नोटाबंदीसारखे आत्मघातकी निर्णय. चुकीची धोरणे व निर्णय नियोजन मंडळाची बरखास्ती व इतर आर्थिक संरचनेची मोडतोड आणि रिझर्व्ह बँकेच्या स्वायत्ततेत कमालीची ढवळाढवळ या सर्वांची झळ शेवटी अर्थव्यवस्थेलाच सोसावी लागली. डॉ. मनमोहनसिंग यांच्यासारख्या जागतिक किर्तीच्या अर्थतज्ज्ञावर "धोरणात्मक लकवा असलेले पंतप्रधान" असे गृहणीय आरोप करणारी मंडळी त्यांच्या हाती जेव्हा देशाची सुत्रे आली तेव्हा धोरण व दिशा ठरविण्याच्या बाबतीमध्ये पुरती अनभिज्ञ व दिशाहीन असल्याचीच बाब केवळ सिद्धच

नव्हे तर पुरती अधोरेखित झाली आणि त्याचा फटका देशाच्या अर्थव्यवस्थेस बसला.

खूप प्रयत्न (प्रचार) आणि आटापिटा करुनही अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग 5-6 टक्क्यांपलीकडे नेण्यात सरकार अयशस्वी झाले. किंबहुना या घटलेल्या वाढीच्या दरामुळे आपल्या अर्थव्यवस्थेची क्रमवारी जागतिक स्तरावर वरती जाण्याऐवजी एकेक पायरी खालतीच उडी घेऊ लागली. सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये जर्मनीलाही स्थानभ्रष्ट करण्याचे मनसुबे रचणारी आपली अर्थव्यवस्था जर्मनी तर सोडाच पण इंग्लंडच्या वरचेही आपले स्थान राखू शकली नाही. नुकतीच इंग्लंडने सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये भारताला पुन्हा मागे टाकले असून जर्मनीपाठोपाठ स्थान परत पटकावले आहे.

## पतविश्वासार्हता धोक्यात

सद्यस्थितीमध्ये सरकार कितीही बढाया मारुन मोठमोठे दावे करत असले तरी आंतरराष्ट्रीय वास्तव वेगळेच आहे. यंदाच्या हंगामामध्ये सार्वजनिक क्षेत्रांमधील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात पुन्हा काढून घेऊन त्यांचे खासगीकरण करण्याचा व त्याद्वारे




देशांतर्गत परदेशी वित्तबाजारांतून मोठ्या प्रमाणावर पैसा उभा करण्याचा सरकारचा मनसुबा आहे. त्याला सार्वजनिक क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांचा विरोध मोठ्या प्रमाणात तर आहेच, परंतु परकी भांडवलबाजारात आणि विशेषतः वित्त मानांकन संस्थांमध्ये (क्रेडिट रेटिंग एजन्सीज) त्याचे प्रतिकूल पडसाद उमटताहेत.

सरकार निर्गुंतवणूक करणार असलेल्या कंपन्यांच्या यादीमध्ये अग्रभागी आहे. बी.पी.सी.एल. म्हणजेच भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन या आणि अशा प्रकारच्या निर्गुंतवणूक व्यवहारांच्या संदर्भात मूडीज या जगातील अग्रगण्य अशा वित्त मानांकन संस्थेने सरकारला इशारा म्हणजे जवळजवळ तंबीच दिली आहे. भारत सरकारने आपली बी.पी.सी.एल. मधली गुंतवणूक (भाग भांडवल) काढून घेऊन ते पूर्णपणे इतर कोणत्याही खासगी गुंतवणूकदाराला विकायचे ठरवल्यास आपण आधी दिलेला पतदर्जा काढून घेऊन वित्त मानांकनच घटवू असा सज्जड दमच मूडीजने सरकारला भरला आहे.

सध्या बी.पी.सी.एल मध्ये सरकारचे भागभांडवल 53.29 टक्के इतके आहे आणि मूडीज ने दिलेला पतदर्जा बीएए2 असा आहे. जर सरकारने पूर्णतः निर्गुंतवणूक केली तर मूडीजने स्पष्ट धमकी दिली आहे की आपण पतमानांकन तब्बल दोन पायऱ्यांनी खाली उतरवून बीए1 असे करु की ज्याचा विपरित परिणाम वित्तबाजारातून भांडवलपुरवठ्यावर होऊ शकतो. सरकारचे चालू आर्थिक वर्षातील सार्वजनिक क्षेत्रामधील निर्गुतवणुकीचे लक्ष्य त्यातून एक लाख पाच हजार कोटी रुपये जमा करण्याचे असून एकट्या बी.पी.सी.एल. कंपनीमधील आपले भाग-भांडवल विकल्याने सरकारला त्यापैकी पंचावन्न टक्के म्हणजेच पंचावन्न हजार कोटी रुपये कंपनीच्या समभागाच्या आजच्या बाजारभावाप्रमाणे (प्रत्येकी सुमारे सव्वापाचशे रुपये) मिळू शकतील. परंतु मूडीज ने दिलेल्या इशाऱ्यानंतर बी.पी.सी.एल. मधील व अशा सार्वजनिक क्षेत्रांतील कंपन्यांमधील भांडवल विक्रीच्या योजनांपुढे प्रश्नचिन्ह उभे राहिले असून आधीच उत्पन्नाच्या विविध स्त्रोत आकुंचन पावत असल्याने सरकारसमोरच्या संकटांमध्ये भरीव वाढ होत आहे.

## चौफेर घटती आकडेवारी

एकीकडे सरकारी उत्पन्नाच्या स्त्रोतांवर मर्यादा येत असतानाच सरकारचे महसुली उत्पन्नही सातत्याने घटते आहे.




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

मोठाच गाजावाजा करुन भाजप सरकारने आपल्या पहिल्या ‘खेळी’त सुरु केलेल्या आणि तत्कालिन अर्थमंत्री कै. अरुण जेटली यांनी सर्व राज्यांच्या गळी उतरवलेल्या जीएसटी उर्फ वस्तू आणि सेवा कराची वसूलीही दिवसेंदिवस मंदावत असून त्याद्वारे सरकारी तिजोरीत अपेक्षित भरही घटते आहे. त्यामुळे राज्यांना मिळणारा या कराचा वाटाही घटतो आहे आणि केंद्र व राज्य दोघांच्याही तिजोऱ्यांवर या कमतरतेचा लक्षणीय ताण जाणवतो आहे. दर महिना किमान एक लाख कोटी रुपये इतके वसुलीचे उद्दिष्ट असलेल्या या ‘वस्तू आणि सेवाकरांने’ ते उद्दिष्ट अगदी क्वचितच साध्य केले आहे. अगदी ताज्या जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार गेल्या महिन्यातही अपेक्षित तेवढी वसुली होऊ न शकल्याने या करापासूनची मिळकत तब्बल दहा हजार कोटी रुपयांपेक्षाही जास्त इतक्या रकमेने कमी पडल्याची प्राथमिक माहिती आहे.




जेट एअरवेज ही विमान कंपनी बंद पडल्याने हजारो कर्मचारी बेरोजगार झाले.









कर व इतर स्त्रोतांद्वारे सरकारकडे जमा होणाऱ्या महसुलातील वाढती घट एकीकडे तर दुसरीकडे पूर, भुकंप, नैसर्गिक संकटे याचप्रमाणे कर्जमाफी व इतर कल्याणकारी (तसेच सवंग) योजनांवरील खर्च व मदतीसाठी पैशाची सतत होणारी वाढती मागणी याची परिणती जमेपेक्षा खर्चाची बाजू मोठ्या प्रमाणामध्ये वाढण्यात होते व त्याची तोंडमिळवणी करण्यासाठी सरकारला तुटीचा अर्थभरणा करण्याचा मार्ग चोखाळावा लागतो व परिणामी अंदाजपत्रकी तूट ही सुद्धा ठरविल्यापेक्षा बरीच वाढून त्याची अप्रत्यक्ष परिणती चलनफुगवटा व चौफेर भाववाढ यांमध्ये होते.

## उधारउसनवारीवर सारा भार

चुकीची धोरणे, राजकीय हटवादीपणा आणि संस्थात्मक विध्वंसन यावरच गेली जवळजवळ साडेपाच वर्षे भर देणाऱ्या या सरकारकडे आता आपल्यापुढे वाढून ठेवलेल्या आर्थिक दिवाळखोरीमधून तगून जाण्यासाठी फारशा उपाययोजना शिल्लक दिसत नाही, म्हणूनच की काय, सार्वजनिक क्षेत्रातील उत्तम चालणाऱ्या उद्योगातील (नवरत्ने) भागभांडवल विक्री करण्याबरोबरच देशी-परदेशी भांडवल बाजारामध्ये कर्जरोखे विकून व इतर प्रकारे वित्त पुरवठाही प्रचंड प्रमाणावर मिळवून घेण्याचे मनसुबे या सरकारने आखले आहेत.

भांडवलबाजारातून तब्बल सात लाख दहा हजार कोटी

रुपयांची कर्ज उभारणी करण्याचे उद्दिष्ट्य सरकारने आपल्या अर्थसंकल्पातच जाहीर केलं होतं. त्यापैकी 62 टक्के रक्कम ही सप्टेंबर अखेरपर्यंत म्हणजे पहिल्या सहामाहीतच उभी करुन झाली आहे. "आता उर्वरित कर्जउभारणीही म्हणजे 2 लाख 68 हजार कोटी रुपयेही सरकार लवकरच उभे करणार आहे," अशी माहिती केंद्रीय आर्थिक घडामोडी विभागाचे सचिव अतनु चक्रबेती यांनी नुकतीच दिली. "देशात व परदेशातही कर्ज उभारणी केली जाणार असून तरीही याद्वारे यंदाच्या वर्षातली एकूण तूट सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या 3.3 टक्के यापेक्षा जास्त निश्चितच होणार नाही", असाही दावा त्यांनी केला.


आता उघडउघड हा सर्वच दावा हास्यास्पद आहे, तरीही चिंतास्पद आणि गंभीरही आहे. किंबहुना सरकारच्या या दिवाळखोरीच्या कारभाराबद्दल अर्थतज्ज्ञ व अर्थव्यवस्थेच्या अभ्यासकांकडून गंभीर चिंता व्यक्त केली जाते आहे. त्याबरोबरच अशा प्रकारच्या उधार उसनवारीबाबत सरकारला वारंवार इशारेही दिले जात आहेत.

एकीकडे (परदेशी भारतीयांच्या कर्तृत्त्वामुळे आणि सेवा पुरविणाऱ्या भारतीय कंपन्यांच्या कर्तबगारीमुळे) भारताची परकी चलनामधील गंगाजळी तब्बल 430 अब्ज अमेरिकन डॉलर्स (सुमारे 30 हजार 100 अब्ज रुपये) इतकी विक्रमी फुगली असली तरी भारत सरकार करीत असलेली परदेशातील कर्ज
















महाप्रचंड उडी मारली आहे. म्हणजेच त्याने आपली परकी चलनाची गंगाजळी केव्हाच पार केली आहे, 9 हजार अब्ज रुपयांनी ! आणि ही वाढ झाली आहे, ती अल्पमुदतीच्या तसेच दीर्घमुदतीच्या अशा दोन्ही प्रकारच्या कर्जामध्ये झाली आहे. आखातातील परिस्थिती, तिथेही खनिज तेलाचे उत्पादन आणि पिंपामागे खनिज तेलाचे वाढते भाव यामुळे तर या परिस्थितीमध्ये दिवसेंदिवस भरच पडू शकेल अशीही चिंता अर्थव्यवस्थेच्या अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे.

## राज्यांची स्थितीही चिंताजनक !

केंद्रातील सरकारच्या या विचित्र आर्थिक धोरणांची झळ राज्यांनाही सोसावी न लागली तरच नवल! आज बहुतेक सर्वच राज्ये आर्थिकदृष्ट्या डबघाईला आली आहेत. पूर, महागाई, नैसर्गिक संकटे तसेच कर्जमुक्ती व सवलती यांचा सामना करता करताच त्यांचे उत्पन्नाचे स्रोतही संकुचित झाल्यामुळे राज्यांच्याही कर्जबाजारीपणात मोठी भर पडते आहे.

एक म्हणजे सर्व राज्यांचा मिळून होणारा खर्च हा केंद्राच्या खर्चापेक्षा खूपच मोठा असतो. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य, जनहितकारी योजना यावरील खर्चाचाही समावेश असतो. किंबहुना (केंद्र व राज्य सरकारे मिळून होणाऱ्या) एकंदर सरकारी खर्चाच्या रकमेच्या जवळजवळ 60 टक्के रक्कम ही राज्य सरकारे मिळून खर्च करीत असतात. त्यामुळे भांडवली व इतरही खर्च भागविण्यासाठी त्यांना बाजारातून कर्ज उभारणीचा अवलंब करावा लागतो. रिझर्व्ह बँकेच्या पाहणीनुसार (2019-20) राज्यांची एकूण कर्ज उभारणीही देशाच्या ढोबळ अंतर्गत उत्पन्नाच्या तब्बल 25 टक्के एवढी आहे. येत्या पाच वर्षात म्हणजे 2024-25 पर्यंत हे प्रमाण किमान 20 टक्क्यांपर्यंत राज्यांनी

खाली आणावे अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे.

पण ही अंमलात आणणार कशी? हे कर्जाचे प्रमाण कमी करणार तरी कसे? रिझर्व्ह बँकेने केलेल्या सुचनेमध्ये, "राज्यांनी कमी व्याजदराची नवी कर्जे काढून त्यातून जास्त व्याज द्यावी लागणारी जुनी कर्जे फेडावीत व (किमान) व्याजावरचा खर्च तरी कमी करावा," ही एक प्रमुख सूचना आहे. त्याचबरोबर 'राज्यांची करवसुली व तिची व्याप्ती वाढविणे' हाही एक मुद्दा आहे. परंतु वस्तु आणि सेवाकराच्या अंमलबजावणीपासून राज्यांचे इतर करस्त्रोत बंद झाले आहेत. तर वस्तु आणि सेवाकराचीही वसुली अपेक्षेइतकी होत नाही. त्यामुळेही राज्यांची अर्थकोंडी होते आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी केंद्राने आवर्जून पुढाकार घ्यायला हवा.

## भारतात सर्वाधिक बंधने : रॉस

जागतिक व्यापारविश्वामध्येही भारताची प्रतिमा ही काही फारशी उज्ज्वल नाही. अनेक किचकट तसंच जुनाट नियम व निर्बंध, नियमांची अनिश्चितता व सतत बदल याबरोबरच लाचलुचपत व भ्रष्टाचार, दिरंगाई, लालफीत, पायाभूत सोयीसुविधांचा अभाव या व अशा अनेक अडचणींचा पाढा भारतामध्ये उद्योग उभारतांना किंवा गुंतवणुक करताना वाचला जातो. सध्या भारत व अमेरिका यांच्यामधील परस्पर व्यापारामधील अडचणींसंदर्भात भारताचे वाणिज्यमंत्री पीयुष गोयल आणि अमेरिकेचे वाणिज्यमंत्री (सेक्रेटरी ऑफ कॉमर्स) बिल्वर रॉस यांनी या बाबीचा प्रकर्षाने उल्लेख केला. "व्यापार-व्यवसायाच्या बाबतीमध्ये अमेरिका हा बंधनरहित व खुला असा देश आहे, तर भारत मात्र खुल्या व्यापारावर सर्वाधिक बंधने असलेल्या देशांपैकी एक देश आहे," असे प्रतिपादन करुन "भारतानेही व्यापारावरील बंधने काढून टाकण्याची" आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

श्री. रॉस यांचे म्हणणे बऱ्याच अंशी खरे असून अनेक देशांचा या मताला दुजोरा आहे. "भारतातील व्यापारावरील जाचक असे निर्बंध काढून टाकून आपण भारताला जगातील उद्योग व्यापारासाठी एक 'सर्वात सुकर देश' हे स्थान मिळवून देवू" असे प्रतिपादन व आश्वासन नरेंद्र मोदी व त्यांच्या मंत्रीमंडळाकडून वारंवार देण्यात आले, येते मात्र ते प्रत्यक्षात काही येताना दिसत नाही.

## उत्पादने, मागणी, शेअरबाजार थंड

अर्थव्यवस्थेचा विकास आणि उत्पादनातील वाढ यांना कारणीभूत होणारा मोठा घटक म्हणजे ग्राहकांकडून उत्पादित मालाला होणारी मागणी. ही मागणी अन्नधान्य, कापडचोपड, चैनीच्या वस्तु, यांपासून ते गरजेच्या वा करमणुकीच्या वस्तु,


कांदा निर्यातीवर सरकारने बंदी आणल्याने लासलगाव बाजारात संतप्त शेतकरी मिटींग घेऊन सरकारचा निषेध करताना.


संकटात सापडलेली वीजनिर्मिती


ग्लोबल मार्केट

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

पाकिस्तानला टोमॅटो निर्यात बंद असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.






शेअर बाजार रोज ढासळतोय



वाहने, इलेक्ट्रॉनिक उपकरणे व यंत्रसामुग्री, विविध क्षेत्रातल्या सेवा अशा अनेकविध बाबींकरता असते. या प्रत्येक मागणी व तिच्या पुरवठ्याबरोबर समाजातील आर्थिक चलनवलन वाढते व अर्थव्यवस्थेला तिचा फायदा मिळत असतो. दुदैवाने या प्रत्येक आघाडीवर सध्या थंड, अत्यंत नरमाईचे वातावरण आहे आणि तज्ज्ञांच्या मते ही बंदी किमान काही महिने तरी अशीच कायम राहिल.

स्वयंचलित वाहनांचे उत्पादन व विक्री हे याचेच एक निदर्शक. दुचाकी व चारचाकी गाड्यांची विक्री गेले अनेक महिने थंडावली आहे. अगदी सप्टेंबर 2019 मध्ये प्रवासी गाड्यांची विक्री गेल्या सप्टेंबरपेक्षा 24 टक्क्यांनी घटली तर 'मारुती' या प्रमुख कंपनीची विक्री 27 टक्क्यांनी. याची परिणती कंपन्यांनी कामाच्या पाळ्या कमी करण्यात व थेट कामगार कपातीत झाली. एकटा वाहन उद्योग व त्याच्याशी संबंधित पुरक उद्योग यामध्ये लाखो रोजगार यामुळे नष्ट झाले. तीच गोष्ट कंन्झ्युमर गुडस् उद्योगाची.

'कोअर इंडस्ट्री' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कोळसा, खनिज तेल, वीज निर्मिती, सिमेंट, गॅस, पोलाद इत्यादींचे उत्पादनही गेल्या महिन्यात अर्धा टक्क्याने घटले तर सकल राष्ट्रीय उत्पादनामधील शेतीचा हिस्साही 18.6 टक्क्यांवरुन घसरुन 17.9 टक्क्यावर आला. ही लक्षणे आर्थिक धोरणांमध्ये काहीतरी गंभीर त्रुटी आहेत, हेच दाखवून देतात.

एकीकडे जीवनावश्यक वस्तुंचे भाव आकाशाला भिडले आहेत. पण सरकारी उपाययोजना तोकडी, उशिरा आणि अनेकदा चुकीचीच असते. कांदा निर्यात बंदीचेच ताजे उदाहरण आहे. कांद्याचे भाव वाढले म्हणून त्याच्यावर तातडीने निर्यातबंदी व साठाबंदी लादण्यात आली. परंतु हे 'आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी' सारखंच झालं. कांद्याची निर्यात बंद करताना कांदा उत्पादक शेतकऱ्याचा विचारच केला गेला नाही. तो आता बिचारा 'आपला खर्च तरी भरुन येईल का?" या विचारात डोक्याला हात लावून बसला आहे. शेतकऱ्यांच्या इतक्या आत्महत्यांनंतरही हे सरकार शेतकऱ्याच्या प्रश्नांचा साकल्याने विचार करत नाही, हेच खरं!

उत्पादनांना मागणी नसण्याचा फटका शेअर बाजारालाही बसतोय. गेले काही दिवस शेअर बाजार रोज शेकडो अंकांनी घसरुन गुंतवणुकदारांचे हजारो कोटी रुपये पाण्यात घालवतोय, तर हताश झालेले गुंतवणुकदार इतर कोणतीही किफायतशीर साधने नसल्याने आधीच आवाक्याबाहेर गेलेल्या सोन्याकडेच पुन्हा गर्दी करताहेत ! ही सगळी परिस्थिती सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे निर्माण झाली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा

शिवस्वराज्य यात्रा सत्ता परिवर्तनासाठी असली, तरी सत्ता परिवर्तन लगेच होत नाही. सुरवातीला राज्यातील जनतेच्या मनात आपल्याला मन परिवर्तन करावं लागणार आहे. हे मनपरिवर्तन करण्यासाठी ही यात्रा आहे. तुमच्या समोर आमची १५ वर्षांची कारकीर्द आहे, आणि भाजपची ५ वर्षांची कारकीर्द आहे. मतदारराजा या नात्याने आता तुम्ही विचार करा की, आमची १५ वर्षांची कारकीर्द कशी होती आणि आताच्या सरकारची पाच वर्षांची राज्यातील कारकीर्द कशी चालली आहे.

मतपरिवर्तनातून समाजपरिवर्तन हा संत एकनाथ महाराजांचा संदेश होता. त्यामुळे आपल्याला आधी मतपरिवर्तन करुन समाजपरिवर्तन घडवायचे आहे आणि त्यानंतर समाजपरिवर्तनातून सत्ता परिवर्तन घडवायचे आहे. त्यासाठी डॉ. अमोल कोल्हे, धनंजय मुंडे आम्ही सर्वांनी ही यात्रा काढली आहे.

कदाचित प्रश्न पडला असेल जयंतराव पाटील कसे नाहीत, तर ते आजही कोल्हापूर, सांगली, सातारा शहरातील पूरपरिस्थितीत अनेक नागरिक अडकलेत. माझ्या महाराष्ट्राच्या जनतेने भरभरून मदत तिथे पाठवली. त्यात धान्य, औषध, कपडे, वह्या-पुस्तके, पैसे पाठवले, जी काही त्या भागातील गरज होती ती पाठवण्याचा प्रयत्न केला. आम्ही तेथे भेटी दिल्या. आता लवकरच धनंजय मुंडे दहा हजार कुटुंबांना संसार चालवायला लागणारा भांड्याचा संच व एक महिन्याचा किराणा देणार आहे. ही सामाजिक बांधिलकी आहे. त्यासाठी आम्ही कधी फोटो लावत नाही. सांगलीतील ब्रह्मनाळ गावात पूरात बोट उलटून बोटीतील १९ लोक मरण पावली. त्या गावात भेट द्यायला जाताना मंत्री हसत फोटो काढत आहेत. हे बघितल्यावर त्या लोकांचा राग आल्याशिवाय राहत नाही. इथे माणसं मेलीत



# सरकारला चढली मस्ती बनवाबनवी झाली सस्ती दादाचा टोला सरकारवरती

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेची सभा पैठण येथे झाली. त्यावेळी पक्षाचे नेते व माजी मुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले मार्गदर्शन...



आणि तुम्ही फोटो काढताय. हसताय. ही नेमकी कशाची टिंगळटवाळी सुरु आहे. कशाची मस्ती तुमच्या डोक्यात आहे. काय चाललं आहे, याचा विचार जनतेने कुठेतरी करायला हवा. ही आठवण करून देण्यासाठी आम्ही तुमच्यासमोर आलो आहोत.

आमचा लोकसभेत पराभव झाला. तो आम्ही खुल्या दिलाने मान्य केला. त्याबद्दल दुमत नाही, परंतु आताची निवडणूक ही राज्याची आहे. देशाची निवडणूक नाही. देशाच्या निवडणुकीत तुम्ही देशाचे सरकार नरेंद्र मोदींच्या हातात दिलं. मान्य. मोदी सरकारने पुढची ५ वर्ष कारभार करावा.

आता राज्यातील निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातले प्रश्न आहेत, कोल्हे जुन्नरचे आहेत, आणि इतरही वेगवेगळ्या भागातून आहेत, सर्वत्र हीच परिस्थिती दिसत आहे. कोणताही परिसर समाधानी नाही.

आमचं सरकार आले, तर आम्ही पहिला कायदा हाच, करणार की, पैठणमध्ये कोणता कारखाना आला, तर त्यात ७५ टक्के भुमिपुत्रांना नोकरी देण्यात यावी, त्याशिवाय तो कारखाना चालणारच नाही. असे राज्याच्या चांद्यापासून बांद्यापर्यंत कुठेही कारखाने काढा. त्यात मदत करू, प्रोत्साहन देऊ, सवलती देऊ. पण, स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. २५ टक्के बाहेरचे घ्या, पण ७५ टक्के स्थानिक घेतले पाहिजेत. हा कायदा आम्ही करणार.





काय आहेत, हे लक्षात घ्यावं. मागे आमच सरकार असताना आम्ही तुमची ७१ हजार कोटींची कर्जमाफी केली. आताच्या सरकारने कर्जमाफी गेली ३ वर्ष झाली ३१ ऑक्टोबर २०१९पर्यंत मुदत वाढ दिली. ३ वर्षांत किती पैठणकरांची कर्जमाफी झाली.

दीडलाख रुपयापर्यंतची कर्जमाफी केली. म्हणजे शेतकऱ्यांना सांगितलं, साडेचार लाख रुपयांचे कर्ज आहे, तर तीन लाख भर, मग तुझे दीड लाख माफ होतील. अरे, या सरकारच्या डोक्यात शिरत का, की साडेचार लाखापैकी ३ लाख भरण्याची त्याची आयपत असती, तर तुझ्या दारात तो शेतकरी कशाला आला असता. तुम्हाला दीडलाखच द्यायचेत ना, तर देऊन टाका शेतकऱ्याला आणि उरलेले कर्ज तु तुझे माफ करून घे, असं सांगा. हीच जी काही बनवाबनवी चालली आहे. त्यांना तुम्हाला काहीच द्यायचे नाही. हे तुम्ही लक्षात घ्या.

मी पश्चिम महाराष्ट्रातला आहे, धनंजय मुंडे मराठवाड्यातील

पीक विम्याचे पैसे मिळत नाहीत, त्यावरून हे शिवसेनेवाले मुंबईमध्ये मोर्चे काढतात. अरे, तुम्हीच सरकारमध्ये आहातना, मग मोर्चे कशाचे काढताते. अधिकाऱ्यांना सांगा, पैसे दे म्हणून, हा रडीचा डाव आहे शिवसेनेचा. हे पटत का तुम्हाला. पीक विम्याचे पैसे खरिपाचे, यांचा मोर्चा रब्बीच्या इन्श्यूरन्स कंपनीवर. यांना रब्बी आणि खरिपाचा फरकही समजत नाही. हे मुंबईत राहणारे. त्यांना काय फरक समजतोय. यांना बोललं, तर राग येतो. पण, जे आहे ते आहे. राज्यात तुमचे मंत्री, आमदार आहेत, आणि हेच मोर्चा काढत आहेत. कोण ऐकणार आहे तुमचं. ही निव्वळ फसवेगिरी आहे. तुम्ही जनतेला फसवू नका, ही माझी विनंती आहे.

साधू संतांची भूमी आहे ही. चांगल्या पद्धतीच राज्य भविष्यात आपण चालवूया. तुम्ही आमच्या विचाराचं सरकार आणा, आम्ही कर्जमाफी देऊन दाखवू, आम्ही मागेही दिली

होती, आताही देऊ.

ही मंडळी काही कामाची नाहीत, मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन तरूणांची डोकी भडकवण्याचे काम ते करतात, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. समाजात दुही माजवण्याचे काम हे करत असतात.

मला तर प्रश्न पडतो की, औरंगाबाद महानगरपालिका तुम्ही ठरावीक लोकांच्या हातात कशी देता. काय ती रस्त्यांची अवस्था आहे. उशाला धरण आहे, पण प्यायला पाणी नाही, हे राज्यकर्त्यांना कळत नाही का? आमच्या इथे जनावरांच्या छावण्या सुरु आहेत. आजही माझ्या मराठवाड्यात समाधानकारक पाऊस नाहीये. हे राज्य सरकारच्या लक्षात कसं येत नाही.






अमोल कोल्हेंनी कंपनी बंद पडल्याचा आकडा सांगितला. तो देशातील आकडा होता. किंगफिशर एअरलाईन, जेट एअरवेज बंद पडले. एअर इंडिया संकटात आहे. त्यांच्यावर ६ हजार ७०० कोटींचे संकट आहे. एमटीएनएल, बीएसएनएल कंपन्या काही दिवसांनी बंद पडल्याचे कानावर येईल. या सर्व कंपन्यांमधील कामगार बेकार होतील. एनजीसी ही कंपनीही तोट्यात गेली आहे. एअरसेल, व्हीडिओकॉन, टाटा टोकोमो कंपन्याही बंद पडल्यात. सीसीडीचे मालक सिद्धार्थ यांनी टॅक्सच्या ओझ्याखाली दबून आत्महत्या केली, एवढा कवडीमोल आहे का माणसाचा जीव. हे सर्व लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी ही शिवस्वराज्य यात्रा आहे. तसंच बहुतांश बँका तोट्यात गेल्या आहेत. वाहनविक्रीचे प्रमाण घटले आहे. त्यांचे शोरुम बंद पडले आहेत. त्यामुळे तब्बल १० लाख लोक बेरोजगार झाली आहेत. या सरकारने तरूणांच्या कधी कामी यायचं?

आमचे सरकार आल्यावर सरकारमध्ये ६ लाख जागा रिकाम्या आहेत. त्या सर्वच्या सर्व जागांवर भरती करून घेण्यात येईल. जेवढ्या सहकारी संस्था असतील, त्यांना विचारून जिथं जागा असतील, तेथेही बेरोजगार तरूणांची भरती केली जाईल. ही भरती नियमाने, पारदर्शकपणे आणि मेरिटवर भरून घ्या, असंही सांगू.

आज तुमच माझं राज्य कर्जबाजारी केले आहे. आम्ही सर्वांनी ५४ वर्ष राज्य चालवलं. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरदराव पवार, विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, मनोहर जोशी, सुधाकरराव नाईक, असे अनेकांनी राज्य चालवलं. मी अर्थमंत्रालय सोडलं तेव्हा ५४ वर्ष झालेली होती. या ५४ वर्षात आम्ही अडीच लाख कोटी कर्ज घेतलं होतं, या पठ्ठ्यांनी ५ वर्षांत अडीच लाख कोटींच कर्ज काढलं. आता हे गेल ५ लाख कोटींवर कर्ज गेलं. तुमचा आमदार आला तर त्याला विचारा अडीच लाख कोटीचे पाच लाख कोटी कर्ज झाले हे खरं आहे का. ते म्हणतील बघून सांगतो, नाहीतर कदाचीत होय म्हणलं. होय म्हटलं, तर त्याला विचारा की एवढं कर्ज काढलं, तरी रस्ते का एवढे खराब आहेत, प्यायला पाणी का मिळत नाही, योजना का नीट चालत नाहीत, कर्जमाफी का होत नाही, पीक विम्याचे पैसे का मिळत नाहीत. तरूण- तरूणींना रोजगार का मिळत नाहीये. गरिबांची मुलं महाराष्ट्रात वेगवेगळ्या जागी शिकत आहेत, त्यांना अनुदान का मिळत नाहीये. त्यांच्या किती शिष्यवृत्त्या राहिल्या आहेत. मागासवर्गीय, आदिवासी समाजाची, ओबीसी समाजाची, भटक्या समाजाची सर्वांच्या शिष्यवृत्त्या राहिल्या आहेत.



बेरोजगार झालेले कर्मचारी आंदोलन करुन सरकारविरुद्ध घोषणा देताना



आज शिक्षक भरती बंद आहे. कितीतरी वेळा विक्रम काळेंनी सभागृहात आवाज उठवला आहे, की शिक्षक भरती करा. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक नाहीत, तर मग शिक्षक भरती करायला तुमचं काय जातयं.

आता ते पवित्र पोर्टल काढलंय, कशाचं पवित्र. कोणत्याही योजनांची नाव तर अशी काढायची की, लोकांना भूरळ पडते. स्मार्ट सिटी, मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र, अशी इंग्लिश नाव द्यायची, ज्याने ग्रामीण भाग तिथंच गार झाला पाहिजे.

अभ्यास तर सारखा चालू आहे. अभ्यासच यांना वैतागला आहे. अभ्यास करायचं गाजर दाखवायचं. तेही मोठी– मोठी गाजरं काढणार. आता निवडणुकीतही अशी मोठी मोठी गाजरं काढतील की काय विचारण्याची सोय नाही. त्यामुळे तुम्ही आता जातीचा, नात्याचा विचार करू नका. वेगवेगळ्या पद्धतीने काही मुद्दा काढला तर त्याला बळी पडू नका. ही पाच वर्ष कशी गेली, हे डोळ्यांसमोर आणा, दुष्काळ त्यांनी कसा हाताळला, पूरग्रस्त परिस्थिती कशी हाताळली, हे लक्षात घ्या. आमच्यावेळीही कोल्हापुरात अतिवृष्टी झाली. अवकाळी पाऊस पडला, पण आम्ही हाताबाहेर जाऊ दिलं नाही.

मोठ्या शहरातील ३० लाख घरं विक्री वाचून पडून आहेत. खरेदी करायला गिऱ्हाईकच नाही. लोकांकडे पैसाच नाही. पैशाची पॉवर आपण ज्याला म्हणतो, तीच राहिलेली नाही. महागाई वाढली शेतकऱ्याला परवडत नाही का ग्राहकालाही परवडत नाही, ही अवस्था यांनी करून ठेवली आहे.

४५ वर्षांत जेवढी बेरोजगारी नव्हती त्याहुन अधिक बेरोजगारी या काही वर्षात झाली आहे, याचा आपण कुठेतरी विचार केला पाहिजे. नोकरी असलेले बेरोजगार होत आहेत. जुन्यांचीही तिच अवस्था, आणि नवीन तयार होणाऱ्या तरूणांचीही तिच अवस्था आहे. शेतकऱ्याच्या, सामान्य माणसाच्या प्रश्नांची जाण नसलेले राज्यकर्ते शासनात बसले, तर काय होते, याची जाण आपल्याला रोज होत असेल. आता हेच राज्यकर्ते बदलण्याची वेळ आली आहे. त्यासाठी हा सर्व खटाटोप चालला आहे. राष्ट्रवादीच्या विचारांचे सरकार आपल्याला आणायचे आहे, म्हणून ही शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आम्ही या ठिकाणी आलो आहोत.

मराठा समाजाने मुक मोर्चे काढले, त्यावेळी शिवसेनेचे मुखपत्र सामनामध्ये मुका मोर्चा करून तिथं दोन जनं मुका घेत असल्याचे चित्र कार्टून तेथे काढलं होतं. त्यांनी मराठा समाजाची चेष्टा केली. या मराठा समाजातील कितीतरी लोकांनी आपल्या आयुष्याचे बलिदान दिलं. या मोर्चाचे शिवसेनेनी मुकमोर्चाचे मुकामोर्चा म्हणत खिल्ली उडवली. मराठा समाजाला विचारावसं वाटत, तुम्हाला राग येतो की नाही. त्यांना नसेल पटत, तर त्यांनी गप्प बसावं, चेष्टा का करावी. या शिवसेनेला त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे.

राईट टू इन्फोर्मेशन हा कायदा आपण केला, तर या सरकारने यात बदल केला. यावर मला प्रश्न पडतो, आमच्या काळात काही मोठी लोक आंदोलन कारायची ती आता गप्प का ?






अण्णासाहेब हजारेंना हा प्रश्न विचारायचाय, त्यांना दाखवाचयं की माहितीच्या अधिकाऱ्याच्या कायद्यात केलेला बदल हा त्या कायद्याच्या गळ्याला नख लावल्यासारखं आहे. त्यात काही अर्थच राहिलेला नाही. याचा विचारही त्या ठिकाणी होत नाही. कुठल्या कुठ सरकार चाललं आहे.

आपल्या मुख्यमंत्र्यांनी कर्नाटकच्या येडीयुरप्पांना मुख्यमंत्री पद मिळावं म्हणून त्यांच्या काही आमदारांना महाराष्ट्रात ठेवलं, त्यांना पोलीस सुरक्षा देण्यात आली. पण जेव्हा महाराष्ट्रावर पूराचं संकट येणार होते तेव्हा याच कर्नाटकच्या लोकांनी अलमट्टी धराचं पाणी सोडू दिलं नाही. त्याच्या थेट परिणाम महाराष्ट्रातील ३ जिल्ह्यांवर झाला. यासाठी त्यांचे आमदार येथे आणून ठेवले का, हे भाजपला पटत का? का मुख्यमंत्र्यांनी येडीयुरप्पांना सांगितलं नाही, मी आमदार ठेवले म्हणून तुम्ही मुख्यमंत्री झालात. धरणाचे पाणी सोडा. पण, फडणवीसांनी तसं काहीच केले नाही. त्यामुळे महाराष्ट्राला पूराचा सामना करावा लागला. लोकांचे संसार उध्वस्त झाले. याचा विचार राज्यकर्त्यांनी केला पाहिजे. जनतेनेही केला पाहिजे. त्यांच्या एका आमदाराने तब्बल साडेअकरा कोटींची गाडी घेतली. त्याच्याकडे एवढा पैसा आला कोठून, याचा विचार करा.

उद्याची निवडणूक तरूणतरूणींच भविष्य ठरवणारी निवडणूक असणार आहे. माझ्या शेतकऱ्यांना चांगले दिवस दाखवण्यासाठीची ही निवडणूक आहे. १५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यातून आया- बहिणी विधवा झाल्या. त्यांचे भविष्य ठरवणारी ही निवडणूक आहे. शेतकऱ्यांना परावृत्त करणारी ही निवडणूक आहे. त्यासाठी जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेच्या पाठीशी उभं राहिलं पाहिजे. सर्व भुलभूलैया आहे, यातून हा सर्व विचार जनतेने केला पाहिजे. त्यातून ज्याप्रकारचा कारभार त्यांचा चालला आहे, तो बदलण्याची वेळ आता आली आहे.

अनेक जण सोडून गेले. पण, जे येतील, त्यांच्यासोबत आणि जे येणार नाहीत, त्यांच्याशिवाय आपल्याला पुढे जायचं आहे. कोणाच्यावाचून कोणाचं अडत नाही. तरूणांना नवीन ताकद देता येईल, नवीन चेहऱ्यांना पुढे आणू, कोणी कोणाचा मक्ता घेतलेला नसतो. २५ वर्ष शेती करणारा शेतकरीही २५ वर्षांनी मुलाच्या हातात ती सुत्र देतो. जगाची रित आहे, काही लोक स्वार्थासाठी गेले असतील, काही अमिषापोटी गेले असतील, तर काही चौकशीला घाबरून गेले असतील.

आमचं सरकार आल्यावर लाखो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ, शेतीमालाला चांगला भाव देऊ, पीक विम्याचे पैसे देऊ, कर्जाचे पुर्नघटन करून त्याला नवीन कर्ज घेण्यासाठी पात्र करू, जुन कर्ज असेल, तर ते माफ करू, या पद्धतीची काम आम्ही करू. फक्त तुम्ही आता फसू नका, चुकू नका. कोणत्याही भावनिक मुद्यांना बळी पडू नका. जाणीवपूर्वक सत्ता आघाडीच्या हातात द्या. आता हीच वेळ आहे सत्तेवरुन सरकार खाली खेचण्याची.

# राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा



# ऐंशी वर्षांच्या तरुणाच्या मागे महाराष्ट्राची तरुणाई उभी

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे उद्गार

आमचे मित्र माणिकराव जगताप, ज्यांच्या पहिल्या विधानसभेला आम्ही सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली. त्यांच्या व्यासपीठावर आमच्या शिवस्वराज्य यात्रेची सांगत होत आहे, याचा मला फार आनंद आहे. शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांसमोर नतमस्तक होऊन आम्ही ही शिवस्वराज्य यात्रा सुरू केली. तिथून आम्ही महाराष्ट्रातल्या अनेक ठिकाणच्या गडकिल्ल्यांची माती गोळा केली. शिवस्वराज्य यात्रा महाराष्ट्रातल्या अनेक मतदारसंघात जाऊन आली. आणि आज या यात्रेचा समारोप शिवाजी महाराजांच्या समाधी समोर नतमस्तक होऊन जी शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली माती होती, ती होळीच्या मैदानावर वाहून आज आम्ही आपल्या सर्वांच्या समोर आलो आहोत. आणि आज सभाही महाडच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात होत आहे. हा एक प्रचंड मोठा योगायोग आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने पुढे गेले पाहिजे, ही भूमिका मांडणारे हे व्यासपीठ आहे. पण, या दोन्ही विचारांत फारकत केली पाहिजे, असं मानणारे आज सत्तेत बसलेले आहेत. या दोन्ही विचारांत फारकत झाल्याशिवाय आपली पोळी भाजता

येत नाही, म्हणून महाराष्ट्राच्या पोलिसांनी निवडणूक आयोगाला सांगितलेले आहे, की समाजासमाजात जातीजातीत महाराष्ट्रात जास्त तणाव आहे. महाराष्ट्रातल्या दोन समाजामध्ये तेढ निर्माण करायची, महाराष्ट्रातल्या दोन समाजाला एकमेकांपासून दूर करायचे, मतांचं विभाजन करायचं, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांपासून माणसं कशी दूर जातील, हे मागच्या दारानी बघायचं. हे मागच्या पाच वर्षात देवेंद्र फडणवीसांनी केलं. महाराष्ट्रातील शिवसेना व भाजपने केलं. जर हे केलं नसतं तर देवेंद्र फडणवीसांना महाराष्ट्रभर फिरून यात्रा काढायची काही गरज उरली नसती. तुमचं कामच बोललं असतं.

पण, तुम्ही महाराष्ट्रात कोकणवासीयांसाठी काय केले. कोकणाला देवेंद्र फडणवीसांच्या माध्यमातून काय मिळाले. ज्या शिवसेनेला कोकणवासीयांनी सातत्याने मदत केली. त्या कोकणवासीयांना शिवसेनेने काय दिले. आजही नाणार येणार का जाणार, याचे द्वंद्व दोघांच्या मनात चालू आहे. मुंबईतून येणारा हायवे यांना पाच वर्षात पूर्ण करता आला नाही. मच्छीमारांचे प्रश्न यांना सोडवता आले नाहीत. आंब्याचे बागेतील त्रस्त शेतकरी ज्यावेळी सरकारकडे गेला, त्यावेळेसही त्यांना आंब्याच्या प्रश्नावर उत्तर काढला आले नाही. सुपारीच्या बागेतील शेतकऱ्यांनीही यांच्याकडे भरपाई मागितली, पण त्यांनाही यांनी काय दिले नाही. तोंडाला पानं पुसण्याचे काम भाजप व शिवसेनेच्या सरकारने मागच्या पाच वर्षात केले. म्हणून महाराष्ट्रात सगळीकडे जाऊन सांगायला लागतंय की, आम्हाला निवडून द्या.

आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगडच्या निवडणुका झाल्या. या तीनही राज्यात तिथल्या मुख्यमंत्र्यांनी यात्रा काढल्या. त्यांचा पराभव झाला. कारण, राज्याचा प्रमुख ज्यावेळी सांगत असतो, त्यावेळी ते आपल्याला मिळत नसेल तर लोकं विरोधात जाणार नाहीत, तर काय करणार. पण, देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात फिरले. आमच्याकडे त्यांच्या बसवर लोकांनी काही फेकलं. फेकणाऱ्यांना पोलिसी खाक्यात जाऊन खाली पाडण्याचे काम ज्यावेळी झालं, त्यावेळी माझ्या मनात शंका आली की, हे भाजपचे कार्यकर्ते नाही, तर हे पोलिस दिसत आहेत. आणि तेच खरं ठरलं. देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्राच्या पोलिसांना ट्रेनिंग देऊन भाजपचे ड्रेस देऊन आपल्या बरोबर ठेवलं. आणि देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्रभ्रमण केले. येथे आमच्याकडे एक तरी पोलिस दिसतोय का. फक्त आम्ही काय बोलले, हे वरती कळविण्याकरता एखादा खासगी वेशातला असला तर असू शकतो.

मी आपल्याला खात्रीने सांगू इच्छितो, आमच्यातील काही राजे रजवाडे पक्ष सोडून गेले. काही घाबरलेले, कुठं कुठं अडकलेले पक्ष सोडून गेले. पण, महाराष्ट्रातील ८० वर्षांचा तरुण ज्यावेळी जनतेला भेटायला जाऊन लागला, त्यावेळी त्या ८० वर्षांच्या तरुणाच्या मागे तरुणाई उभी राहिली. आणि महाराष्ट्रात शरद पवारसाहेबांचे अनेक ठिकाणी स्वागत व्हायला लागले. महाराष्ट्रात मत परिवर्तन होण्याबाबतचा एक विचार सामान्य माणसांच्या मनात रुजलेला आहे.

आम्ही ही शिवस्वराज्य यात्रा घेऊन ज्याज्या ठिकाणी गेलो, त्या त्या ठिकाणी उत्सफूर्तपणे स्वागत करण्यात आले. मंडणगडला 15 मिनीटांसाठी गेलो. एका माडीवर गेलो. तिथं खाली असणाऱ्यांशी संवाद आमच्या अमोल कोल्हे यांनी सांधला. फक्त 10 मिनीटेच ते बोलले. तिथं खाली उतरलो,



त्यावेळी तिथल्या लहान मुलांपासून मोठ्या माणसांच्या चेहऱ्यावर जो आनंद होता, आणि या सरकारच्या विरोधातील भावना तयार झालेली होती. ती बघून आम्हालाही वाटतंय की, येणाऱ्या विधानसभेला ज्यावेळी मतदान होईल, त्यावेळी माणिकराव जगतापांपासून महाराष्ट्राच्या विधानसभेत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे बहुमत झालेले असेल.

मला तुमचे कौतुक करायचे आहे की, मुंबई आणि दिल्लीतून विकासासाठी कसे पैसे आणायचे, याचे ज्ञान असणाऱ्या सुनील तटकरे यांना तुम्ही दिल्लीला खासदार म्हणून पाठवले आहे. कालपासून त्यांच्या सोबत आहे, जिथे जाईल तिथं, हे करणार आहे, ही कागदपत्रे दिली आहेत. 15 दिवसांत करणार आहे. एक महिन्यात, दोन महिन्यात असे निर्णय होणार आहेत. त्यांना एवढ्या प्रमाणात सांगितले की, मला वाटले की महाराष्ट्रातच नव्हे,



तर देशात सर्वात उत्तम खासदार म्हणून सुनील तटकरे यांचे नाव देशात गाजल्याशिवाय राहणार नाही. हा एवढ डोळस नेता आहे.

आज काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर कमी झालेले आहे. दोन- चार दिवसांत आघाडी जाहीर होईल. मागच्या वेळी आपण आघाडीने राहिलो नाही. मागच्या वेळी आपण एकत्र राहिलो असतो, तर यांना कोणालाही संधी मिळाली नसती. आता आपण एकसंघपणे निर्धार करायचा आहे की, शिवसेना व भाजपची सत्ता उखडून काढायची आहे.

अनेक मुद्दे आहेत. पेट्रोल व डिझेलचे दर वाढले आहेत. त्यातील 50 रुपये राज्य आणि केंद्र सरकारच्य खिशात जातात. गॅसच्या सिलिंडरच दर वाढले. महागाई वाढली. विजेचे दरही 2013 सालामधील काढून बघा आणि 2019 मधील बघा. दरवर्षी विजेचे दर वाढविण्याचे काम या भाजप आणि शिवसेनेच्या सरकारने केलेले आहे. रिझर्व बँकेतले पैसे बाहेर काढले. आपण चीनच्या विरोधात युद्ध केले, पण रिझर्व बँकेतले पैसे बाहेर काढले नाहीत. पाकिस्तानच्या विरोधात आम्ही दोन युद्ध केले, पण रिझर्व बँकेला कधी हात लावला नाही. चंद्रशेखर पंतप्रधान असताना आरिष्ठ ओढवले आणि आपले सोने इंग्लंडला गहान ठेवले. पण, रिझर्व बँकेला कधी स्पर्श केला नाही. पण यातले काही झालेले नसताना नरेंद्र मोदींना रिझर्व बँकेतून 1 लाख 76 हजार कोटी रुपये काढले. पण, देशाच्या अर्थमंत्र्यांना त्याचे कारण सांगता येत नाही. ते पैसे कशाला वापरणार, त्याचे उत्तर देता येत नाही. आता नरेंद्र मोदींचे लक्ष तुमच्या व माझ्या पेन्शनच्या स्कीमवर आलेले आहे. कोकणात सर्वात जास्त चाकरमानी आहे. प्रॉव्हीडंन्ट फंडचा पैसा

तिथे जातो. इन्श्यूरन्स फंडचा पैसा तिथे जातो. त्याचा या श्रम मंत्रालयात एक ट्रस्ट आहे. त्यात 10 लाख कोटी रुपये आहेत. आणि ते हे पैसे या देशातील श्रम करणाऱ्या सामान्य माणसाच्या मालकीचे आहेत. त्या पैशांची योग्य गुंतवणूक करण्याचे काम श्रम मंत्रालयाचे मंत्री आणि तिथली कमिटी करत असते. आजपर्यंत प्रॉव्हीडंट फंडचे पैसे तुम्हाला परत मिळाले नाहीत, असं कधी झालं नाही. पण आता या 10 लाख कोटींच्या या फंडावर श्रम मंत्रालयाचे निर्णय घेतला आणि सांगितले की, आता आम्ही नाही. वेगळी बॉडी नेमू. आणि ती बॉडी या 10 लाख कोटीचे काय करायचे, ते ठरवणार. आरबीआयचे 1 लाख 76 हजार कोटी काढलेत. आता पुढच्या महिन्यात 3 लाख कोटी काढलेले दिसले नाही, तर तुम्ही म्हणाल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे. पूर्ण अर्थव्यवस्थेचा बोजवारा उडवला आहे. तुमच्या घरातला जर कोणी एमआयडीसीत असेल, तर त्यांना विचारा की, तुझी नोकरी आहे का सुरक्षित. तर तो उत्तर देईल की, 100 जणांना काढले आहे. कदाचित पुढच्या 50 जणांमध्ये माझा नंबर लागलेला असेल. दोन कोटी लोकांना रोजगार देण्याचे शिवसेना



भाजपचे एका बाजूला आश्वासन आणि आज दोन कोटींपेक्षा जास्त लोकांनी रोजगार गमावलाय, ही पाच वर्षांतील परिस्थिती आहे. कोणत्या तोंडाने हे तुमच्या दारात मतं मागायला येणार, हा प्रश्न आपण ठेवला पाहिजे.  आणि म्हणून माझी आपल्या विनंती आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळ्यासमोर महाराष्ट्रातील सगळे समाज एकत्र येतील. सर्व जातीधर्माच्या भिंती कोसळून जातील. आणि पूर्ण ताकदीने शिवसेना भाजपचा महाराष्ट्रात पराभव केला जाईल. हा विश्वास व्यक्त करतो. येणाऱ्या निवडणुकीत जागरूक राहून मतदान करा.

आमच्या पक्षाने जुनी माणसं जात असताना नवीन चेहरे पुढे केलेले आहेत. शरद पवारांनी 99 साली आमच्या सारख्या तरुणांच्या हाती राज्य दिले. 15 वर्षे राज्य करत असताना आम्ही महाराष्ट्र प्रगतीपथावर नेण्याचे काम केले. आमच्यावर खोटेनाटे आरोप केले. जलसिंचनाच घोटाळा झाला म्हणून सांगितले. पाच वर्षे यांच्या हातात राज्य होते. बैलगाडी भरून यांनी पुरावे दिले. यांचेच पुरावे यांना सिद्ध करता आले नाहीत. आमच्यावरील एकही आरोप सिद्ध झालेला नाही. एका बाजूला खोटे आरोप करून कार्यकर्त्यांना नेत्यांना बदनाम करण्याचे काम यांनी केले. आज त्यांना तुम्ही जाब विचारला पाहिजे. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील 17 जणांवर आम्ही आरोप केले आहेत. त्याचे पुरावे दिले आहेत. पण, त्याचा साधा रिपोर्ट विधानसभेत दाखवू शकले नाहीत. ते का दाखवले नाही, हा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना ते इथं का आले तर त्यांना माझ्या वतीने विचारा.

# महाराष्ट्राच्या भविष्याचा शिवसेना-भाजपकडून खेळखंडोबा

खासदार डॉ. अमोल कोल्हे

खर तर शिवस्वराज्य यात्रा सुरू झाल्यापासून अनेकांच्या पोटात दुखायला लागलं आहे. आताही दुसरा टप्पा सुरू झाला, त्यावेळी मुंडेसाहेबांच्या भाषेत, जे 40 पैशांचे लावारीस भक्त आहेत, त्यांच्यात हलचल सुरू झाले. काय करायचे नक्की माझे पत्रकार बांधव सतत विचारतात, खोदून खोदून विचारतात की, राष्ट्रवादी कांग्रेसने शिवस्वराज्य यात्रा कशी काय सुरु केली. मी म्हटलं सगळे करतात, तशी आम्ही यात्रा सुरु केली, नवलं काय त्यात, राष्ट्रवादीने जनजागरणासाठी यात्रा सुरु केली. तर पुन्हा, नाही नाही, राष्ट्रवादीने शिवस्वराज्य यात्रा कशी सुरु केली, मी म्हटलं छत्रपती शिवाजी महाराज काय तुमची जहागिरी वाटली तुम्हाला. का ठराविक लोकांनींच महाराजांचं नाव वापरायचे आणि पुढे चालायचे. पण, शिवस्वराज्य यात्रेचे वेगळेपण हे आहे, की फक्त छत्रपती शिवाजी महाराज की जय म्हणून ही यात्रा पुढे जात नाही, तर महाराजांना अभिप्रेत असणाऱ्या रयतेचं राज्य पुन्हा यावं, ज्या रयतेच्या राज्यात शेतकऱ्याच्या भाजीच्या देठाला हात लावू नये, ज्या रयतेच्या राज्यात परस्त्रीला मातेचा दर्जा मिळावा आणि ज्या रयतेच्या राज्यात तरूणांच्या डोळ्यात भविष्याची आशा आणि भविष्याचं सुस्पष्ट चित्र असावं, अशा रयतेचे राज्य यावं म्हणून ही शिवस्वराज्य यात्रा सुरु झाली.

या यात्रेच्या पहिल्या टप्प्यादरम्यान अचानक सांगली, कोल्हापूर, कऱ्हाड भागात पूर परिस्थिती उद्‌भवली. तसंच



# राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा

**आज महाराष्ट्राची परिस्थिती अशी झाली आहे की शिक्षणासह अजून एक सर्टिफिकेट महाराष्ट्रातील तरूणाला मिळायला लागले आहे, ते बेरोजगारीचे सर्टीफिकेट आणि मग प्रश्न पडतो की, माझ्या भावांनो महाराष्ट्रातील गावागावात नाक्यानाक्यावर बेरोजगार तरूणांचे तांडे आजसुद्धा रोजगाराच्या अपेक्षेत असताना, महाराष्ट्राच्या गावागावतील आजसुद्धा माझा शेतकरी बांधव माझ्या शेतमालाला रास्त भाव मिळावा, या अपेक्षेत असताना, कर्जमाफीच्या अपेक्षेत असताना, राज्याचे मुख्यमंत्री राज्यातील राज्यकारभार वाऱ्यावर सोडून महाजनादेश यात्रा काढत फिरू कसे शकतात?**

सर्व माध्यमांना एका गोष्टीसाठी मी धन्यवाद देईन, की खरोखर महाराष्ट्रावर एवढी मोठी आपत्ती कोसळलेली असताना ठामपणे या आपत्तीचा सामना करण्यासाठी कोण उभं होतं, ते तुमच्या माध्यमातून साऱ्या महाराष्ट्राने पाहिले.

मी परवा सोशल मीडियावर एक लेख वाचला, की एवढी राष्ट्रीय आपत्ती असताना एक ७९ वर्षांचा तरूण ठामपणे माणसांच्या पाठीशी उभा राहतो, आणि माणसांना आजही वाटतं की साहेब असतील, तर खरोखर आधार आहे. आणि त्या ७९ वर्षांच्या तरूणाचं नावं दुसरं- तिसरं काही नसून आदरणीय पवारसाहेब आहे.

या महाजनादेश यात्रेच्या बाबतीत तर काय बोलावं. कारण, एकीकडे पूर परिस्थिती असताना सन्मानिय मुख्यमंत्री यात्रा करत फिरत होते. त्यांची दुसरी यात्रा पैठणमध्ये आली का यायची आहे, आशीर्वाद घेण्यासाठी युवासेनेचे आदित्य ठाकरे आले, तर त्यांना जरूर विचारा की, पाच वर्ष तुमचाच आमदार आहे, आमदार नीट काम करतोय, नाही करतोय, हे विचारायला कधी येणार आहात. गेली पाच वर्ष सत्ता तुमचीच होती, तर पैठण मतदारसंघांचे काही प्रश्न आहेत का, हे विचारायला कधी आलात





का? मग आता निवडणुकीच्या तोंडावर कसे येता, हा प्रश्न त्यांना विचारा. तसंच जनआशीर्वाद यात्रा करताना महाराष्ट्र फिरायला तुम्हाला वेळ होता, पण अजूनही कोल्हापूर, सांगली, कऱ्हाडच्या पूरग्रस्त भागात जायला तुम्हाला वेळ मिळाला नाही, तर जनता तुम्हाला आशीर्वाद कशी देणार? ज्या पक्षांवर महाराजांचे नाव घेऊन तुम्ही पुढे चाललात, पण याच छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण जनतेला वाऱ्यावर सोडण्याची नाही, तर संकटात जनतेसोबत खंबीरपणे उभं राहण्याची आहे, याची आठवण आणि ओळख जनाशीर्वादवाल्यांना करून देण्याची वेळ आली आहे. पुरजन्य परिस्थितीत आपण बघितलं, मंत्री काय करत होते. अधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितलं, जर अलमट्टी धरणाचे पाणी वेळीच सोडले असते, तर झाला तो हाहाकार वाचला असता. मंत्री जातात, सेल्फी काढतात. आता ज्यांचा नेस्क्ट टू सीएम असा धनंजय मुंडेंनी उल्लेख केला, त्याच मंत्री महोदयांना आपण पुरग्रस्तांना, ए गपे... असं सुनावताना, पाहिलं.

मग खरंच प्रश्न पडतो, जेव्हा जनता ही आपत्तीमध्ये असते, जेव्हा सर्वसामान्य माणूस अडचणीत असतो, तेव्हा मंत्र्यांनी त्यांना साथ द्यायची असते, की त्यांना दरडवायचे असते, जेव्हा सर्वसामान्य माणूस अडचणीत असतो, तेव्हा मंत्र्यांनी तेथे जावून मी कशी मदत करतो त्याचा सेल्फी काढायचा असतो की त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्याला धीर द्यायचा असतो. ही परिस्थिती तुम्ही याची देही याची डोळा पाहीली आहे. ही गोष्ट येत्या विधानसभेला लक्षात ठेवा. एवढच नाहीतर मागील पाच वर्षांचा इतिहासही लक्षात ठेवा. तब्बल २२ मंत्र्यांच्या विरोधात काही ना काही प्रत्येक वेळी आरोप झालेत, प्रत्येकवेळी त्यासाठीचे पुरावे समोर ठेवले गेले, पण, मुख्यमंत्र्यांनी एक सिंगल विंडो सिस्टीम काढली आहे, ती म्हणजे क्लीन चीट. आरोप कोणावरही करा, मुख्यमंत्री सांगतात क्लीन चीट, मग खरच प्रश्न पडतो, की नक्की चिक्की मुरते कुठं, नक्की मोबाईल जातात कुठं, माजी शिक्षणमंत्र्यांचा बनावट दाखला येतो कुठून, एवढं सगळं होत असताना आता महाराष्ट्रच या शिवसेना भाजपला प्रश्न विचारतोय की आता नक्की कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा.

विचार करा कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा. इथल्या माझ्या किती शेतकरी बांधवांना कर्जमाफी मिळाली. कितींना पीक विम्याचा परतावा मिळाला. तरूण बांधवांपैकी किती जणांना मेगाभरतीसाठी इंटरव्ह्यूला बोलवलं आणि किती जणांना नोकऱ्या लागल्या. वनरक्षकाची परीक्षा, ही १२० मार्कांची परीक्षा, चुकीच्या उत्तरासाठी वजा २ मार्क. त्यानुसार एखाद्याला सर्व उत्तर आली, तर त्याला १२० मार्क मिळायला हवेत, तर एक उत्तर चुकले तर ११८ मार्क मिळणे अपेक्षित असेल. परंतु, या परिक्षेत एकाला ११८.५ मार्क मिळाले आहेत. तरुणांनो, तुमच्या भविष्यावर वरवंटा फिरवला जातोय, तेही दिवसाढवळ्या. दिवसाढवळ्या तुमचा हक्क मारला जातोय, तुमच्यासाठी असलेल्या नोकरीवर कोणीतरी नियम डावलून ११८ किंवा १२० मार्क मिळाले पाहिजेत, पण तुमच्या डोळ्यांदेखत ११८.५ मार्क दिले जात आहेत. म्हणजे तुमच्यासमोर वशिल्याने तिथे

कोणीतरी घुसतोय, याचा थोडा विचार करा. तुमच्या भविष्याचा खेळखंडोबा कोणीतरी करतोय याचा विचार कोणीतरी करा.

धनंजय मुंडे यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला की, १५ वर्ष काँग्रेस आणि राष्ट्रवादी सत्तेत असताना, आताच्या पद्धतीचे राजकारण झालं असते, तर काय झालं असते?, हा प्रश्न एका सर्वसामान्य माणसाने विचारला. त्यानं विचारलं या पद्धतीन राजकारण आता चाललंय, तर पुढे काय होईल. मी म्हटलं, कोणाबद्दल आपण वाईट बोलत नाही. एवढंच सांगेन की, देव या राज्यकर्त्यांना सुबुद्धी देवो. सुबुद्धी अशासाठी की अशाच प्रकारे जनतेचे हित वाऱ्यावर सोडले, तर जनता सत्तेतून खाली उतरून तुडवायला कमी करणार नाही. असा कारभार करू नये, अशी सुबुद्धी राज्यकर्त्यांना देवो.

आता पैठणबाबत जेव्हा आपण विचार करतो, दादांच्या माध्यमातून ब्रह्मगव्हाण पाणी उपसा सिंचन असेल. २००९ ला मंजूर झाली. ११० कोटीची काम पूर्ण झाली. आणि २२० कोटीची योजना मागिल पाच वर्षात कितीवर गेली. पाणी पोसायचे की पाणी मुरवायचे, हे खरतर पत्रकार बांधवांनी विद्यमान आमदारांना विचारायला हवं.

दादांच्या माध्यमातून पैठण आपेगावच्या विकास आराखड्याचे काम झाले. आपेगावमध्ये दोन बंधारे झाले. गेल्या पाच वर्षांत मात्र पैठण एमआयडीसीमध्ये किती उद्योग धंदे आले, तरूण बांधवांनी विचार करायचाय की, गेल्या पाच वर्षांत पैठण एमआयडीसीमध्ये किती उद्योग धंदे आले आणि त्यातून तुम्हाला आम्हाला किती नोकऱ्या मिळाल्यात, याचा विचार करा.

अर्थव्यवस्था ढासळल्याने काय फरक पडतो, असा तरुण विचार करतात. एका तरुण मित्राने विचारलं, अर्थव्यवस्था ढासळल्याने आम्हाला कुठ काय फरक पडतोय, तेव्हा त्याला समजावलं. अर्थव्यवस्था ढासळते म्हणजे नक्की काय होते, हे सांगतो. गेल्या ५ वर्षांत महाराष्ट्रातील १ लाख ४२ हजार कंपन्या बंद पडल्या, ४४ लाख पेक्षा जास्त तरूण बेरोजगार झाले. जेव्हा अर्थव्यवस्था ढासळते, तेव्हा तुमच्यावर कर लादला जातो. कर लादला जात असताना महागाई भडकत जाते. महागाई भडकत असताना तुमच्या खिश्यात हात घातला जातो. आणि जेव्हा तरूण शिक्षण घेऊन येतात, तेव्हा आज महाराष्ट्राची परिस्थिती अशी झाली आहे की शिक्षणासह अजून एक सर्टिफिकेट महाराष्ट्रातील तरूणाला मिळायला लागले आहे, ते बेरोजगारीचे सर्टीफिकेट आणि मग प्रश्न पडतो की, माझ्या भावांनो महाराष्ट्रातील गावागावात नाक्यानाक्यावर बेरोजगार तरूणांचे तांडे आजसुद्धा रोजगाराच्या अपेक्षेत असताना, महाराष्ट्राच्या गावागावतील आजसुद्धा माझा शेतकरी बांधव माझ्या शेतमालाला रास्त भाव मिळावा, या अपेक्षेत असताना, कर्जमाफीच्या अपेक्षेत असताना, राज्याचे मुख्यमंत्री राज्यातील राज्यकारभार वाऱ्यावर सोडून महाजनादेश यात्रा काढत फिरू कसे शकतात?

सत्तेतील वाटेकरी असणारी शिवसेना जनाशीर्वाद यात्रा करत असताना राज्यकारभार सोडून अजून आचारसंहिता जाहिर झाली नाही, तरी महाराष्ट्रभर फिरू कसे शकतात. म्हणून तुमच्या भविष्यासाठी सांगतो, अशी सत्ताधाऱ्यांची यात्रा महाजनादेश असेल किंवा जनाशीर्वाद यात्रा असेल, जर तुमच्या गावात आली, तर यात्रा अडवा. त्यांना यात्रा काढण्याचा अधिकार नाही. उत्तर देणं, हे त्यांचे कर्तव्य आहे आणि हे उत्तर मागितल्याशिवाय आता त्यांना सोडू नका. गेल्या ५ वर्षांत जो काही आपल्या भविष्याचा खेळखंडोबा झालाय, तो येणाऱ्या विधानसभेत विसरू नका. राष्ट्रवादी पक्ष, त्यांचे मित्रपक्षाच्या आघाडीचा जो कोणी उमेदवार असेल, तो पैठणचा आमदार व्हावा. कारण, पैठण ही साधीसुधी नगरी नाही, तर सातवान राज्याच्या राजधानीचं शहर आहे. संत एकनाथ महाराजांनी त्यांच्या अभंगातून, भारूडातून जी जनजागृती केली, संत एकनाथांनी, बये दार उघड...असं म्हणून हाक मारली. आता, बये दार उघड...ही हाक पैठणपासून सुरु करण्यासाठी आज ही शिवस्वराज्य यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याची पहिली सभा इथे घेतली. एकनाथांच्या, बये दार उघड...मध्ये जी ताकद होती, ती पैठणवासीयांच्या प्रत्येकाच्या मनात असावी, आणि याच ताकदीन या शिवस्वराज्य यात्रेची फलस्पष्टी ही सत्ता पालटात व्हावी, ही तुम्हा सर्वांना कळकळीची विनंती आहे.



# राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा



रायगडच्या भूमीतील सर्व आमदार शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचे कसे होतील, यासाठी लढणारा मी लढवय्या आहे. त्यामुळे आपल्या सर्वांनी जिद्द बाळगळी पाहिजे. त्यासाठी आता 30 दिवस उरले आहेत. या तीस दिवसांत आपण प्रचाराची राळ उठवूया. आज महाड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळ्यापासून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करत आज आपण ऐतिहासिक स्वरूपाची प्रचार मिरवणूक झाली. येत्या 24 तारखेची प्रतिकात्मक मिरवणूकच झाली. आपण सर्वांनी मिळून जागृकपणे काम करावे. मेहनत तर आपल्याला घ्याचीच आहे. आता मला एकट्याला खासदार करून तुम्हाला थांबायचे नाही, तर या महाड, पोलादपूर, माणगाव तालुक्याचा विकास करायचा असेल, तर माणिक जगतापला आमदार करूनच आपल्याला या भूमीतून जायचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बारा बलुतेदार, अठरा पगड जातींना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना केली. आणि सामाजिक एकतेचा हुंकार या देशात येथील महाडच्याच चवदार तळ्यावर मिळाला. जसा मी रायगडचा खासदार म्हणून मला अभिमान आहे, तसा या महाडचा आमदार ही या भूमीला साजेसा सुसंस्कृत विचाराचा असला पाहिजे, ही खूणगाठ तुम्ही बांधली पाहिजे. तो खंडणी मागणारा असेल, तो गुंडगिरी करणारा असेल; तर त्यालाही त्याची जागा दाखविण्यासाठी आपण सज्ज झाले पाहिजे, ही काळाची गरज आहे.

आज वरुणराजानेही स्वागत केले. पण या अंगणातून एकही माणूस हलला नाही. पाऊस जरी चालू राहिला असता, तरी कोणी हललं नसतं. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते येथे आहेत, त्यांना एकच सांगतो की, जसं लोकसभेला सुनील तटकरे यांच्यासाठी तुम्ही वाहून घेतलं, त्याच्यापेक्षा काकणभर सरस व एक पाऊल पुढे चालायचं. दोन– चार माणसे गेली म्हणून काळजी करू नका.



# महाराष्ट्रात शिवस्वराज्य स्थापायचे आहे...

## खासदार सुनील तटकरे

आपण एक विश्वास मनात बाळगून कामाला सुरवात करूयात.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली, त्यावेळी माणिकराव जगताप संस्थापक सदस्य होते. आज आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ कोठे झाला नाही, कारण आमच्या प्रदेशाध्यक्ष व महाराष्ट्रातील सर्वांत स्टार प्रचारक डॉ. अमोल कोल्हे या ठिकाणी आले, याचा अर्थ तुम्ही समजून घ्या. आपण सर्वांनी या ठिकाणी कामाला सुरवात करूयात.

महाड, पोलादपूरच्या विकासासाठी आम्ही सर्व कटिबद्ध आहोत. या संबंध होणाऱ्या राजकीय घडामोडींमध्ये मनाचा स्थिरपणा असणारी माणसं स्थिर राहिली. ज्यांच्या मनामध्ये संभ्रम होता. ज्यांच्या स्वतःच्या भवितव्याची भीती होती, ती कदाचित माणसं आपल्याला सोडून गेली असतील, पण सर्वसामान्य माणूस आपल्या सोबत आहे. महाडच्या भूमीचे नाव मोठे आहे. पण, गेल्या दहा वर्षात विधानसभेत जे चित्र दिसत आहे, ते जर बदलायचे असेल, ते जर दुर्दैव आपल्या पुसायचे असेल, छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीवर जाऊन पक्षाच्या नावाने घोषणा देण्याचे काम जे मंडळी करत असतील, त्यांना जागा दाखवून देण्याचे काम तुम्ही लोकांनी करावे, एवढीच कळकळीची विनंती करतो. आता नवीन विचार घेऊन या महाड- पोलादपूरमध्ये राजकारण करण्यासाठी आपण सज्ज व्हावं.

शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आपण आज रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीवर नतमस्तक झालो आणि आज आपल्या प्रचाराचा शुभारंभ या पवित्र महाडच्या भूमिमध्ये होत आहे. याचा अर्थ असा आहे की, ज्या कारणासाठी ही शिवस्वराज्य यात्रा काढली, ते शिवस्वराज्य पुन्हा या महाराष्ट्रात प्रस्थापित करण्यासाठी जनतेचे आशीर्वाद आपल्याला मिळतील.



# विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेनेला त्यांची जागा दाखवा

## विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचे उद्गार

आज राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस फोडण्याचा प्रयत्न भाजप आणि शिवसेनेकडून होत आहे. एवढ्या खालच्या पातळीचे राजकारण या पुरोगामी महाराष्ट्रात कधीच झाले नाही. ज्या लोकांच्या विरोधात भाजप शिवसेनेनं आंदोलने केली, मग ते बबनराव पाचपुते असतील, बबनराव पाचपुतेंनी भ्रष्टाचार केला म्हणून फडणवीस तुम्ही ओरडलात, उद्धव ठाकरे तुम्ही ओरडलात, त्यात पाचपुतेंना तुम्ही भारतीय जनता पार्टीत घेतलं. मग भाजपमध्ये गेल्यावर पाचपुतेंनी केलेला भ्रष्टाचार कुठे गेला, याचे उत्तर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला द्यावं.

तुम्ही विजय गावितांना घेतलं. गावितांविरोधात तुम्ही रान पेटवलं. सभागृह अनेक दिवस चालू दिले नाही. तुम्ही त्यांच्या विरोधात कोर्टात गेलात. कोर्टानेही त्यांना दोषी ठरवलं, त्या विजय गावितांना तुम्ही घेतलं आणि तुम्ही घेतल्यानंतर विजय गावित लगेच पवित्र झाले. मग तुम्ही भ्रष्टाचाराचे बोललात त्याचे काय, याचे उत्तर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आणि ठाकरेंनी देण्याची गरज आहे.

पिचडांचा प्रवेश झाला, या पिचडसाहेबांना आदरणीय पवारसाहेबांनी काय नाही दिलं. सावलीसारखे पिचडसाहेब पवारसाहेबांच्या मागे उभे राहिले. पिचडांनी प्रवेश केला तरी मला त्यांच्या प्रती आदर आहे. पण महाराष्ट्राच्या जनतेला कळायला पाहिजे की पिचडांनी प्रवेश का केला. नाहीतर आपल्याला वाटेल राष्ट्रवादीत काय चाललं आहे. पिचडांच्या दुसऱ्या मंडळी, म्हणजे दुसरी बायको, ज्या आदिवासी नाहीत. त्यांनी खोटे आदिवासीचे सर्टिफिकीट काढलं, आणि जेथून समृद्धी मार्ग जातोय तिथल्या

आदिवासींची जमीन खोट्या आदिवास्याच्या सर्टिफिकीटवर खरेदी केली. ती जमीन समृद्धीमध्ये गेली. तिचे १५ कोटी मिळाले. आता समृद्धीमधून १५ कोटी खोट्या आदिवासी सर्टिफिकीटवर काढल्यावर त्यांच्यावर काय व्हायला पाहिजे. एफआयआर व्हायला हवी की नाही. ते गेले काशीच्या घाटात, झाले पवित्र. एवढं नीच राजकारण या महाराष्ट्रात कधी पाहिलं नाही.

आता माझ्या मोबाईलवर एक ब्रेकिंग न्युज आली. न्युज काय, तर राज ठाकरेंना ईडीची नोटीस. का. कारण, या महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीत याच राज ठाकरेंनी भाजप आणि शिवसेनेचा पर्दाफाश केला. ते त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी नाही, तर या महाराष्ट्राच्या गोरगरिब जनतेला कळाव कोण फसवतय. तुम्ही बोलता काय, घ्या मग ईडीची नोटीस.

मला या भाजप आणि शिवसेनेच्या राज्यकर्त्यांना सांगायचयं, कोणीही राज्यकर्ता अमृत पिऊन कायम राज्यकर्ता झालेला नाही. पण ज्या पद्धतीच राजकारण गेल्या ५ वर्षांत तुम्ही चालू केलंय. कदाचित दादांनी १५ वर्षांत सत्तेत असताना एवढ्या खालच्या पातळीचं राजकारण केले असतं, तर भाजप शिवसेना पुढच्या २५ वर्षांत बीला सुद्धा दिसलं नसतं. पण, आपल्यावरती हे असले संस्कार नाहीत. आपण एवढ्या खालच्या पातळीला जाऊन राजकारण करत नाही. म्हणून ही शिवस्वराज्य यात्रा काढली. शेवटी ताकद ही माय़बाप जनतेच्या हातात आहे. १-२ माणसं इकडं तिकडं गेल्याने पक्ष कधी संपत नसतो, हे फडणवीस आणि ठाकरेंनी सुद्धा लक्षात घ्यावं. आपणही विरोधी पक्षात होतात, पण कधी जनतेने तुम्हाला एवढे आमदार निवडून दिले नाही. तुम्ही महाराष्ट्राच्या जनतेची वारंवार फसवणूक केली. महाराष्ट्राच्या शेतकऱ्याची फसवणूक केली. आपल्या मराठवाड्याच्या शेतकऱ्यांची फसवणूक केली. प्रत्येकवेळी मराठवाड्यात आले की म्हणायचं आता आम्ही मराठवाड्यात वॉटर ग्रीडने सोडणार, पण आता वॉटर ग्रीडला बोलून ४ वर्ष झालेतरी कुठे आहे ती त्याचा काही नेमका मेळ लागत नाही. जे काही काम झाले असतील ते आपल्या मनावर हात ठेवा आणि मनाला विचारा, ज्यावेळी दादा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री होते आणि त्या भागाचा आमदार राष्ट्रवादीचा होता, त्याचवेळीच या भागातील काम खऱ्या अर्थाने झाली असतील, जे मागच्या ५ वर्षात झाले नाहीत. म्हणून ही शिवस्वराज्य यात्रा ही जनतेचे राज्य आणण्यासाठी, तुमचं राज्य आणण्यासाठी, बळीराजाचं राज्य आणण्यासाठी, या ठिकाणी सुरु आहे.

मधे शिवस्वराज्य यात्रा आपण थांबवली, का तर कोल्हापूर सांगलीमध्ये महापूर आला. सबंध सांगली व कोल्हापूर जिल्हा पाण्याखाली, ६ तारखेला ज्यादिवशी शिवस्वराज्य यात्रा सुरु होणार, त्या दिवशी आपल्या राज्याचे अध्यक्ष जयंत पाटील यांचा मतदारसंघही पाण्याखाली होता. यात्रेत आले सुरवात केली, त्याच क्षणी पुन्हा आपल्या जिल्ह्यात गेले आणि त्या पूरग्रस्त भागातील सामान्य जनतेला पाण्यातून बाहेर काढण्यापासून ते आज पर्यंत त्यांचे कुटुंब पुन्हा उभ राहावं म्हणून जयंत पाटीलसाहेब, हसन मुश्रीफसाहेब हाडाची काडं करत आहेत. पण, जेव्हा तेथे पूर आला त्यावेळी मुख्यमंत्री महाजनादेश यात्रेत आणि युवराज जनाशीर्वाद यात्रेत होते. ६ तारखेपासून सलग पुढचे ५ दिवस लाखो लोक पाण्यात असताना राज्याचा एकही मंत्री तिथं गेला नाही. मुख्यमंत्री जनादेश यात्रेत, युवराज जनाशीर्वाद यात्रेत, तिथल प्रशासन फोन उचलायला तयार नाही. माणसं काढायची कशी, प्रशासनाकडे बोटी नाहीत. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी फोन बंद केले होते. या परिस्थितीत सामान्य माणसाला आधार कोणी दिला असेल, तर मला अभिमान वाटतो की राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा कार्यकर्ता म्हणून सांगायला की, हात फक्त राष्ट्रवादीने दिला.

नेक्स्ट टू सीएम चंद्रकांत दादा, यांचे तर एवढे वाईट हालत आहे, की रस्त्यावर माणसं फिरू देईनात म्हणून पूर परिस्थिती असताना १४४ चं कलम कोण शहाणा लावल का?, तिथं येऊन कोण दंगली करलं का?, हे १४४ चं कलम कशासाठी, तर लोकांनी चंद्रकांत दादांना रस्त्यांनी फिरताना काही विचारू नये. त्याच्याशिवाय या बाबाला बाहेर पडता येणार नाही. आज एवढी वाईट अवस्था आहे, की या भागातील सर्व सामान्य माणूस आम्ही दौरा केला, दादांनी केला, पवारसाहेबांनी केला. तेव्हा सामान्य माणूस एकच म्हणत होता, की अशी परिस्थिती २००५ लाही आली होती. तेव्हा प्रत्येक गावात मंत्रीमंडळातील २०- २० मंत्री आमच्यासोबत आम्हाला आधार द्यायला उभे होते, पण आज आम्हाला आधार द्यायला कोणी उभं नाही. आपण मराठवाड्यात दुष्काळ भोगतोय, याही भागात अनेक ठिकाणी दुष्काळ आहे, पण या दुष्काळाच्या परिस्थितीतसुद्धा आपल्याला आधार द्यायला कोण नसतं. या गोष्टीचा विचार येणाऱ्या निवडणुकीच्या काळात करावा लागेल.

ही शिवस्वराज्य यात्रा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावानी सुरु केली आहे. या शिवस्वराज्य यात्रेला आपल्या सर्वांचा आशीर्वाद पाहिजे. भाजप आणि शिवसेनेने गलिच्छ राजकारण या महाराष्ट्रात चालू केले आहे. याच भाजप आणि शिवसेनेला या छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राच्या मातीत गाडल्याशिवाय स्वस्थ बसायच नाही, हा संकल्प शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने तुम्ही करा.

या भागात या मतदारसंघात पक्ष ज्याला उमेदवारी देईल, तो राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा उमेदवार आपण निवडूण द्यावा आणि भाजप- शिवसेनेला त्यांची जागा दाखवावी, ही कळकळीची विनंती करतो.

## राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा



# जंतरमंतरवर भारताचे संविधान जाळण्याचे पाप भाजपकडून...

### राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस अमोल मिटकरी यांचा आरोप

आम्ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरलो. शिवस्वराज्य यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून लोकांना जाणता आलं. अनेकांशी बोलता आलं. जाणता आलं. आज रायगडाला अभिवादन केलं. राजसदरेवर गेलो. महाराजांच्या समाधीचं दर्शन घेतलं. आणि महाडच्या चवदार तळ्याचं दर्शन घेतलं. ही दर्शन घेण्याची ठिकाणं आहेत. ही जनपूजनाची किंवा कोणाची पूजा करण्याची ही स्थळं नाही, हे भरत गोगावलेंना कोणी तरी सांगा.

आता निडणुका जाहीर झाल्या आहेत. 21 तारखेला मतदान आहे आणि 24 ला निकाल आहे. आता तुमची जबाबदारी वाढली आहे. प्रत्येक ठिकाणी हेर आहेत. इतका प्रचंड पैसा आहे, जर एखाद्या मतदारसंघात दोन कोटी लागत असतील, तर ते म्हणतात, तीन कोटी देतो. पण सीट निवडून आली पाहिजे. एवढा पैसा त्यांनी नोटबंदीनंतर जमा केला आहे. तो आता ते बाहेर काढणार आहेत. आपल्याकडे काय आहे, तर फक्त प्रामाणिकपणा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा धागा धरून बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाला डोक्याला लावून प्रामाणिक कार्यकर्त्यांचा हा सैलाब काँग्रेस आणि राष्ट्रवादी कँग्रेसकडे आहे. बाकी आमच्याकडे काही नाही. ते आता पैसा काढतील. तुम्हाला चकवतील. तुम्हाला धाक दाखवतील. पण, कोणाला घाबरायचे नसते. जर घाबरता तर शिवाजी महाराजांचे नाव कशाला घेता.

मघाशी पेंग्विन साहेबांचा उल्लेख झाला. त्यांचे आता नवीन नाव आले, पप्पू. महाराष्ट्राला एक नवीन पप्पू मिळाला,

हे मॅडमनी सांगितले. पप्पूची काय ताकद आहे हो, रायगडावर यायची. रायगड चढून दाखवा बरं माझ्यासोबत. रायगड चढायला काळीजही मर्दाचं लागतं. अलत्याभलत्या लोकांचे हे काम नाही. चला आम्ही पैज लावतो, 6 जूनला महाराजांच्या राज्याभिषेकाला पेंग्विन साहेबांनी माझ्या खांद्याला खांदा लावून रायगड चढावा. सोपं नाही साहेब. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेणे सोपं आहे. त्यांच्या नावाने सत्ता मिळवणे सोपं आहे. ही ती क्रांतीभूमी आहे, जिथे 20 मार्च 1927 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळे पाण्याचा सत्याग्रह केला. आणि 25 डिसेंबर 1927 ला मनुस्मृतीचे दहन केले, ती ही ऐतिहासिक भूमी आहे, ही महाड. पाण्यासाठी संघर्ष करावा लागला या देशात महामानवाला. बाबासाहेबांनी 1 जानेवारी 1927 ला कोरेगाव भीमाला भेट दिल्यानंतर हे दोन प्रसंग आहेत. मनुस्मृती का जाळली बाबासाहेबांनी. मनुस्मृतीमध्ये एका धर्माचे राज्य स्थापन करण्याचे आदेश रचनाकाराने दिलेले आहेत. पण, बाबासाहेब आंबेडकारांनी जे संविधान दिले. मी म्हणत नाही, तर रामदास फुटाणे म्हणतात,

हजारो वर्षे त्यांनी शस्त्रे परजली आणि
इथला कोपरासुद्धा हलला नाही...
हजारो वर्षे त्यांनी शस्त्रे परजली आणि
इथला कोपरासुद्धा हलला नाही...
आणि बाबा तुम्ही पेन उचलला आणि
या देशाचा इतिहास बदलला, इतिहास बदलला...

इतिहास बदलल्यामुळे आम्हाला इथं बोलण्याचा अधिकार मिळाला. हा बाबासाहेबांच्या संविधानाने दिलेला अधिकार आहे.

मेरे भीमने कमल उठाई और
इस देश का संविधान बन गया...
इस संविधान की ताकद तो देखो,
एक चाय बेचनेवाला इस देश का पंतप्रधान बन गया...

चहा विकला की नाही, हा भाग वेगळा. ते खोटचं बोलले. खोटं बोलूनच सत्ता घेतली आहे.

या भाजपसोबत शिवसेना नावाचा पक्ष पाच वर्षे सत्तेत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत त्यांनी एक अधिकृत फतवा काढला आहे. जनसंवाद यात्रेच्या कोणत्याही फलकावर शिवाजी महाराजांचा फोटो नसावा. म्हणून तुम्हाला फोटो कोणाचे दिसतात. शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे, त्यांच्या बाजूला उद्धव ठाकरेंचा फोटो, त्यांच्या बाजूला आदित्य ठाकरेंचा फोटो, त्यांच्या बाजूची जागा रिकामी आहे, ती येत्या दहा- बारा वर्षात भरणार आहे. म्हणजे यांच्या पुढच्या पिढ्या तुम्ही पोसत राहायच्या. ते शिवबंधन त्याच्यासाठीच आहे. शिवबंधनाचा अर्थ काय आहे, ज्याप्रमाणे बळीराजांनी आमचं त्या काळात संरक्षण केलं, तसं तुम्ही आम्ही ज्यावेळी सत्तेत असताना संरक्षण करत जा. म्हणजे तुम्ही गुलामच आहे.


पावसातही लोक भाषण ऐकत उभे राहिले.

बाबासाहेब म्हणतात, गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या. जोपर्यंत त्याला गुलामीची जाणीव होणार नाही, तोपर्यंत तो बंड करून पेटून उठणार नाही. हे शिवसेना- भाजपवाले विचारतात, 70 वर्षात या काँग्रेस- राष्ट्रवादीने काय केले. 70 वर्षात भारतीय राज्यघटना जाळण्याचे काम काँग्रेसच्या काळात झालेले नाही. पण, भाजपच्या काळात 9 ऑगस्ट 2018 रोजी दिल्लीच्या जंतरमंतरला भारताचे संविधान जाळण्याची घटना घडली. हे पाप या भाजप सरकारने केलेले आहे आणि त्या पापामध्ये शिवसेना वाटेकरी आहे.

परवा भरत गोगावलेंचा एक फोटो आला. किती चांगले चित्र आहे. शिवस्वराज्य यात्रा महाडमध्ये आहे. मुख्यमंत्र्यांची महाजनादेश यात्रा गेली. कोणी शाई फेकली, कोणी कोंबड्या फेकल्या. कोणी बलून फेकले. कोणी अंडी फेकली. बरं झालं त्यांना कोणी ढकलले नाही वरून. आणि आताही आदित्य ठाकरेंची जनआशीर्वाद यात्रा आली. त्यांचंही तसंच झालं. फक्त जे काही फेकले होते, ते दिसले नाही. शिवस्वराज्य यात्रा महाडमध्ये आली, निसर्गाने आपले स्वागत केले. सभा सुरू झाली. खासदारसाहेब स्टेजवर आले, पावसाने ब्रेक दिला. तीन दिवसांपूर्वी वेधशाळेचा अंदाज होता की, कोकणात भरपूर पाऊस असणार. पण आता पाऊस बंद झाला की नाही. मी चमत्कार बिमत्कार मानत नाही. पण हा शिवाजी महाराजांचा एक नैसर्गिक संदेश आहे की, ज्यांची पावलं सोनपावलं आहेत, अशाच लोकांचं या महाराष्ट्रात सरकार येणार. त्याचा हा संकेत आहे. तो शिवरायांचा संकेत आहे. अमोल कोल्हे यांच्या कपाळावर जो टिळा आहे, तो महाराजांच्या समाधीवर डोकं टेकवल्यानंतर उमटलेले आहे. हा काही उद्धव ठाकरे यांना मिळालेला नाही. पेंग्वीनने तर विचारच करू नये. पेंग्वीनने नेतृत्व करावे का तुमच्यासारख्या वाघांचं. चाललेत मागं, आमचा मुख्यमंत्री, आमचा मुख्यमंत्री करत. कसला मुख्यमंत्री. दीड दिवसांचा गणपती बसवावा, तसा मुख्यमंत्री. अरे हाड, महाराष्ट्राचे आणि शिवरायांच्या या भूमीचे नेतृत्व वाघांनीच केले पाहिजे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे हेच वेगळेपण आहे. शिवस्वराज्य यात्रा ज्या ज्या ठिकाणी गेली, त्या त्या ठिकाणी निसर्गाने स्वागत केले. पवारसाहेब ज्या भागात होते, त्या भागात पाऊस पडला. तिकडे पाऊसच नव्हता. पवारसाहेबांचा दौरा सुरू झाला आणि उस्मानाबाद असेल, बीड असेल, परळी असेल, त्या भागात भरपूर पाऊस यायला लागला. हे वेगळेपण आहे. निसर्गसुद्धा आपल्या सोबत आहे.

मी सांगत नाही, तर पोलिस खात्याचा अहवाल आहे की, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर सर्वात जास्त तेढ या महाराष्ट्रात निर्माण झाली. आणि महाराष्ट्राचे गृहमंत्री कोण आहेत, देवेंद्र फडणवीसच आहेत. म्हणजे जातीय तणाव कोणाच्या काळात वाढला, तर या फडणवीस साहेबांच्या काळात वाढला. गृह खातं कोणाकडे, फडणवीस साहेबांकडे. आता हा रिपोर्ट इलेक्शन कमिनशकडे दिला, की तो त्यांना द्यायला लावला, हे पेशवाईचे गणित तुमच्या आमच्या डोक्यात लगेच येणार नाही. पवारसाहेब म्हणालेत, पुलवामासारखं यांनी काही घडवलं तर काही होणार. पण, तसं काही झालचं नाही, तर महाराष्ट्रामध्ये यांची सत्ता येणार नाही. म्हणजे आता हे काय करतील, आता कोणाला अटक करायचे, कोणाचे आरोपपत्र करायचे, कोणाला अटक करायची. आणि मग हिंदू- मुसलमान, हिंदू- दलित, मराठा- बौद्ध असं वातावरण तयार करण्याचा प्रयत्न प्रस्थापित सरकारकडून होऊ शकतो. आणि त्यात आगीत पेट्रोल टाकण्याचे काम सरकार करीत आहे.





# शेतकऱ्यांच्या विरोधी असणाऱ्या युती सरकारला सत्तेतून हटवा

## राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे जनतेला आवाहन

नांदेड : सरकारला काही अडचण आली तर परदेशातून आयात करण्याची भुमिका हे सरकार घेतं पण आपल्या शेतकऱ्यांना दोन पैसे देण्याची भूमिका यांची नाही. तर आत्महत्येच्या वाटेवर जाण्याची अपेक्षा ठेवायची या पध्दतीने कोणी शेतकऱ्यांकडे बघत असेल तर अशांना सत्तेतून हटवण्याशिवाय पर्याय नाही असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी नांदेड येथील जाहीर सभेत सरकारला दिला. काळ्या आईशी इमान राखणाऱ्या शेतकऱ्यांच्या भल्यामध्ये आजच्या सरकारला रस नाही. हे सरकार शेतकऱ्यांचे कर्ज माफ करत नाही तर कंपन्यांचे कर्ज माफ करतेय जो भुक भागवतोय त्यांना कर्जमाफी नाही अशा शब्दात शरद पवारांनी सरकारवर निशाणा साधला.

या राज्यात आणि देशात ६५-६६ टक्के लोक शेती करतात. आज चित्र हे वेगळेच दिसतेय. कर्जबाजारी झालेला सर्वात मोठा वर्ग लाखांचा पोशिंदा आणि दोन वेळेचा भुकेचा प्रश्न जो सोडवतोय तो संकटात आहे. आपल्याकडे १६ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. शेतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी, विहीरीसाठी कर्ज काढलं जातं परंतु पीक उध्वस्त होतं पण डोक्यावरचं कर्ज मात्र कमी होत नाही. त्यावर बँक नोटीस काढते जप्तीची आणि अपेक्षा करते सहकार्याची असेही शरद पवार म्हणाले.

मोठ्या उद्योगपतींनी कर्ज थकवलं तर बँका त्यांना सवलती देतात. काही दिवसापूर्वी धंद्यात उद्योगातून पैसे परत आले नाहीत तर सरकारने ८६ हजार कोटी बँकेत भरले. पण आम्ही ७१ हजार कोटींचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केलं. एकेकाळी धान्य आयात करणारा देश आज जगात तांदूळ निर्यात करणारा पहिल्या क्रमांकावर आहे. गहू निर्यातीत दुसऱ्या क्रमांकावर आहे अशी राज्याची सद्यस्थिती शरद पवार यांनी जनतेसमोर मांडली.

आज देशात लाखो तरुण बेकार आहेत. नाशिकमध्ये अनेक कारखाने असतानाही आर्थिक मंदीमुळे ५४ कारखाने बंद पडले आणि १६ हजार तरुण बेरोजगार झाले आहेत. आधीच बेकारी त्यात ज्यांच्या हाती काम आहे त्यांना बेकारीला सामोरे जाव लागतंय. यामुळे आज तरुणांची लग्न होत नाहीत. याबाबतीत काय करतय हे सरकार असा संतप्त सवालही शरद पवार यांनी

सरकारला केला. मुंबईत पाहिले असता १२० कापड गिरण्या होत्या त्यातील केवळ १० गिरण्या सुरु आहेत. मुंबईतील गिरणगाव गेलं. त्याठिकाणी आज मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्या आहेत पण त्याठिकाणी गिरणी कामगाराला जाण्याची परवानगी नाही. संपुर्ण गिरण गाव उध्वस्त झालं आहे असेही शरद पवार म्हणाले.

देशात मोठी मंदी आल्याचे सांगितलं जातंय. ही मंदी कायम राहिली तर देशाची अर्थव्यवस्था अडचणीत आल्याशिवाय राहणार नाही असे स्पष्ट संकेत शरद पवार यांनी आपल्या भाषणात दिले. इतके कारखाने आलेत पण किती आले ते सोडून किती कारखाने बंद झाले याचे आकडे मोदींनी द्यावे. पण हे आकडे द्यायची त्यांची ताकद नाही अशी जोरदार टीकाही शरद पवार यांनी केली. हाताला काम किती दिले, किती शेतकऱ्याला वाचवले, शेतकऱ्यांचा फायदा काय केला ते सांगा. समाजात एकजुट केला नाही. आजच्या राज्यकर्त्यांना टिका टिप्पणी केल्याशिवाय काहीच येत नाही. आज मोदी नाशिकमध्ये येत आहेत. पण विरोधी पक्षातील लोकांना नोटीस पाठवण्यात आल्या आहेत. घराबाहेर पडल्यास अटक करु. शासनाने आदेश काढले की, मोदी नाशिकमधून जाईपर्यंत कांदा बाजारात आणायचा नाही. यांना कांद्याचीही भीती वाटते. पण या पध्दतीने लोकशाही घालवण्याचे काम होत आहे असा आरोपही शरद पवार यांनी केला.

शिवछत्रपतींच्या नावे सत्तेत आलेले हे सरकार महाराजांविषयी काहीच करत नाहीत. डॉ. आंबेडकरांविषयी काहीच करत नाही. केवळ नावाचा वापर हे सरकार करत आहेत. छत्रपतींनी परकियांपासून राज्याचा बचाव होण्यासाठी किल्ले बांधले. हे किल्ले नव्या पिढीसाठी प्रेरणा देणारी केंद्र आहेत. पण या सरकारने गडकिल्ल्यांवर छमछम बघण्याची व्यवस्था केली आहे. महाराष्ट्राचा इतिहास बाजुला ठेवून एक चंगळवादाची



करण्याची पावले काय टाकली ते सांगा पण यावर काहीच बोलत नाहीत.मात्र आज राज्यात मतं मागण्याचे काम हे सरकार करत आहे असेही शरद पवार म्हणाले.

आपल्या पक्षातून जे लोक गेले ते म्हणतात आम्ही विकास करण्यासाठी पक्षांतर करतोय. मग १५ वर्ष सत्तेत असताना आणि मंत्रीपद असताना नेमकं काय केल? तुमच्या हाती सत्ता दिली तरी तुम्हाला दोन पावले टाकता आली नाही असा जोरदार टोला शरद पवार यांनी पक्षांतर करणाऱ्यांना लगावला. काँग्रेसने नांदेड शहराचा विकास घडवला पण या सरकारने एक इंचदेखील विकास संस्कृती राज्यात प्रस्थापित करण्याचे काम हे सरकार करत आहेत. अशांना थारा आपली जनता देणार नाही असा स्पष्ट इशाराही सरकारला दिला. नव्या पिढीचे नेतृत्व उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यात जाण्याचे काम मी करत आहे. चार वेळा तुम्ही मला मुख्यमंत्री केलं. अजून काहीच नको. आज नवीन पिढीला राज्याचा रथ ओढण्याची संधी देण्याचे काम आपल्या पक्षाच्यावतीने होईल यात शंका नाही असेही शेवटी शरद पवार म्हणाले.

# प्रत्येक योजनेत अपयश आलेल्या लोकांना पुन्हा सत्तेत आणू नका



## राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे आवाहन

बीड : कारखानदारी बंद... शेतकरी संकटात आलाय... बेरोजगारी वाढत आहे... तरी हे राज्यकर्ते मत मागण्यासाठी येत आहेत. यांनी राज्यात आणलेल्या प्रत्येक योजनेत अपयश आले अशा लोकांना पुन्हा सत्तेत आणण्याचे काम आम्ही करणार नाही असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी बीड येथील जाहीर सभेत दिला.

निवडणूकीच्या आधी राज्यातील जनतेला भेटण्यासाठी मी बाहेर पडलो आहे. आज नवी पिढी आणि शेतकरी वर्ग मला अस्वस्थ दिसतोय. ज्यांच्या हाती आपण सत्ता दिली त्यांनी शेतकऱ्यांची आणि तरुणांची दिशाभूल केली आहे असा आरोपही शरद पवार यांनी केला. राज्यात १६ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा आकडा समोर आलाय. शेतकऱ्यांनी कर्ज काढले पण त्यात सवलती मिळाल्या नाही. शेतकऱ्यांच्या अब्रूचा पंचनामा होत आहे. कुठे मुलीच्या लग्नात अडचण तर कुठे मुलांच्या अर्ध्या शिक्षणाची व्यथा सुरु आहे असेही शरद पवार म्हणाले.

संसदेत दर दोन वर्षांनी कर्जमाफीची आकडेवारी सादर केली जाते. यात व्यावसायिकांचे ८६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात आली मात्र यांना शेतकऱ्यांना कर्जमाफी देता येत नाही. मी मुख्यमंत्री असताना तब्बल ७१ हजार कोटीची शेतकरी कर्जमाफी जाहीर केली होती असेही शरद पवार यांनी सांगितले. आम्ही सत्तेत असताना शिक्षणावर जास्त भर दिला. आज पाहिले असता देशात तसेच राज्यात शिक्षित मोठ्याप्रमाणावर आहेत. मात्र नोकरीच मिळेनाशी झाली आहे. नोकरीचे प्रमाण कमी तर अर्जदाराचे प्रमाण वाढत आहे. नाशिकमध्ये सर्वाधिक कारखाने असताना याठिकाणी १६ हजार तरुण बेरोजगार झाले आहेत. तर मुंबईची स्थिती पाहता १२० गिरणी कारखाने असताना त्यातील ११४ कारखाने बंद पडले गेले त्याठिकाणी मोठमोठ्या इमारती उभारल्या गेल्या असेही शरद पवार म्हणाले. आपल्या पक्षातून निघून जाताना या विभागातील नेत्यांनी विकासासाठी पक्ष सोडल्याची कबुली दिली पण मग प्रश्न पडतो की, पक्षात असताना तुम्हाला १५ वर्ष आमदार मग राज्य मंत्री केलं मग त्यावेळी तुम्ही नेमकं केलं काय असा सवालही शरद पवार यांनी केला.

आम्ही पक्षाकडून नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचे काम केले आहे. हा महाराष्ट्र तरुण पिढीच्या हाती देऊन याची जबाबदारी धनंजय मुंडे घेतील यात शंका नाही असेही शरद पवार म्हणाले.

हा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरी विचाराने चालणारा महाराष्ट्र आहे. यात एका बाजूला संपत्तीचा डोंगर तर दुसऱ्या बाजुला तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांचा दर्यासागर आहे. या समुद्राच्या पाण्याने संपतीचा डोंगर उध्वस्त करण्याची ताकद तुमच्यात आहे असे कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवणारे विचारही शरद पवार यांनी व्यक्त केले. यावेळी शरद पवार यांनी तरुणांना विधानसभेत संधी देणार असल्याचे जाहीर केले होते त्याप्रमाणे आज बीड जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांतील परळी विधानसभा मतदारसंघातून धनंजय मुंडे, बीड मतदारसंघातून संदीप क्षीरसागर, गेवराईतून विजयसिंह पंडीत, माजलगावमधून प्रकाश सोळंकी या उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. आगामी विधानसभा निवडणुकीत युवावर्गाला प्राधान्य दिले जाणार असल्याचे पक्षातर्फे आधीच जाहीर करण्यात आले आहे. त्याची सुरूवात आज बीड येथून करण्यात आली आहे. आष्टी येथील उमेदवार लवकरच जाहीर करण्यात येईल असेही शरद पवार यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या घामाची किंमत न कळणाऱ्या सरकारला घरी पाठवण्यास सज्ज व्हा : शरद पवार



कोल्हापूर : शेतकऱ्यांच्या घामाची किंमत मिळणे हा शेतकऱ्यांचा हक्क आहे. मात्र तसं होत नाही. आज कांद्याची निर्यात थांबवली आहे. शेतकऱ्यांना पैसे मिळूच नये अशी भूमिका या सरकारची असून या सरकारला घरी पाठवण्याचे काम आपल्याला करायचं आहे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी कोल्हापूर येथील जाहीर सभेत केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार के. पी. पाटील यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत शरद पवार यांनी सरकार तोफ डागतानाच हे सरकार कसे सुडबुद्धीने वागत आहे याबाबतीत आपले विचार मांडले. स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे. खासदार स्वामी चिन्मयानंद यांनी एका कॉलेजच्या मुलीवर अत्याचार केले. भाजपचा खासदार अशी बाब करतो ही बेशर्मीची बाब आहे. त्या मुलीला न्याय तर मिळला नाही, उलट तिलाच अटक करण्यात आली. हे सरकार आपले नाही म्हणूनच आपल्याला परिवर्तन करायचं आहे असेही शरद पवार म्हणाले. कोल्हापूरमध्ये नदीकडच्या पिकांची परिस्थिती काही नीट दिसली नाही. महापुरात ऊसाच्या शेंड्यावर पाणी जाऊन नुकसान झालं. सरकारमधील लोकांनी संकटकाळात सर्व ताकद तिथे लावायला पाहिजे होती. मात्र तसं झालं नाही. अशी खंत शरद पवार यांनी व्यक्त केली शिवाय फक्त अर्धातास सांगलीत थांबलेल्या मुख्यमंत्र्यांनी फक्त हवाई पाहणी केली अशी जोरदार टीकाही केली.

## राज्य सर्वच क्षेत्रात मागे गेले असून राज्याचे नेतृत्व बदलण्याची भूमिका घ्या

जुन्नर : आज देशाची आणि राज्याची सूत्र आपण ज्यांच्या हाती दिली त्यांच्याकडून आपले राज्य अनेक क्षेत्रात मागे पडत आहेत त्यामुळे आता नेतृत्व बदलण्याची भूमिका आपण घ्यायला हवी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी जुन्नर येथील जाहीर सभेत केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कानाकोपऱ्यात जाण्याचा मला योग आलाय. मला आनंद होतोय की प्रचाराची सुरुवात शिवनेरीच्या पायथ्याशी होतेय. सामान्यांसाठी ज्याने राज्य स्थापन केले त्यांच्या जन्मभूमीत पहिली सभा होतेय असेही शरद पवार म्हणाले. या भागातील अनेक माणसांच्यासोबत काम करण्याचे भाग्य मला मिळाले आहे. त्यांचाच वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम अतुल बेनके करतील असा विश्वास आहेच शिवाय मला खात्री आहे की, सुविद्य इंजिनिअरकडून या विभागाचा चेहरा बदलण्याचे काम नक्कीच होईल असा विश्वासही शरद पवार यांनी अतुल बेनके यांचे कौतुक करताना व्यक्त केला.



शेतीच्या क्षेत्रात आपण अनेक कष्ट घेतो परंतु त्याला योग्य भाव देण्याची भूमिका राज्यकर्त्यांची दिसत नाही. देशात महागाई ही शेतकऱ्यांमुळे झाल्याचे राज्यकर्ते सांगतात. याचा परिणाम शेतकऱ्यांवर झालाय. आजवर १६ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा आरोपही शरद पवार यांनी केला. शेतीप्रमाणे उद्योगधंदा ही महत्त्वाचा आहे. आजचे राज्यकर्ते हे कारखानदारी कमी करायच्या मागे लागल्याचे दिसतंय. केवळ नाशिक जिल्ह्यात जवळपास १६ हजार तरुण बेरोजगार झाले आहेत. राज्यात बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. यातून गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे असेही शरद पवार म्हणाले. राज्याची दुय्यम राजधानी आणि मुख्यमंत्री साहेबांचे नागपूर शहर गुन्हेगारीचे केंद्र झाले आहे. मात्र याकडे मुख्यमंत्री लक्ष देत नाही. सत्तेचा गैरवापर आजचे सरकार करत आहे. यातून राज्याला पाच- पन्नास वर्षे मागे घेऊन जाण्याचे काम होत आहे असे स्पष्ट मत शरद पवार यांनी व्यक्त केले.

## .. मग हे सरकार कुणासाठी चालवता

इस्लामपूर-वाळवा : अधिक हातांना काम देण्यासाठी नवीन नवीन धोरणं आखली पाहिजेत परंतु हे सरकार धोरणही ठरवत नाही. शेतकरी, शिक्षित तरुणांना न्याय नाही मग हे सरकार कुणासाठी चालवता असा संतप्त सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारला केला. इस्लामपुर - वाळवा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या जाहीर सभेला शरद पवार उपस्थित होते. मी अनेक निवडणूका पाहिल्या आहेत परंतु ही निवडणूक महत्त्वाची असून महाराष्ट्रातील तरुण पिढी चमत्कार करून दाखवणार असल्याचा विश्वास शरद पवार यांनी यावेळी व्यक्त केला. या देशात - राज्यात कष्टकरी, घाम गाळणारा बळीराजा, शेतकरी यांच्या दु:खाकडे दुर्लक्ष करणारे हे सरकार आहे. यांना शेती उत्पादनाशी काहीही देणेघेणे नाही.

मोठया उद्योगपतींनी जी कर्ज थकवली आहेत त्यामुळे अनेक बँका अडचणीत आल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने ८६ हजार कोटी रुपये त्या बँकांमध्ये भरले आहेत. आज देशात आणि राज्यात त्यामुळे आत्महत्या वाढल्या आहेत. अशा लोकांच्या हातात पुन्हा सत्ता देणार का? असा सवाल शरद पवार यांनी जनतेला केला. देशाच्या समोरचे महत्वाचे प्रश्न कोण मांडायला तयार नाही. निव्वळ ३७० कलम, काश्मीरमध्ये काय काय केले, पुलवामा सांगतात. सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करुन भावनेला हात घालत आहेत असेही शरद पवार म्हणाले.

अतिरेकी कारवायांचा खात्मा करा. आमचा पाठिंबा आहे. जगात सुंदर काश्मीर आहे. गुलामनबी आझाद यांनी आज निवेदन दिल्याचे सांगतानाच काश्मीरमध्ये शांतता आहे ठिक आहे परंतु ती स्मशानशांतता आहे. दुकाने, व्यापार बंद आहेत. घरं कशी चालवायची ही चिंता तिथल्या लोकांना सतावत आहे. रस्त्यावर कोण फिरणार नाही हे बघणं म्हणजे आम्ही खुप काही कर्तृत्व केलं हे सांगणं योग्य नाही असा टोलाही लगावला. राजकारणात विरोधकांना नाउमेद करण्याचे काम होत आहे. मी शिखर बँकेचा डायरेक्टर किंवा सभासद नसतानाही ईडीच्या गुन्हेगारी यादीत माझं नाव आलं. अहो आमच्या बापजादयानेही कधी गुन्हेगारी केली नाही.शिखर बँकेत ७० जणांचा समावेश आहे. त्यात भाजप, सेना यांची लोकं आहेत. ईडीच्या नावाने काय कारवाई करायची ती करा त्याची चिंता आम्हाला नाही अशा खुप कारवाया पाहिल्या आहेत असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले.

यावेळी शरद पवार यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या कामाचे भरभरुन कौतुक करतानाच त्यांच्या पाठीशी खंबीर उभे रहा असे आवाहनही केले. दरम्यान ज्यांच्या हातात सत्ता आहे ती काढून घेवून माणुसकीने सत्ता कशी चालवायची हे दाखवून देवूया असे आवाहनही शरद पवार यांनी केले.

# अरबी समुद्रातील छत्रपतींच्या शिवस्मारकात १ हजार कोटींचा भ्रष्टाचार : नवाब मलिक



मुंबई -छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील अश्वारूढ स्मारकात मुख्यमंत्र्यांच्या खात्याकडून एक हजार कोटीचा भ्रष्टाचार झालेला आहे. याबाबत केंद्रीय दक्षता समितीकडे तक्रार करणार असून त्यांनी दखल घेतली नाही तर कोर्टाकडे दाद मागणार आहे असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि मुंबई अध्यक्ष नवाब मलिक यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली. हा सर्व भ्रष्टाचार मुख्यमंत्री यांच्या आशिर्वादाने झाल्याचा आरोप करतानाच त्यांच्यावर कारवाई होण्यासाठी पाऊले उचलण्यात येतील अशी माहिती नवाब मलिक यांनी दिली.

मागच्या आठवड्यात शिवस्मारकाबाबत सरकारने घोटाळा केल्याचा आरोप केला होता. त्याचा पार्ट - २ येतोय असं सांगितलं होते त्याची आज कागदपत्रे नवाब मलिक आणि काँग्रेसचे सरचिटणीस व प्रवक्ते सचिन सावंत यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत सादर केली. मागच्या आठवड्यात शिवस्मारकाबाबत भ्रष्टाचार उघड करतो असं सांगितल्यावरही मुख्यमंत्री आणि चंद्रकांत पाटील यांनी तो मुद्दा घेतला नाही किंवा सरकारच्या माध्यमातून उत्तरही दिलेले नाही. आम्ही जे मुद्दे उपस्थित केले त्यालाही उत्तर देत नाही.उलट पवारसाहेब यांच्यावर ईडीचा गुन्हा दाखल हा विषय पुढे सोडला आणि शिवस्मारक घोटाळा बाजुला गेला असेही नवाब मलिक म्हणाले.



एल अ‍ॅन्ड टी या कंपनीने भरलेल्या ३ हजार ८०० कोटी रूपयांच्या निविदेची रक्कम वाटाघाटीद्वारे २ हजार ५०० कोटीं रूपयांपर्यंत कमी करण्याला विभागीय लेखापरीक्षकांनी आक्षेप नोंदवत चौकशीची मागणी केली होती. यातील गंभीर बाब ही आहे की, या प्रकल्पाची निविदेतील किंमत २ हजार ६९२.५० कोटी होती. परंतु एल अ‍ॅन्ड टी कंपनीची निविदेतील बोली ही ३ हजार ८२६ कोटी म्हणजेच जवळपास ४२ टक्के अधिक होती. त्यामुळे ख-या अर्थाने या प्रकल्पाची फेरनिविदा होणे आवश्यक होते. आराखडा बदलून ही रक्कम अंदाजित रकमेच्या १ हजार कोटींपेक्षाही कमी झाली आहे. परंतु एल अ‍ॅन्ड टी ने आधीच फुगवलेली रक्कम आम्ही वाटाघाटीतून कमी केली आणि शासनाचा फायदा करून दिला असे सरकारकडून भासवले जात आहे. परंतु वस्तुतः यात १ हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम काढण्याचा सरकारचा हा डिझाईन करुन भ्रष्टाचार करण्याचा डाव होता असा आरोपही नवाब मलिक यांनी केला.

दोन लिगल ओपिनियनमध्ये शब्द ना शब्द एकच आहे.म्हणजे सुरुवातीपासून ठरवून एल अ‍ॅण्ड टी ला टेंडर द्यायचे ठरले होते असा थेट आरोप नवाब मलिक यांनी यावेळी केला.

स्मारक समितीचे अध्यक्ष विनायक मेटे यांनी भ्रष्टाचार झाल्याचे पत्र दिले आहे. शिवाय कॅगचे अधिकारी सांगत आहेत. मुख्यमंत्री यांच्या खात्यात भ्रष्टाचार झाला आहे. मात्र यामध्ये इतर पक्षांसह शिवसेनाही गप्प आहे असेही नवाब मलिक म्हणाले.

शिवस्मारक उभारण्याचा राज्य सरकारचा निर्णय हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेमासाठी नाही तर सुरुवातीपासूनच पैसे खाण्यासाठी होता हे स्पष्ट झाले असून शिवस्मारक प्रकल्पातील भ्रष्टाचाराची कार्यपद्धती अत्यंत किळसवाणी आहे. शिवस्मारकाच्या कामात १ हजार कोटींचा भ्रष्टाचार करण्याचे सरकारचे कारस्थान आहे. महाराष्ट्राच्या ५९ वर्षांच्या राजकीय परंपरेला कलंकीत करणारे हे कृत्य असून राज्यातील शिवप्रेमी जनता भाजप शिवसेना सरकारला कदापी माफ करणार नाही, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व प्रवक्ते सचिन सावंत यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली.

# राष्ट्रवादी युवकांचा मुंबई ईडी कार्यालयावर हल्लाबोल;युवकांवर पोलिसांचा लाठीचार्ज...








मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यावर ईडीने खोटा गुन्हा दाखल केल्यानंतर राज्यभर संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे त्याचेच पडसाद आज उमटले. युवक काँग्रेसच्यावतीने ईडीच्या मुंबई कार्यालयावर जोरदार हल्लाबोल करण्यात आला. राष्ट्रवादी युवक काँग्रेसने मुंबईतील ईडीच्या कार्यालयावर मोर्चा काढत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. अचानक करण्यात आलेल्या या आंदोलनाची माहिती नसलेल्या पोलिसांकडून युवकांना पांगविण्यासाठी लाठीचार्जही करण्यात आला. राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख आणि युवक कार्याध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. आंदोलन करणाऱ्या युवकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान शरद पवार यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्हयामुळे युवकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचेच पडसाद राज्यभर उमटल्याचे पाहायला मिळत आहे.

# असली-नकली... सच्चा-झूठा?




**आकाश, नवी दिल्ली**

देवआनंदची भूमिका असलेला 'असली - नकली' सिनेमा किंवा नंतरच्या काळात आलेला सुपरस्टार राजेश खन्नाचा 'सच्चा-झूठा' सिनेमा सर्वांनाच आठवत असतील. एवढेच नव्हे तर खरं काय आणि खोटं काय याबद्दलची अनेक हिंदी गाणीही लोकांना आठवत असतील. एका सिनेमात 'यहाँ कौन है असली, कौन हे नकली' असे गाणे होते. तर धर्मेंद्र यांनी 'इज्जत' सिनेमात गायलेले 'नकली चेहरा सामने आये, असली सूरत छुपी रहे' हे गाणे प्रचंड लोकप्रिय झाले होते. साहिर लुधियानवी या गाजलेल्या गीतकाराने ते लिहिलेले होते. हे सर्व आता आठवण्याचं कारण काय? राज्यकर्ते बोलतात एक आणि करतात वेगळेच ! विशेषतः जे राज्यकर्ते स्वतःला अतिशय निर्णायक मानतात अशा राज्यकर्त्यांच्या 'कथनी आणि करणी'मध्ये जेव्हा अंतर पडू लागते तेव्हा हा प्रश्न निर्माण होतो.

येईल लक्षात येईल !

देशाचे पंतप्रधान उर्फ 'फादर ऑफ इंडिया' नुकतेच अमेरिकेला गेले होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी त्यांना 'फादर ऑफ इंडिया' अशी उपाधी दिली. विशेष म्हणजे पंतप्रधानांनी देखील ती स्वीकारली. महात्मा गांधी यांना 'राष्ट्रपिता' म्हणून संबोधण्यात येते. एका देशाचे दोन 'वडिल' असू शकत नाहीत. पण सुमारबुध्दीच्या मंडळींचे भान चटकन हरपत असते. प्रसिध्दीच्या उन्मादात आपल्याकडून कोणता प्रमाद घडतो आहे याचे भान हे महाशय विसरले होते.

अर्थात हे थोडेसे विषयांतर झाले.

तर, या नव्या 'फादर ऑफ इंडिया'नी अमेरिकेतील उद्योगजगतापुढे भाषणे ठोकताना भारतात गुंतवणुकीचे निमंत्रण दिले आणि युवकांचा देश सुशिक्षित व कुशल मनुष्यबळाचा देश असल्याचे सांगतानाच 'इंग्रजी भाषा जाणणारे मनुष्यबळ' असल्याने अमेरिकन गुंतवणूकदारांना त्याचा लाभच होईल अशी बढाईही मारली. या 'नव्या फादर ऑफ इंडियां'चे म्हणणे खरेच आहे. कारण गेली अनेकवर्षे उत्तम इंग्रजी भाषक भारतीय मनुष्यबळाच्या जोरावर आपण चीनला आंतरराष्ट्रीय पातळीवर मात दिलेली आहे.


पण, काहीच दिवस आधी, 'फादर ऑफ इंडिया'चे 'भाई'.... गृहमंत्री व भाजप अध्यक्ष अमितभाई शहा यांनी




हिंदी भाषेची जोरदार वकिली केलेली होती. हिंदी ही देशाला जोडणारी भाषा आहे असे सांगून त्यांनी एकच खळबळ उडवली होती. त्यावर दक्षिणेतील अ-हिंदी भाषक राज्यांनी अतिशय तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली होती. एवढेच नव्हे तर कर्नाटकात भाजपचे सरकार असूनही आणि येद्युरप्पा यांच्यासारखे वरिष्ठ नेते मुख्यमंत्री असूनही त्यांनी स्वतःच एका निवेदनाद्वारे हिंदी भाषा लादण्याच्या प्रयत्नांना विरोध केला होता. भाजपची प्रतिमा दक्षिणेत 'हिंदी-हिंदू-हिंदुस्तान' अशी आहे. हिंदी भाषा दक्षिणेतील राज्यांवर लादणारा हा पक्ष आहे ही सार्वत्रिक समजूत गेली अनेक वर्षे प्रचलित आहे. त्या प्रतिमेला साजेसे वर्तन व आचरण त्यांनी सुरु करुन या दाक्षिणात्य राज्यांमध्ये विनाकारण असंतोष निर्माण केला. आता हा भाषिक वाद निर्माण करण्याचे कोणतेच कारण नव्हते. परंतु कोणत्या ना कोणत्या मुद्यावरुन समाजात वाद-संघर्ष निर्माण करायचे आणि दुसऱ्या बाजुला स्वतःची खुर्ची शाबूत ठेवायची ही यांची कामाची पध्दत झालेली आहे. हिंदी भाषेचा हा वाद विनाकारण उकरण्याची अवदसा भाजपला का आठवली आहे याचे उत्तर 'नवे पोलादी पुरुष'च देऊ शकतील.

आणखीन एक प्रकार ! हाही आंतरराष्ट्रीय पातळीवरचा !

ट्रंप महाशयांनी पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रानखान यांच्याशी बोलणी केल्यानंतर असे सांगितले की या भेटीपूर्वी ते भारताच्या पंतप्रधानांना जपानमध्ये भेटले असता त्यांनी म्हणे ट्रंप साहेबांना काश्मीरबाबत भारत-पाकिस्तानदरम्यान मध्यस्थी करण्यास सांगितले. काश्मीर हा केवळ भारत-पाकिस्तानदरम्यानचा द्विपक्षीय मुद्दा आहे आणि त्याच्या सोडवणुकीत तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीला संधी किंवा वाव नाही ही सर्वमान्य भूमिका असताना भारताच्या पंतप्रधानांनी असे कसे केले यावरुन गदारोळ झाला. भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी (पंतप्रधानांनी नव्हे) त्यावर संसदेत खुलासाही केला. पण भारताच्या पंतप्रधानांनी याबाबत मौन पाळले. शुध्द मराठीत 'मूग गिळून गप्प राहिले !' जर पंतप्रधानांनी ट्रंप महोदयांना अशी सूचना केली नव्हती तर त्यांनी तसा खुलासा का केला नाही ? विशेष म्हणजे ट्रंप महोदयांनी देखील हे विधान मागे घेतले नाही. एवढेच नव्हे तर काश्मीरच्या मुद्यावर आपण मध्यस्थीसाठी तयार असल्याचे वारंवार बोलून दाखवले आहे. पाणी कुठेतरी मुरतंय ! 'आग असल्याखेरीज धूर निघत नाही!'




यात खरे कोण? ट्रंप की भारताचे पंतप्रधान ? आता आले लक्षात? खरे कोण व खोटे कोण?

याच मालिकेत काश्मीरच्या मुद्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचाही समावेश होतो. पाकिस्तानला या मुद्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करायचे आहे यात शंकाच नाही आणि त्यांनी वेळोवेळी तसे असफल प्रयत्न केलेलेही आहेत. पण अमेरिकेचे अध्यक्ष वारंवार या प्रश्नाचा उल्लेख कशाला करतात? त्याचप्रमाणे भारताचे काही प्रतिनिधी देखील आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर जाऊन काश्मीर हा भारत-पाकिस्तानदरम्यानचा द्विपक्षीय मुद्दा आहे हे सांगत बसतात आणि अनावधानाने त्यास आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त होत राहते.

पंतप्रधानांनी नोटबंदी केली. खोट्या नोटा, दहशतवाद व काळा पैसा सर्व काही बंद होण्याचे स्वप्न त्यांनी दाखवले. प्रत्यक्षात त्यातले काहीच घडले नाही. शंभराहून अधिक सामान्य






नागरिक नोटा बदलण्यासाठीच्या रांगेत उभे राहून मृत्युमुखी पडले. 'मला पन्नास दिवस द्या, सर्व काही ठीक करतो' असे वक्तव्य करणाऱ्या महानायकाचे पन्नास दिवस आजतागायत पूर्ण झाले नाहीत. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या राज्यघटनेतल्या कलम 370 मधील तरतुदी रद्द करण्यात आल्या. जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेशात विभाजन करण्यात आले. आता लवकरच सर्वकाही ठीकठाक होईल असे दावे करण्यात आले. प्रत्यक्षात काय ? दोन महिन्यांनंतर देखील काश्मीरमध्ये संचारबंदी आहे आणि सर्व व्यवहार ठप्प आहेत.

370 कलमातील तरतुदी रद्द करण्याविषयीचे विधेयक मांडताना फारुख अब्दुल्ला या काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री व देशातील प्रमुख वरिष्ठ नेत्याच्या अनुपस्थितीबद्दल विचारणा करण्यात आली असता विधेयक मांडणाऱ्या केंद्रीय गृहमंत्र्यांनी अत्यंत उपहासाने उत्तर दिले होते, 'फारुखसाहेब त्यांच्या घरी








आहेत. मौजमस्तीत आहेत. त्यांना सरकारने अटक केलेली नाही किंवा स्थानबध्दतेतही ठेवलेले नाही. ते त्यांच्या मर्जीने घरी आहेत.' त्यावर झालेल्या आणखी बोलाचालीत त्यांनी काहीसे चिडून असेही म्हटले, 'कुणी संसदेत येत नसेल तर त्याच्या कानपटीला पिस्तुल लावून तर मी आणू शकत नाही ना ?'


प्रत्यक्षात असे उघडकीस आले की फारुख अब्दुल्ला यांना काश्मीरमधील पब्लिक सेफ्टी ॲक्ट – पीएसएखाली त्यांच्या घरीच स्थानबध्द करुन ठेवण्यात आले आहे.

आता सांगा, विश्वास कुणावर ठेवायचा ? या सरकारमध्ये हे अंतर्विरोध, विरोधाभास तर भरलेलेच आहेत. पण वरवर बोलायचे एक आणि करायचे दुसरेच, हा प्रकार सर्रास आहे. या सरकारच्या काळातच लोकांना मारण्याचा एक नवा प्रकार रूढ झाला. 'मॉब–लिचिंग'! म्हणजे उन्मादी झुंडीकडून एखाद्याची मारपिटीने हत्या ! या आतापर्यंत घडलेल्या अनेक प्रकारांमध्ये या उन्मादी झुंडी 'गोरक्षक' बिरुदावली लावत असल्याचे आढळून आले. तर ज्याला बेदम मारपीट करुन अमानुषपणे मारण्यात आले ते अल्पसंख्यक असल्याचे आढळून येते. या सर्व प्रकारात एक विशिष्ट अशी शैली, कार्यपध्दती असल्याचेही दिसून येते. या बहुतेक प्रकरणातील उन्मादी झुंडीतले लोक म्हणजेच 'गोरक्षक' हे सहीसलामत सुटलेलेही आहेत. या सर्व प्रकारांबाबत 'फादर ऑफ





भाजपचे खासदार चिन्मयानंद यांना बलात्कार प्रकरणी पोलिस अटक करुन जेलमध्ये नेताना.





इंडिया' यांनी केवळ वाचिक निषेध नोंदविण्यापलीकडे काहीही केलेले नाही. 'या घटनांनी मला संताप येतो, मी उद्विग्न होतो. याला जबाबदार असलेल्यांची गय केली जाणार नाही........!' वगैरे वगैरे अतिशय नाट्यमय भाषेत त्यांनी आपली मनोवेदना(?) प्रकट करुनही प्रत्यक्षात काय घडले?

अखलाक असो, पेहलूखान असो किंवा त्यांच्यासारखेच आणखी काही.......... त्यांना मारणारे आज उजळमाथ्याने व मुक्तपणे हिंडत आहेत. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी तर यासंदर्भात विक्रम केलेला आहे. बुलंदशहराजवळच्या खेड्यात एका शेतात मृत गायीचे अवशेष मिळाल्याच्या एका योजनाबध्द प्रकारात तथाकथित गोरक्षकांनी तेथील इन्स्पेक्टरचीच हत्या केली. त्या इन्स्पेक्टरचे कुटुंबिय न्यायासाठी दारोदार भटकत आहेत. पण त्या झुंडीचा नेता आता मुक्त झालेला आहे व उजळमाथ्याने वावरु लागला आहे.

ताजे उदाहरण! अटलबिहारी वाजपेयींच्या सरकारमध्ये केंद्रीय गृहराज्यमंत्री असलेले, चारवेळा खासदार असलेले स्वामी चिन्मयानंद यांच्यावर त्यांच्या संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या महाविद्यालयातील एका विद्यार्थिनीने वर्षभर बलात्कार केल्याचा आरोप लावला. ती बाब जवळपास सिध्दही झाली कारण या







स्वामी महोदयांनी चौकशीत त्यांच्याकडून महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे मान्य केल्याचे काही माध्यमात प्रसिध्दही झाले होते. प्रत्यक्षात काय घडले? हा स्वामी अचानक प्रकृती बिघडल्याचे कारण सांगून एका अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त रुग्णालयात दाखल झाला. त्याच्या छातीत दुखत होते म्हणे! मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही त्यांची म्हणे चौकशी केली. तर या स्वामीची प्रकृतीच्या कारणास्तव बडदास्त ठेवली जात आहे. दुसरीकडे ? संबंधित तरुण महिलेस पोलिसांनी ताब्यात घेतले आणि ती ब्लॅकमेल करुन खंडणी उकळण्याच्या प्रकारात सामील असल्याचा तिचा कबुलीजबाब उत्तर प्रदेशातील महान पोलिसांनी नोंदविला. ती अटकेत आहे. काय न्याय आहे?

असे सांगण्यात येते की उत्तर प्रदेश पोलिसांना अचानक सकाळी या विद्यार्थिनीच्या घरी जाऊन तिला अटक करुन थेट पोलिस ठाण्यात नेऊन तिच्या चौकशीला सुरुवात केली. पोलिस चौकशी कशी करतात हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. त्य मुलीस कोणीही मदतीला नसताना पोलिसांनी तिच्याकडून ती खंडणी उकळत असल्याचा कबुलीजबाब घेतला अशी बातमी मागाहून प्रसिध्द झाली. हा कबुलीजबाब कसा घेतला असेल याचीही कल्पना केलेली बरी.

'चोर सोडून संन्याशाला फाशी देणे' अशी मराठीत म्हण आहे. या प्रकरणात स्वतःला स्वामी, संन्यासी समजणारे चिन्मयानंद संन्यासी आहेत का कोण आहेत याचा विचार भाजप समर्थक व भक्तमंडळींनी करावा. या माणसाविरुध्द नैतिक गैरआचरणाचा हा पहिलाच प्रकार नव्हे. पूर्वी देखील त्यांच्याविरोधात महिलांसंबंधीच्या गैरआचरणाची प्रकरणे घडलेली आहेत. या प्रकरणाचा गौप्यस्फोट झाल्यानंतर या






स्वामी महोदयांच्या महिलांकडून मालिश करुन घेणे व अन्य काही प्रकारांच्या सीडीही उघडकीस आल्याचे समजते. पण एवढे सर्व होऊनही त्यांच्या विरुध्द तक्रार करणाऱ्या तरुणीलाच अटकेत टाकणे, ती खंडणी उकळत असल्याचे म्हणणे हे प्रकार सुरु करण्यात आले आहेत. या प्रकरणी काँग्रेस पक्षाने लखनौपर्यंत मोर्चा काढण्याचा प्रयत्न करताच पोलिसांनी त्यावर बंदी घातली.

वर्तमान राज्यकर्त्यांचे खरे काय आणि खोटे काय यासंदर्भात असंख्य उदाहरणे देता येतील. 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स' किंवा 'एनआरसी'चा विषय पाहू. भाजपने आसाममधून परकी नागरिकांची हकालपट्टी करण्यासाठी हा 'एनआरसी'चा पत्ता खेळला. त्यात त्यांना सुरुवातीला भरपूर यश मिळाले. आसाममध्ये प्रथमच ते सत्तेत आले. मग काय? सत्ता मिळाल्यानंतर काहीही करण्याचा परवानाच मिळाला असल्याची या पक्षाची व नेत्यांची भूमिका असते. यांनी आसाममध्ये आलेल्या परकी नागरिकांना शोधून काढण्यासाठी नोंदणीपुस्तकाची मोहिम सुरु केली. त्यासाठी विविध कागदपत्रांच्या अटी घालण्यात आल्या होत्या. हे सर्व करताकरता मुदतीअखेरीला सुमारे 19 लाख नागरिक या नोंदणीपुस्तकात स्वतःला नोंदवू शकले नाहीत. या सर्व मोहिमेचा उद्देश वेगळाच होता. भाजप व संघपरिवाराला असे वाटले की या मोहिमेत सापडल्या जाणाऱ्या परकी नागरिकांमध्ये मुस्लिम बहुसंख्य असतील. प्रत्यक्षात भलतेच घडले.

मुस्लिमांची संख्या नगण्य निघाली. हिंदू बहुसंख्य आढळून आले. मुळात फाळणीच्या वेळी पूर्व बंगालमधून हिंदूच अधिक संख्येने भारतात आले होते याचे भान भाजप-संघनेतृत्वाला राहिले नसावे. त्यांना वाटले हे निमित्त करुन पुन्हा एकदा ते किती हिंदूनिष्ठ आहेत व बाहेरुन आलेल्या मुस्लिमांना हाकलून त्यांनी कशी देशसेवा केली आहे हे दाखविण्याची व त्याआधारे धार्मिक ध्रुवीकरण करुन बहुसंख्याकांची मते पदरात पाडून घेण्याची योजना सिध्दीस नेता येईल. तो सगळा डावच अंगाशी आला. आता यांनी नवीन टूम काढली की बाहेरुन आलेल्या हिंदूंना आपोआप भारतीय नागरिकत्व दिले जाईल. यावर आसाम गण परिषदेने हरकत घेतली व त्यांनी परकी नागरिकांच्या विरोधात केलेले आंदोलन धर्मावर आधारित नव्हते आणि हिंदू परकी नागरिकांच्या विरोधातही होते. यामुळे भाजपची भरपूर अडचण झाली आहे. या पेचातून बाहेर पडण्याची धडपड हा पक्ष करु लागला आहे. आसामचे आंदोलन हे मुख्यतः बंगाली वर्चस्ववादाविरोधात होते ही बाब भाजप-संघपरिवार विसरला होता व इतिहासाच्या आकलनाच्या दिवाळखोरीतून ते अडचणीत आले आहेत.

पण यावरुनही धडा न शिकता भाजपच्या विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी तेही त्यांच्यात्यांच्या राज्यात 'एनआरसी' लागू करुन बाहेरुन आलेल्यांची हकालपट्टी करतील असे जाहीर करण्यास सुरुवात केली. पण घडले भलतेच. पश्चिम बंगालमध्ये केंद्रीय गृहमंत्र्यांनी याची घोषणा केल्यावर तेथील गरीब नागरिक जन्मदाखल्यासाठी भल्यामोठ्या रांगा लावू लागले. त्यात अनेकजणांचा रांगेत उभे राहून मृत्युही झाला. (नोटबंदीच्या वेळेप्रमाणे). पण त्यामुळे लोक असे चिडले की त्यांनी पश्चिम




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!




बंगालमध्ये गावोगावी भाजपनेत्यांना घेराव सुरु करुन पन्हा गावात दिसलात तर याद राखा असा दम देण्यास सुरुवात केल्यावर ही मंडळी काहीशी ताळ्यावर आली.

दरम्यान, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अशी काही चाल खेळली की भाजपच्या नेत्यांना दिवसा तारे दिसू लागले. केजरीवाल यांनी दिल्लीसाठीही 'एनआरसी' लागू करुन दिल्लीबाहेरुन आलेल्यांना बाहेर काढण्याची घोषणा केली. त्याबरोबर भाजपच्या नेतृत्वाला अक्षरशः फेफरे आले. दिल्ली भाजपचे अध्यक्ष मनोज तिवारी हेच बाहेरचे म्हणजे पूर्वांचल म्हणजेच पूर्व उत्तर प्रदेशातले आहेत. त्यांच्याकडे दिल्लीचा जन्मदाखला नाही. खरोखर ही योजना दिल्लीत लागू झाल्यास भाजपच्या पूर्वांचली, बिहारी मतदारांना मताधिकारास मुकावे लागू शकते. मग भाजपला सत्तेत येण्याचे स्वप्नच पहावे लागेल. थोडक्यात दुसऱ्यासाठी खड्डा खणायला गेल्यावर स्वतःच त्यात पडण्याचा अनुभव आता भाजप घेत आहे.

यांच्या खरे-खोटेपणाचे किस्से न संपणारे आहेत. कांद्याचाच मुद्दा घ्या. 2010 मध्ये कांद्याचे भाव कडाडल्यानंतर त्यावेळच्या भाजप प्रवक्त्या व सध्याच्या सामर्थ्यशाली केंद्रीय मंत्री स्मृति इराणी यांनी तेव्हा ट्वीट करताना मनमोहनसिंग सरकारचा उपहास करताना म्हटले होते, 'सावधान, कांदे खरेदी करु नका, प्राप्तीकर विभागाचे लोक नजर ठेवून आहेत.'

आज त्यांच्या बोटांमध्ये ट्वीट करण्याची ताकद राहिलेली नसावी. रुपयाच्या डॉलरच्या संदर्भातील घसरणीवर बोलताना मनमोहनसिंग सरकारने 'चुल्लूभर' पाण्यात बुडून मरावे, मनमोहनसिंग यांच्या वयानुसार डॉलरची किंमत वाढत आहे अशी जहरी चेष्टा वर्तमान पंतप्रधानांसह भाजपनेते करीत होते. आज रुपयाची काय गत आहे ? आता यांची वाचा बंद आहे !

हे किस्से न संपणारे आहेत. दुसऱ्यांची निंदा करुन आपण कसे महान आहोत हे सतत बढाया मारुन सांगणे एवढेच या नेत्यांना जमते. निवडणूक जवळ आली की यांना देशभक्ति, राष्ट्रवाद, दहशतवाद, राष्ट्रीय सुरक्षा, हिंदू-मुस्लिम असे सर्व मुद्दे आठवतात. मतदारांना देशभक्तीच्या नावाखाली बेकारी, महागाई या त्यांना दैनंदिन भेडसावणाऱ्या समस्या विसरायला लावण्याचा धंदा हे नेतृत्व करीत राहते. पण ही सर्व स्वतःची सत्ता टिकविण्यासाठीची धडपड आहे. बालाकोटवर हल्ला केल्याची भरपूर फुशारकी मिरवून झाली. पुढे काय झाले ? आज पुन्हा बालाकोट तळ जैश ए मुहम्मदच्या दहशतवाद्यांमुळे सक्रिय झाल्याचेही हे सरकार कोणतीही लाज न बाळगता सांगते आणि वर लोकांना भीती दाखविण्याचा प्रयत्न करत आहे. आता यांचे खरे रूप उघडकीस आणण्याची वेळ आली आहे. 'असली' आणि 'नकली', 'सच्चा' व 'झूठा' यांचा पर्दाफाश करण्याची वेळ आली आहे. जनता ते काम करील!




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by MAGARPATTA CITY ©

The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com

info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

## घंटाकर्ण, नवी दिल्ली

## पव्हाटा

# महाराष्ट्राच्या विरोधातला कुटिल डाव

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरुध्द 'ईडी' (एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट)ने गुन्हा दाखल केला, मनी लाँडरिंगची केस दाखल केली या बातमीने महाराष्ट्रात एकच खळबळ उडणे स्वाभाविक होते. यातील वस्तुस्थिती काय, माहितीची वस्तुनिष्ठता काय याचे बारकाईने अध्ययन न करता, त्याचे निश्चित संदर्भ काय हे ध्यानात न घेता माध्यमांनी सुरुवातीला 'पवारांवर गुन्हा दाखल' अशा बातम्या चालवल्या होत्या. प्रत्यक्षात तसे काही नव्हते.

मुंबई पोलिसांच्या आर्थिक अपराध विभागाने ऑगस्ट-2019मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्ष, संचालकांच्या विरोधात एफआयआर दाखल केलेला होता. ती केस किंवा ते प्रकरण 'ईडी'ने स्वतःकडे घेतले म्हणजे स्वतःकडे हस्तांतरित करुन घेतले.

मुंबई पोलिसांच्या एफआयआरमध्ये शरद पवार यांचे नाव नव्हते. केवळ त्या एफआयआरच्या पुष्ट्यर्थ जी कागदपत्रे होती त्यामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख होता.

आरोपीच्या कॉलममध्ये त्यांचा समावेश नव्हता.

'ईडी' जेव्हा एखादे प्रकरण स्वतःच्या ताब्यात घेते तेव्हा एफआयआर प्रमाणेच ते 'इसीआयआर' (एन्फोर्समेंट केस इन्फर्मेशन रिपोर्ट) दाखल करतात किंवा नोंदवतात. एफआयआरच्या समकक्ष असा तो असतो पण तो मुख्यतः पोलिसांच्या एफआयआरवरच आधारलेला असतो.

ईडीने देखील शरद पवार यांच्या नावाचा आरोपीच्या कॉलममध्ये त्यांच्या नावाचा समावेश केलेला नाही.

मग प्रश्न निर्माण होतो हे नाव आले कसे आणि वृत्तवाहिन्यांच्या बातम्यांमध्ये पवारांच्या विरोधात गुन्हा दाखल






**सरकारच्या पायाखालची वाळू सरकली म्हणून शरद पवारांना 'ईडी'ची भीती दाखविताहेत.**

अशा बातम्या आल्या कशा?

कानोकानी आलेल्या माहितीनुसार, शरद पवारांचे नाव ठळकपणे बातम्यांमध्ये येईल यासाठी काही सरकारी चलाख्या करण्यात आल्या.

या बातमीच्या संदर्भात एक लहानशी दोन पानी नोट(टिपण) पत्रकारांना वितरित केले गेले होते. हे सर्व अनधिकृत किंवा अनौपचारिक राखण्यात आले होते. केवळ पत्रकारांना बातमीसाठी संदर्भ म्हणून हे टिपण दिले गेले होते.

यात चलाखीने असे म्हटलेले होते की ईडीने दाखल केलेल्या इसीआयआर मध्ये बँकेचे संचालक, अध्यक्ष, अन्य विविध पदाधिकारी 'यांच्याबरोबरच शरद पवार यांचाही समावेश आहे'.

या चलाखीने पत्रकारांचे समाधान झाले नाही.

पत्रकारांनी संबंधित अधिकाऱ्यांना 'शरद पवार यांच्या विरुध्द गुन्हा नोंदविला आहे काय' अशी स्पष्ट विचारणा केल्यावर त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळू लागली.

तुम्हाला जी माहिती दिली आहे त्यावरुन तुम्ही बातमी देऊ शकत नाही काय वगैरे वगैरे आरडाओरडा करुन अधिकारी नाराजी व्यक्त करु लागले.

एका मुद्याच्या स्पष्टीकरणावर अधिकाऱ्यांना एवढे चिडण्याचे कारण काय याचे पत्रकारांना आश्चर्य वाटायला लागले. पण पत्रकारांनी चिकाटी न सोडता या मुद्याचा पिच्छा पुरवल्यानंतर त्यांनी आरोपीच्या कॉलममध्ये शरद पवारांच्या नावाचा उल्लेख नाही असे स्पष्ट केले.

आता पत्रकारांना उलगडा होऊ लागला की शरद पवार यांचे नाव यामध्ये गोवण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळेच त्यांच्याबद्दलची माहिती अस्पष्ट ठेवण्यात आलेली होती.

पत्रकारांच्या अतिचौकसपणावरुन अधिकाऱ्यांनी म्हणे खूप चिडचिड केली. 'अरे आप नाम(शरद पवार) तो चलाइये ना?' असे सांगून त्यांनी वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न केला.

या सगळ्याचा अर्थ काय?


विधानसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर ही राळ उठवायची आणि त्याचा प्रचारात वापर करायचा.

पण दुर्दैवाने सत्ताधीशांचे मनसुबे पार उद्‌ध्वस्त झाले.

सगळे फासे उलटे पडले.

या मागे कुणाचा हात असावा???






## पास पास भी, दूर दूर भी??

देशाचे पंतप्रधान, ब्रह्मांडनायक, जगद्गुरु आणि आता नव्याने झालेले 'फादर ऑफ इंडिया'!

हे कोण माहिती नाही?

देशात रहायचे आहे ना?

हो, खरंच! हे आम्ही नाही एक केंद्रीय मंत्रीच बोलून चुकला आहे.

'ज्या लोकांना पंतप्रधानांना फादर ऑफ इंडिया पदवी दिलेली पसंत नाही त्यांनी देश सोडून चालते व्हावे असे फर्मान या मंत्र्याने काढले आहे. चकित झालात ना? पण हे खरे आहे!

एका बाजुला फादर ऑफ इंडिया!

दुसऱ्या बाजुला देशाचे 'नवे पोलादी पुरुष'! त्यांनी गृहमंत्री झाल्याझाल्या जम्मू-काश्मीरचे तुकडे करुन टाकले.

सरदार वल्लभभाई पटेलांनी देश जोडला. या नव्या पोलादी पुरुषाने देश तोडला.

आता आणखीनच चर्चा सुरु झाल्या आहेत.

जगद्गुरु 'फादर ऑफ इंडिया' हे निवृत्त(?) झाल्यानंतर म्हणे पोलादी पुरुषच त्यांची जागा घेणार आहेत.

भाजपमधील काही नेत्यांनी म्हणे त्यांच्याकडे तशी 'फील्डिंग' देखील लावायला सुरु केली आहे.

दोन्ही नेत्यांमधील संबंधांबाबत चर्चाही सुरु झाल्या आहेत.

'फादर ऑफ इंडिया' अमेरिकेहून परतल्यानंतर त्यांच्यासाठी एक प्रसिध्दीसोहळा विमानतळावरच साजरा करण्यात आला होता.

विशेष म्हणजे 'फादर ऑफ इंडिया'बरोबर छायेसारखे राहणारे 'पोलादी पुरुष' या समारंभाला हजर नव्हते ही बाब अनेकांना खटकली.

या दोन्ही नेत्यांचे बारकाईने अध्ययन करणाऱ्यांनी त्यांच्या काही स्वभाव वैशिष्ट्यांची नोंद केलेली आढळते.

'फादर ऑफ इंडिया' हे तसे मोकळेपणाने बोलणारे आहेत. त्यांना स्वप्रसिध्दीची भरपूर लालसा आहे. ती ते विविध मार्गांनी पूर्ण करुन घेत असतात. त्याचबरोबर त्यांच्या कौटुंबिक गोष्टी किंवा काही वैयक्तिक बाबींबद्दल उघड बोलण्याबाबत ते तयारही असतात. त्यामुळेच त्यांच्या मातुःश्री किंवा अन्य कौटुंबिक माहितीला प्रसिध्दी मिळूनही ते त्याकडे फारसे लक्ष



देताना आढळत नाहीत.

'पोलादी पुरुष' मात्र वैयक्तिक व कौटुंबिक गोष्टींबाबत अतिशय काटेकोर आणि गुप्तता बाळगणारे आढळतात.

अलीकडेच एका पत्रकाराने मुलाखत घेताना त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी, कुटुंब यांच्याबद्दल प्रश्न विचारण्याचा

प्रयत्न करताच 'पोलादी पुरुष' यांनी ती माहिती देण्याचे साफ नाकारले. त्यांना सिनेमा पाहणे आवडते का हे देखील त्यांनी

सांगितले नाही. 'मी सार्वजनिक जीवनात आहे आणि त्यासाठी लागणारी सार्वजनिक माहिती पुरेशी आहे' असे सांगून

त्यांनी स्वत:बद्दल काहीही बोलण्यास नकार दिला.

तर थोडक्यात काय?

नंबर 1 व नंबर 2 मध्ये असलेला हा स्वाभाविक फरक आहे!

## पंतप्रधान की परराष्ट्रमंत्री? खरे कोण???

सर्वसाधारणपणे भारताचे पंतप्रधान दुसऱ्या देशात जातात तेव्हा तेथील अंतर्गत राजकारणावर ते टिप्पणी करीत नसतात.

हा शिष्टाचार अत्यंत कटाक्षाने पाळला जात असतो.

याचे कारण असे असते की परराष्ट्र संबंधांमध्ये भारताचा संबंध संबंधित देशाशी असतो. तेथील लोकनियुक्त सरकारशी असतो. जे सरकार तेथील जनतेचे प्रतिनिधित्व करीत असते त्या सरकारला आपण ओळखतो. अर्थात राजशिष्टाचारात संबंधित देशातील विरोधी पक्षनेत्यांशी भेट घेण्याचा प्रघातही पाळला जातो. कारण भविष्यात संबंधित पक्षाचे सरकारही त्या देशात येऊ शकते. अर्थात ज्या देशात लोकशाही नसते तेथे विरोधी पक्षनेतेही नसतात व त्यांना भेटण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे सत्तेत असलेल्या सरकारशी फक्त सरकारी संबंध ठेवण्याची ही प्रथा व शिष्टाचार असतो.

परंतु सध्या भारतातील राज्यकर्ते –सत्ताधीश हे एक वेगळ्याच रसायनाचे असल्याने काही विचित्र व शिष्टाचाराशी विसंगत पायंडे पाडण्यात येत असल्याचे आढळून येते.

जगद्गुरु ब्रह्मांड नायक अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. तेथे त्यांचे मुख्य काम संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेला संबोधीत करण्याचे होते. त्यानिमित्ताने त्यांनी त्यांच्या प्रतिमा निर्मितीचे, वलयनिर्मितीचे कार्यक्रमही उरकून घेतले.

याच दौऱ्यात त्यांना अमेरिकेच्या अध्यक्षांनी 'फादर ऑफ इंडिया' म्हणजेच 'भारताचे पिता – वडिल' अशी पदवीही प्रदान केली. कोणतीही लज्जा न बाळगता त्यांनी ती स्वीकारली.

महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता म्हटले जाते. ट्रंप यांनी कोणत्या अर्थाने आणि जाणीवपूर्वक 'फादर ऑफ इंडिया'






म्हटले काय हे स्वतः ट्रंपच सांगू शकतील. परंतु हे नामाभिधान स्वीकारणाऱ्याला तरी थोडी शरम व नम्रता असायला हवी की ते महात्मा गांधी यांच्या पंक्तीत बसू न शकणारे आहेत.

पण नाही!

बहुधा या पदवी मिळाल्याने अति-उत्तेजित पंतप्रधानांनी ट्रंप यांच्या निवडणुकीचा जवळपास प्रचारच करुन टाकला.

'हाऊडी मोदी' कार्यक्रमात त्यांनी 'अगली बार ट्रंप सरकार' अशी घोषणाच करुन टाकली.

एकप्रकारे ट्रंप यांच्या आगामी निवडणुकीचा हा प्रचारच ठरला.

या शिष्टाचार-भंगावर टीका होणे स्वाभाविकच होते.

अखेर परराष्ट्रमंत्री जयशंकर मदतीला धावले.

त्यांनी पंतप्रधानांना सर्टिफिकेट देऊन टाकले की, पंतप्रधान असे काही(अगली बार ट्रंप सरकार) बोललेच नाहीत.

अरे व्वा? ज्यांनी टीव्हीवर साक्षात ब्रह्मांडनायकांना ती घोषणा देताना कानाने ऐकले व डोळ्याने पाहिले. त्यावर परराष्ट्रमंत्री पंतप्रधान असे काही बोललेच नाहीत म्हणतात? कळस आहे की नाही?

वर मखलाशी ही की, ट्रंप यांनी मागे हे शब्द उच्चारले होते त्याचा फक्त पुनरुच्चार पंतप्रधानांनी केला.

आता यात खरे कोण आणि खोटे कोण? पंतप्रधान की परराष्ट्रमंत्री?

बहुधा ट्रंपच याचे उत्तर देतील!

## संसदेलाच मोडीत काढणार?

काँग्रेसच्या काळात सर्वच गोष्टी अत्यंत वाईट झाल्याची निंदानालस्ती करण्याची 'राष्ट्रीय मोहिम' सध्या सर्रासपणे सुरु आहे. या मोहिमेचे नेतृत्व 'जगद्गुरु ब्रह्मांडनायक' उर्फ 'भारताचे वडिल' (त्यांना ही उपाधि अलीकडेच बहाल झाली आहे) आणि त्यांचे 'सहनायक' करीत आहेत. आता या दोन व्यक्ती कोण हे विचारु नका! नावे तुमच्या सर्वांच्या ओठावर व मनातही आहेत!

पहिले पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू आणि काँग्रेस पक्षाने देशाचे कसे नुकसान केले आणि गेल्या पाच वर्षात भारताचे नंदनवनात - स्वर्गात कसे रुपांतर झाले याच्या कथा-कहाण्या ऐकवल्या जात आहेत.

एवढेच नव्हे तर गेल्या अनेक वर्षात विकसित झालेल्या लोकशाहीशी निगडित संस्थांची देखील मोडतोड सुरु करण्यात आली आहे.

तुम्हाला आठवत असेल की ब्रह्मांडनायकांनी....... माफ करा विसरलोच...... 'भारताच्या नव्या वडिलांनी' देशाचे नेतृत्व स्वीकारल्याबरोबर योजना आयोग बरखास्त करुन टाकला.



आता या योजना आयोगाची मूळ कल्पना नेताजी सुभाषचंद्र बोस यांची होती. त्यांच्या प्रेरणेतूनच जवाहरलाल नेहरू यांनी योजना आयोगाची स्थापना केली होती.

'भारताचे नवे वडिल' तर तोंड फाटेपर्यंत नेताजींच्या नावाचा जयघोष करीत असतात.

पण इतिहासच काय एकंदरीतच सुमार ज्ञानी असलेल्यांना या गोष्टी माहिती असणे अशक्यच आहे.

इतरही अनेक संस्थांची अशाच प्रकारे मोडतोड झाल्यानंतर आता जोडगोळीचे लक्ष संसदेच्या ऐतिहासिक वास्तूवर पडले आहे.

2022 मध्ये भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीस 75 वर्षे पूर्ण होतील. त्यानिमित्त देशाला संसदेची नवी वास्तू देण्याचा संकल्प 'प्रधानमंत्री साहेब' व त्यांच्या साथीदारांनी सोडला आहे.

एवढेच नव्हे तर संसदेच्या परिसरात असलेली विविध मंत्रालयांची भवने पाडून त्यांची फेररचना करण्याचेही त्यांनी जाहीर केले आहे.

मोडतोड, पाडापाडी, उद्‌ध्वस्त करणे या सर्व गोष्टीसाठी आसुसलेली ही राजवट आहे. संसदेच्या नव्या वास्तूची आवश्यकता नाही. सध्या जगभरात एवढे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असताना सध्याच्या इमारतीची उत्कृष्ट प्रकारे डागडुजी करुन ती अद्ययावत करणे सहजशक्य आहे.

पण, नाही!

स्वातंत्र्यलढा, भारताचे सत्तांतर, घटनापरिषद, स्वातंत्र्याच्या मध्यरात्री पं.जवाहरलाल नेहरू यांनी देशाला उद्देशुन केलेले भाषण (नियतीशी करार) या सर्व प्रसंगांची साक्षीदार असलेली ही वास्तू आहे.

या संसदेच्या सेंट्रल हॉलमधूनच नेहरूंनी देशवासीयांना



मध्यरात्रीच्या स्वातंत्र्यसूर्याचे महत्व सांगताना आपण सर्वांनी आता नियतीशी करार केला असल्याचे सांगितले होते.

याच सेंट्रल हॉलमध्ये घटनापरिषदेच्या बैठका होऊन राज्यघटनेची निर्मिती झाली होती.

क्रांतिकारक भगतसिंग यांनी ब्रिटिशांच्या काळात येथेच बॉंब फेकला होता.

कितीतरी ऐतिहासिक संदर्भ या वास्तूला चिकटलेले आहेत.

सध्याचे राज्यकर्ते भगतसिंग यांची तर फार वाहवा करीत असतात. मग भगतसिंग यांच्या साहसी कृतीची साक्षीदार असलेल्या या वास्तूची मोडतोड करण्याचा विचारही या राज्यकर्त्यांच्या मनात कसा येतो हे आश्चर्यकारक आहे.

परंतु या कोणत्याच गोष्टींशी संबंध नसलेले राज्यकर्ते सत्तेत असताना त्यांना या ऐतिहासिक ठेव्याची किंमत असणे शक्यच नाही.

ब्रिटनच्या संसदेची इमारत सातशे वर्षांहून अधिक जुनी आहे. तेथे संसद सदस्यांना बसण्यासाठी पुरेशी आसनव्यवस्थाही नाही.

काहीवेळेस अनेक सदस्य मागे उभे राहिलेले असतात.

एवढे होऊनही ब्रिटनने लोकशाहीचा हा समृध्द वारसा प्राणपणाने जपला आहे, जतन केला आहे, टिकवला आहे.

सांगायचा मुद्दा हा की स्वातंत्र्यलढ्याचा हा वारसा नष्ट करण्यासाठी राज्यकर्त्यांनी कंबर कसलेली आहे.

याला करंटेपणा म्हणतात.

आणखी कायकाय मोडतोड करतात ते पहात राहू या!

## भोजन-सुटीखेरीज काम?

सरकारी बँका आणि अर्थमंत्रालयातील वित्तीय सेवा विभाग यांच्यात अलीकडेच झालेल्या चर्चेनंतर राजधानी दिल्लीतल्या सर्व सरकारी बँकांच्या कामकाजाच्या वेळा सकाळी 10 ते दुपारी 4 अशा ठेवण्याचे ठरविण्यात आले.

हा निर्णय 1 ऑक्टोबरपासून लागू करण्याचे सांगण्यात आले. ग्राहकांना त्याची माहिती मिळावी यासाठी वृत्तपत्रातून जाहिरातीही देण्यात आल्या. या जाहिराती सर्वत्र झळकल्यानंतर बँक कर्मचाऱ्यांच्या संघटना मात्र नाराज झाल्या. त्यांनी कामकाजाच्या तासांबद्दल परस्पर निर्णय करण्याबद्दल नाराजी व्यक्त केलीच पण त्या वेळा आणि त्या जाहिरातींबद्दलही नापसंती दिली. त्यांच्या हरकतीचा मुद्दा साधा होता.



10 ते 4 या कामकाज वेळेत कर्मचाऱ्यांच्या भोजनाच्या सुटीचा उल्लेखही करण्यात आला नव्हता.

कर्मचारी संघटनांनी किमान अर्धा तास तरी भोजनासाठी सुटी मिळाली पाहिजे असा आग्रह धरला आहे.

संघटनांच्या म्हणण्यानुसार कर्मचाऱ्यांनी आळीपाळीने भोजनासाठी सुटी घेतली तरी ग्राहकांना संबंधित कर्मचारी उपलब्ध न झालेले खपत नाही आणि तक्रारी वाढत जातात.

त्यामुळे सर्व कर्मचारीवर्गासाठी भोजनाची एक वेळ निश्चित करावी आणि तसा उल्लेख असलेल्या जाहिराती पुन्हा दिल्या जाव्यात अशी मागणी संघटनांनी केली आहे.

आता सरकार किंवा सरकारी बँका काय करतील?

भोजनाची सुटी जाहीर करतील?

पोटपूजा न झाल्यास कर्मचारी काम कसे करतील?



## पानी रे पानी तेरा टेस्ट कैसा??

हल्ली पाणी हा विलक्षण वादाचा विषय होताना आढळतो.

तो मतभेदाचा मुद्दाही होताना आढळतो.

मतभेद आणि तेही दोन केंद्रीय मंत्र्यांमध्ये झाले तर तो बातमीचा विषय ठरतो.


राजधानी दिल्लीतील नळाला येणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता किंवा दर्जा हा फारसा चांगला नाही असा एक सर्वसाधारण मतप्रवाह आहे.

दिल्लीत अनेक घरांमध्ये नळाचे पाणी पिण्यासाठी वापरले जात नाही तर लोकांनी चक्क बाटलीबंद पाणी वापरणे पसंत केलेले आढळते.

जलशक्ति मंत्रालयाच्या माहितीनुसार दिल्लीतील सत्तर टक्क्यांहून अधिक पाणी हे 'रिसायकल्ड' म्हणजेच प्रक्रियायुक्त शुध्दीकरणाचे आहे आणि ते पिण्यायोग्य आहे.

अन्न व नागरी पुरवठामंत्री रामविलास पास्वान यांनी एका कार्यक्रमात बोलताना दिल्लीतील पिण्याच्या पाण्याचा दर्जा अत्यंत खालावलेला असून ते पाणी पिण्यायोग्य नसल्याचे म्हटले. त्यांच्या या निवेदनामुळे जलशक्ति मंत्री गजेंद्रसिंग शेखावत बहुधा





नाराज झाले असावेत. त्यांनी तत्काळ पास्वान यांचे मत खोडून काढले आणि दिल्लीचे पाणी पिण्यायोग्य तर आहेच पण युरोपातील कोणत्याही देशाप्रमाणेच त्याचा दर्जा उच्च आहे असे प्रमाणपत्रही दिले.

गजेंद्रसिंग शेखावत यांनी दिल्लीतल्या पाण्याचे गुणगान गायल्यानंतर पास्वान यांना माघार घेणे क्रमप्राप्तच होते. त्यांनी मुकाट्याने दिल्लीच्या पाण्याचा दर्जा सुधारल्याचे मान्य करुन वाद मिटवला.

# संघ समर्थकांची गरज संपली?

भाजपमधील संघ-समर्थित मंडळींची सध्या काहीतरी अडचण झालेली दिसते. भाजपचे वर्तमान नेतृत्व (दोनच नेते) आणि पक्षाची पालकसंस्था रा.स्व.संघ यांच्यातील संबंध 'मधुर' राहिले नसावेत असे दिसून येते.

संघ व नागपूरचे प्रतिनिधित्व करणारे परिवहनमंत्री नितिन गडकरी यांचेच उदाहरण घेऊ.

त्यांनी मोठ्या उत्साहाने सर्व पक्षांशी चर्चा करुन व त्यांचे मन वळवून मोटार-वाहनविषयक नवा कायदा लागू केला.

या कायद्यात लोकांनी रहदारीचे नियम पाळावेत आणि जीवघेणे अपघात टाळावेत यासाठी वाहतूक नियमभंगाबद्दल अतिशय अवाढव्य दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.

पण काय दुर्दैव?

हा कायदा प्रथम ढिला व शिथिल करण्यात भाजपचे सरकार असलेल्या व पंतप्रधान, गृहमंत्र्यांचे राज्य असलेल्या गुजरातने पुढाकार घेतला. त्यानंतर इतर भाजपच्या राज्यांनीही त्यांची री ओढली.

पंतप्रधान व त्यांचे गृहमंत्री यांच्या हुकुमाखेरीज पानही न हलणाऱ्या गुजरातच्या सरकारने हा निर्णय स्वतः होऊन करणे अजिबात शक्य नाही. त्यांनी भाजपच्या या नव्या (दोन नेत्यांच्या) हायकमांडची परवानगी घेतली असावी हे स्पष्ट आहे.

एवढेच नव्हे तर मंत्रिमंडळातील विविध मंत्रीगटातही नितिन गडकरी यांना समाविष्ट करण्यात आलेले नाही.

गडकरींनी 'काम करणारा मंत्री' म्हणून लौकिक मिळवल्यानंतर अनेकांना भाजपमध्ये मिरच्या झोंबल्या होत्या.

आता पध्दतशीरपणे गडकरींचे पंख कातरणे सुरु आहे. त्यांच्या नव्या रस्ते प्रकल्पांना आर्थिक तरतूद करण्याची बाब जवळपास ठप्प आहे. संघटनेत संघ स्वयंसेवक आणि जम्मू-काश्मीर हाताळणारे तसेच पंतप्रधानांच्या परदेशातल्या भारतीयांच्या सभांचे आयोजन करणारे सरचिटणीस राम माधव हेही बहुधा हायकमांडच्या मर्जीतून उतरले असावेत असे दिसते.

अलीकडे पंतप्रधान साहेब अमेरिकेचा आठवड्याचा दौरा करुन आले. या दौऱ्यात त्यांनी 'हाऊडी मोदी' या भारतीयांच्या मेळाव्याला संबोधीत केले. पण याचे आयोजन राम माधव यांच्याकडे नव्हते. राम माधव यांची गैरहजेरी जाणवणारी होती असे सांगण्यात आले.

काळाचा महिमा...... दुसरे काय???



Best

Compliments



लोकांच्या दैनंदिन समस्या व अडचणींची तीव्रता वाढायला लागते आणि नागरिकांमध्ये प्रक्षोभ होण्याची स्थिती दिसू लागते तेव्हा कोणताही राज्यकर्ता तत्काळ जनतेचे लक्ष अन्यत्र वळविण्याचे प्रयत्न सुरु करतो. यासाठी हा राज्यकर्ता त्याने उपकृत केलेल्या पुरस्कृत माध्यमांचा व अन्य प्रचार साधनांचा वापर करायला लागतो. यासाठी दोन पातळ्यांवर काम सुरु होते. एका बाजुला केवळ देखाव्याचे मूल्य असलेल्या सरकारी कार्यक्रमांचा मोठा गवगवा सुरु केला जातो. दुसरीकडे अचानक देशावर युध्दाचे, संघर्षाचे ढग जमू लागतात. देशात

# सावध रहा राष्ट्रभक्तीच्या गुंगी इंजेक्शनपासून

**गहिनीनाथ**







दहशतवाद्यांतर्फे मोठ्या हल्ल्याची तयारी सुरु असल्याच्या बातम्या पेरल्या जाऊ लागतात. त्यासाठी देशात ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्तात प्रचंड प्रमाणात वाढ केली जाते. त्याची दृष्ये माध्यमे व वृत्तवाहिन्यांवर झळकायला लागतात. रेल्वेगाड्यांमध्ये, विमानतळावर. बाजारांमध्ये सुरक्षा व्यवस्था कशी कडेकोट आहे आणि लोकांचे सामानही कसे तपासले जात आहे याची दृष्येही प्रसारित केली जाऊ लागतात. जनतेला जागरुकतेचे संदेश दिले जातात. सावधगिरी व खबरदारी बाळगण्याच्या सूचना जारी होतात. त्यातूनच शत्रुदेशातर्फे भारतात घातपाती कारवाया



केली जाण्याची शक्यता सांगून लोकांना देशभक्ति, राष्ट्रवाद, विशिष्ट धर्मीयांच्या विरोधात वातावरणनिर्मिती हे सर्व प्रकार सुरु होतात. एखाद्या सिनेमाप्रमाणे हे वाटेल. पण राज्यकर्त्यांचे चाल-चरित्र-चेहरा, आचरण व वागणूकच सिनेमा स्टाईल होऊ लागते तेव्हा राजकारणाचाही सिनेमाच सुरु होतो. या सिनेमात देशाची वाट लागते. सामान्य माणूस पिचतच राहतो आणि लोकांची दिशाभूल करुन राज्यकर्ते स्वतःची सत्ता टिकविण्यात यशस्वी होतात. या कलेत राज्यकर्ते पारंगत असतात आणि वेळोवेळी त्याचा आविष्कार घडवीत असतात. तुम्ही म्हणाल




**महाराष्ट्र आणि हरयानात होणाऱ्या विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी सत्तारूढ पक्ष आटोकाट प्रयत्न करीत आहे. त्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा देशभक्ति, राष्ट्रवादी. दहशतवाद, देशाची सुरक्षितता, सेनादलांची व जवानांची मर्दुमकी आणि पाकिस्तानला कसे नामोहरम केले जात आहे याच्या प्रचारकी घोषणा व जाहिरातबाजी सुरु केलेली आहे. पाकिस्तान हा कुरापती उकरणारा देश आहे हे या देशातल्या शेंबड्या पोराला देखील माहिती आहे. परंतु सातत्याने 'पाकिस्तान, पाकिस्तान' करुन वातावरणनिर्मिती करण्याच्या उन्मादात आपण धार्मिक गुंडांच्या हातात कोलीत देत आहोत आणि हे धार्मिक गुंड धर्माच्या नावाखाली अन्याय, अत्याचार करीत सुटले आहेत याचे भान राज्यकर्त्यांना राहिलेले नाही. लोकांना त्यांच्या दैनंदिन अडचणींचा त्रास जाणवू नये यासाठी देशभक्ति, राष्ट्रवाद यांचे गुंगी आणणारे इंजेक्शन दिले जात आहे. त्यापासून सावध राहण्याचे आव्हान सर्वसामान्य नागरिकांपुढे आहे.**



की तुम्हाला हे दृष्य आताच सर्वत्र दिसत आहे. अगदी बरोबर ! सध्या राज्यकर्त्यांकडून हाच खेळ सुरु करण्यात आला आहे. जेणेकरुन तुमच्या दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या अडचणींवरुन तुमचे लक्ष अन्यत्र उडावे.

महाराष्ट्र आणि हरयाना या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुका होत आहेत. भारतीय सेना, निमलष्करी दले व अन्य सुरक्षा दलांमध्येही या दोन्ही राज्यांचे लोक चांगल्या संख्येने आहेत. विशेषतः हरयाणा राज्यात ही संख्या विशेष मोठी आहे. ती लक्षात घेऊन काही गोष्टींचा बोलबाला मोठ्या प्रमाणात केला



जात आहे. यामध्ये देशाची सुरक्षितता, या सुरक्षिततेला निर्माण होत असलेला धोका, दहशतवादी कारवाया वगैरे मुद्यांवर विशेष भर दिला जात आहे. त्या पध्दतीच्या बातम्याही प्रसिध्द होत आहेत. ताज्या माहितीनुसार काही वृत्तवाहिन्यांनी बालाकोट हवाई मोहिमेवर आधारित एक व्हिडिओ किंवा चित्रफीत दाखविण्यास सुरुवात केली. आता या चित्रफीतीचे औचित्य काय हा प्रश्न मनात येऊ शकतो. त्याचे उत्तरही आहे. त्याचे उत्तर आहे महाराष्ट्र व हरयानातील विधानसभा निवडणुकात मते मिळविणे आणि देशावर आलेल्या आर्थिक संकटावरुन लोकांचे लक्ष उडविणे!

काही दिवसांपूर्वीच अचानक उपकृत व पुरस्कृत वृत्तवाहिन्या व तत्सम माध्यमांकडून पाकिस्तानातील बालाकोट येथे जैश ए मुहम्मद दहशतवादी संघटनेने पुन्हा आपले प्रशिक्षण केंद्र सुरु केल्याची बातमी गाजावाजाने दिली गेली. एवढेच नव्हे तर या ठिकाणी पाचशे दहशतवादी भारतात घुसण्यासाठी दबा धरुन बसलेले आहेत अशा बातम्याही दिल्या गेल्या. माहीतगार गोटाच्या हवाल्याने या बातम्या दिल्या गेल्या. म्हणजेच या माहितीबाबत ठोसपणाचा अभाव होता. पण लोकांना सनसनाटी बातमी द्यायची व त्याचबरोबर एक वातावरणनिर्मिती करायची. तुम्हाला आठवत असेल. पुलवामा येथे केंद्रीय सुरक्षा दलाच्या



ताफ्यावर दहशतवादी हल्ला होऊन त्यात तीस ते चाळीसच्या दरम्यान जवान हुतात्मा झाले. त्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तानी हद्दीत घुसून बालाकोट येथील जैश ए मुहम्मदचा तळ नष्ट केला होता. ही हवाईदलाने मोहिम केली होती. त्याचा भरपूर गाजावाजा झाला होता. या मोहिमेत किती दहशतवादी मारले गेले याची अधिकृत आकडेवारी कधीच प्रसिध्द झाली नाही. पण हवाईदलाच्या या मर्दुमकीचा लोकसभा निवडणुकीसाठी भरपूर वापर करण्यात आला होता. आता महाराष्ट्र व हरयाना विधानसभेच्या निवडणुका होत असल्याने पुन्हा बालाकोटची आठवण ताजी कशी करायची ? मग बालाकोटमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा जमवाजमव सुरु केली आहे, पुन्हा तेथे प्रशिक्षण तळ सुरु केला आहे अशा बातम्या देऊन व ते निमित्त करुन बालाकोटच्या मर्दुमकीच्या आठवणी ताज्या करायच्या. हे एक प्रचार तंत्र आहे व त्याचाच वापर सुरु आहे.

आणखी एक उदाहरण ! पंतप्रधान साहेब अमेरिकेच्या दौऱ्यावरुन परतले. या अमेरिकेच्या दौऱ्याचे फलित काहीच नव्हते. पण वातावरणनिर्मिती अशी करण्यात आली होती की जणू काही पंतप्रधानसाहेब हे दिग्विजयच करुन आले आहेत. ते परतल्यानंतर त्यांचे विमानतळावर स्वागत करण्यात आले. तेथे भाषण करताना त्यांनी कोणताही संदर्भ नसताना तीन वर्षांपूर्वी याच तारखेला ते रात्रभर झोपले नव्हते

कारण त्यावेळी भारतीय सैनिकांनी उरी येथे पाकिस्तानी हद्दीत घुसून कमांडो कारवाई केली होती. कशाचा कशाशी मेळ नाही! पण केवळ वातावरणनिर्मितीसाठी ओढूनताणून लोकांचे लक्ष उरी व बालाकोटकडे वळवायचे आणि शौर्याच्या बढाया व फुशारक्या मारायच्या!

हे सर्व कशासाठी? तर लोकांनी महागाई, बेकारीसारखे प्रश्न करु नयेत यासाठी! कांद्याच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. दिल्ली व आसपासच्या परिसरात कांदा 70 ते 80 रुपये किलो झाला आहे. यात हरयाना आलाच ! हरयानात निवडणूक असल्याने कांद्याने मतदारांना रडवू नये यासाठी सरकारने तत्काळ कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली. परंतु या सरकारचे दुर्दैव असे की हरयानात कांदा खाल्ला जातो तर महाराष्ट्रात पिकवला जातो. हरयानातील मतांसाठी कांद्याची निर्यात थांबवून केंद्र सरकारने महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांच्या डोळ्यात पाणी आणले आहे.

आर्थिक आघाडीवर हे सरकार दिवसेंदिवस अपयशी होत चालले आहे. रिझर्व बँकेने कर्जावरील व्याजदर कमी करताना जारी केलेल्या अर्थव्यवस्थेबद्दलच्या अहवालात विकासदर हा 6.9 वरुन 6.1 टक्क्यांपर्यंत खाली घसरण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्याचबरोबर चलनवाढ व महागाईचा निर्देशांकही 3.1वरुन 3.4 टक्क्यांपर्यंत वाढणार असल्याचे म्हटले आहे. रिझर्व बँकेने कर्जावरील व्याजदर कमी करुन लोकांना, उद्योग व्यावसायिकांना कर्जे घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु याचा परिणाम म्हणून बँकांमध्ये ठेवींवरील व्याजदरात कपात होण्याची शक्यता आहे. म्हणजेच ज्या सामान्य नागरिकांनी त्यांचे पैसे बँकांमध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात ठेवले असतील त्यावरील व्याजात घट होऊ शकते. म्हणजेच जे सामान्य निवृत्त व ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आयुष्याची पुंजी बँकात गुंतवून त्याच्या व्याजदरात आपली उपजीविका करतात त्यांच्या उत्पन्नात या संभाव्य व्याजदर कपातीमुळे घट होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर एका मुद्याकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते कारण गेल्या महिनाभरात सरकारतर्फे अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सरकारने तीन टप्प्यात ज्या मदतयोजना जाहीर केल्या त्या प्रामुख्याने उद्योग-व्यवसायासाठी होत्या.

उद्योग-व्यवसायांना प्रथम मदत केल्यास त्याचे लाभ झिरपून सर्वसामान्यांना मिळतील हा हेतु त्यामागे असल्याचा दावा करण्यात आला होता. हा सर्व प्रकार 'तहान लागल्यावर विहिर खणण्याचा' आहे. तसेच यामध्ये सरकारचे ढोंग आणि लबाडीही उघडकीस आली आहे. सर्वसाधारणपणे अत्यंत मोठे व महत्वाचे असे निर्णय हे अर्थसंकल्पाच्या माध्यमातून केले जातात. या सरकारने अर्थसंकल्प मांडताना मात्र आपले सरकार गरीबांच्या बाजुने असल्याचा आव आणून श्रीमंतांवर, उद्योगांवरील कर कमी न करण्याची भूमिका घेण्यात आली होती. पण महिना उलटल्यानंतर हे सरकारही उलटले आणि त्यांनी एका मागून एक कर कमी करण्यास सुरुवात केली आणि उद्योग-व्यावसायिकांना सवलती देण्याचे सत्र आरंभले. म्हणजेच सामान्य माणसाला ठकविण्याचा हा प्रकार होता. पण हा प्रकार बिनधास्तपणे करण्यात आला व त्यावर आर्थिक संकट-निवारणाचा मुलामा देण्यात आला.

यातही या सरकारने केवळ सुसंघटित उद्योग जगताचाच प्राधान्याने विचार केला आणि त्यांना सवलती दिल्या. या देशात सुसंघटित क्षेत्राची व्याप्ती केवळ वीस ते तीस टक्क्यांच्या दरम्यान आहे. सुमारे सत्तर ते पंच्याहत्तर टक्के क्षेत्र हे असंघटित आहे आणि त्यातच सर्वाधिक रोजगार उपलब्ध असतो. तेथेच सर्वसामान्य नागरिक आपली उपजीविका शोधत असतो. दुर्दैवाने लहरी राज्यकर्त्यांनी नोटबंदीचा अत्यंत विघातक निर्णय करुन हे असंघटित क्षेत्र पूर्णपणे बरबाद-नष्ट करुन टाकले आहे. यामुळे




ठेवीवरील व्याजदर कमी झाल्याने चिंताग्रस्त झालेले ज्येष्ठ नागरीक.



सर्वाधिक रोजगार पुरविणारे लहानलहान, घरगुती उद्योग व व्यवसाय पूर्णपणे नष्ट-उद्ध्वस्त झाले. हे क्षेत्र अद्याप सावरलेले तर नाहीच पण त्याच्या पुनरुज्जीवनासाठी या सरकारने काहीही केलेले नाही. देशातली बेकारी कमी होण्याऐवजी वाढण्यामागे हे प्रमुख कारण आहे.

सप्टेंबरच्या अखेरीला ऑगस्ट-2019 पर्यंतच्या अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या आठ प्रमुख पायाभूत किंवा आधारभूत अशा क्षेत्रांच्या वाटचालीची म्हणजेच विकासदराची आकडेवारी सरकारतर्फे जाहीर करण्यात आली. त्यानुसार या आठही क्षेत्रांच्या विकासदरात सरासरी अर्ध्या टक्क्याने घट आढळल्यास कुणाला आश्चर्य वाटायला नको.

या माहितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि हरयानात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांचा विचार करावा लागेल. या विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी सत्तारूढ पक्ष आटोकाट प्रयत्न करीत आहे हे स्पष्ट झालेच आहे. त्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा देशभक्ति, राष्ट्रवादी. दहशतवाद, देशाची सुरक्षितता, सेनादलांची व जवानांची मर्दुमकी आणि पाकिस्तानला कसे नामोहरम केले जात आहे याच्या प्रचारकी घोषणा व जाहिरातबाजी सुरु केलेली आहे. पाकिस्तान हा कुरापती उकरणारा देश आहे हे या देशातल्या शेंबड्या पोराला देखील माहिती आहे. परंतु




नोंदवली गेली आहे. अर्थव्यवस्थेचा एकंदर आवाका लक्षात घेताना अर्धा टक्का हा देखील फार मोठा असतो. त्याचे अत्यंत दूरगामी परिणाम होत असतात. त्याचा अर्थव्यवस्थेप्रमाणेच रोजगारावरही प्रतिकूल परिणाम होत असतो. महागाई निर्देशांकाशी त्याचा संबंध असतो. या आकडेवारीवरुन होणारे आकलन हेच सांगते की अर्थव्यवस्थेची घसरण थांबलेली नाही आणि ती चालूच आहे. काही तज्ञांच्या मते परिस्थिती अशीच राहिली तर पुढील वर्षी 1 फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर करीपर्यंत देशाचा विकासदर चार टकक्यांपर्यंत देखील खाली आलेला

सातत्याने 'पाकिस्तान, पाकिस्तान' करुन वातावरणनिर्मिती करण्याच्या उन्मादात आपण धार्मिक गुंडांच्या हातात कोलीत देत आहोत आणि हे धार्मिक गुंड धर्माच्या नावाखाली अन्याय, अत्याचार करीत सुटले आहेत याचे भान राज्यकर्त्यांना राहिलेले नाही. लोकांना त्यांच्या दैनंदिन अडचणींचा त्रास जाणवू नये यासाठी देशभक्ति, राष्ट्रवाद यांचे गुंगी आणणारे इंजेक्शन दिले जात आहे. त्यापासून सावध राहण्याचे आव्हान सर्वसामान्य नागरिकांपुढे आहे.

*Best Compliments*

# गांधी आता फक्त मतापुरता!

राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीनिमित्त जगभरात हया महामानवाचे, त्यांच्या नावांचे पुन्हा एकदा आदरयुक्त स्मरण करण्यात आले. अहिंसेवर असलेली त्यांची नितांत श्रद्धा आणि अखंड सेवाव्रत अस एक लोभस द्वैत आजही केवळ भारतालाच नव्हे तर संबंध जगाला अनुकरणीय वाटते. गांधीजींच्या संपूर्ण आयुष्याचा मागोवा घेताना अगदी आफ्रिकेत सुरु झालेला मानवतेचा लढा त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत ते लढतच राहिले.स्वातंत्र्य लढयात सत्याग्रहाच्या मार्गाला अग्रक्रम देत त्यांनी देशात एकजूट घडवून आणली. बिहारमधला निळ कामगारांचा संघर्ष असो की मुठभर मिठाचा झगडा असो चले जाव चा नारा अशा गांधीजींच्या वाटेवरच्या सुवर्ण खुणा आजही तेजोमय आहेत. अनेक मोठया नेत्यांचे गांधीजींशी मतभेद झाले. ब्रिटीश राज्यकर्त्यांना तर गांधींच्या लढयाला सामोरे जाण्याचा मार्गच सापडत नव्हता. स्वातंत्र्यानंतर महात्माजींचे लक्ष केवळ सुराज्य निर्माण करण्याचे होते. परंतु फाळणीनंतर उद्‌भवलेल्या हिंसाचारामुळे, जातीय दंगलीमुळे एक प्रकारची उद्विग्नता त्यांच्यासमोर दाटून येत होती. तरीही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी महात्माजी कधीच हरले नाहीत. त्यांचे सत्याग्रह, उपोषण, प्रार्थना अव्याहतपणे चालू असायचे. खर तर स्वातंत्र्यानंतर काय समाजरचना असावी हयाबद्दल त्यांनी अतिशय सुंदर मार्गदर्शन केले होते. स्वावलंबी व्हा,खेडयाकडे चला, स्वच्छतेसाठी आग्रही रहा, व्यक्तिगत गरजा कमी करा, सर्वधर्म समभाव जपा ही जीवनसूत्रे मोलाची होती. गांधीजींचा



विज्ञानाला कधीच विरोध नव्हता. पण चरखा चालवून सुत काढून तयार केलेले कापड अडगळीत टाकण्याची आवश्यकता नव्हती. गांधीजींच्या शिकवणुकीनुसार गेली सहा दशके देशाने वाटचाल केली आहे का ? त्यांच्या नावाने अनेक संस्था, विद्यालये, रस्ते आणि बरच काही पदोपदी समोर येत. पण त्यातून गांधीजी हरवले आहेत का असा प्रश्न निर्माण होतो. मग मुन्नाभाईसारख्या सिनेमातून आलेली गांधीगिरी आपल्याला चकीत करुन टाकते. खरंच आज गांधी असते तर काय ? एका कवितेत कुसुमाग्रजांनी ते मार्मिकतेने मांडले आहे. त्यातल्या काही ओळी :

**मध्यरात्र उलटल्यावर शहरातले**
**पुतळे एकत्र आले महात्मा फुले**
**म्हणाले मी तर फक्त माळ्यांचा**
**लोकमान्य उगारले मी फक्त**
**चित्तपावन ब्राम्हणांचा**
**गांधीजींनी गळ्यातला गहिवर**
**आवरला आणि म्हणाले तरी**
**तुम्ही भाग्यवान तुमच्या पाठीशी**
**एक एक जात जमात तरी आहे**
**माझ्या पाठीशी मात्र फक्त सरकारी**
**कचेऱ्यातील भिंती**

असे भिंतीवरले गांधीजी, पुतळ्यातले गांधीजी किंवा संस्थांमधले गांधीजी खरच आपल्याला हवे आहेत का ? मोहनदास करमचंद गांधी नावाचा महामानव हया पृथ्वीतलावर अवतरला होता, एवढीच आख्यायिका जपायची का ? त्यापलिकडेही समाजाने जायला हवे. परिवर्तन घडवायला हवे. गांधीजींच्या मार्गाने. जयंतीनिमित्त महात्म्याला अभिवादन.



## शेवटचे पान

